म. ग्रं. सं. ठाणें
विषय
नं.

( रंगभूमि मासीक पुस्तकांत प्रसिद्ध झालेले )

# महाराष्ट्रीय नट.

प्रकाशक—शंकर बापूजी मुजूमदार.

REFBK-C019246
REFBK-0019246

किं. ०६ आणे.

किर्लोस्कर प्रेस, पुणें शहर.

स्थळ प्रत
म. ग्रं. सं. अंजे.

# नटास उद्देशून

( लेखक—एक नटवर्गीय. )

[ वसंततिलकावृत्त. ]

सर्वांग सुंदर नटा तुजला जगांत ॥
कां मान नाहि ह्मणुनी तुज लेखितात ॥
नाट्यांत तूं अभिनयीं मन रंजवीसी ॥
तूं आपल्या मधुर गायनीं गुंगवीसी ॥ १ ॥
तूं वेष घेत असतां मुखिं पीत रंग ॥
लावीसि त्या समयिं ये कविचे तरंग ॥
हा रंग भासत तुला परि काळिमा हे ॥
तैले जले धुवुनियां मुळि नष्ट नोहे ॥ २ ॥
ही नाट्य सुंदर कला किति दुर्गतीस ॥
गेली असे करि विरोध तिच्या गतीस॥
ती राहिली भुलुनियां तव संगतीस ॥
कां वाटतो प्रिय बहू नटसंग तीस ॥ ३ ॥
ते वानितात बुधही तव संगमा या ॥
कां यत्न तं न करिसी जन ते रमाया ॥
दैवें तुला दिधलि सुंदर रूप काया ॥
तो कंठही मधुरसा मन तोषवाया ॥ ४ ॥
जैसा सभेंत घन आदर पंडिताचा ॥
त्कर्ष होईल तसा कधिं या कलेचा ॥
ो साध्य होइल तुवां जरि यत्न केले ॥
टे परी अवगुणें तिज लोपवीले ॥ ५ ॥

१८२४६
REFBK-0019246

तांबूल खासि ह्मणुनी मुख लाल त्यानें ॥
ते कृष्ण ओष्ट दिसती अति धूम्रपानें ॥
मद्यादि दुष्ट व्यसनें तुज लागतात ॥
वारांगना प्रिय अहर्निश वाटतात ॥ ६ ॥

पाहोनि नाटक तुझें कविच्या गुणाला ॥
ते धन्य धन्य वदती न तुझ्या गुणाला ॥
लोकांत सांगसि परी बहु लांब ताना ॥
म्यां मारिल्या ह्मणुनि या डुलतात माना ॥ ७ ॥

सौंदर्य, तान, मधुकंठ ह्मणोनि त्याचा ॥
तोरा वृथा मिरविसी जनि मान्यतेचा ॥
कर्तृत्व काय वद यांत तुझ्या गुणाचें ॥
तें खास नाहि तव बोल असे फुकाचे ॥ ८ ॥

या देणग्या विसरसी परमेश्वराच्या ॥
सांभाळि त्या सहज प्राप्त न व्हावयाच्या ॥
गेल्या जरी सकल या तुजला त्यजून ॥
तूं व्यर्थ भार मग मात्र जगीं जगून ॥ ९ ॥

आकाशयान फिरतें जरि अंबरांत ॥
वायू तयांत असतो ह्मणुनी गतीत ॥
तो संपतां पडतसे गिरिकंदरांत ॥
त्या देणग्या जन अशा सम मानितात ॥ १० ॥

आवाज साफ असतां प्रति नाटकाला ॥
कंठास बांधिसि शिरा तरि तो कशाला ॥
कोणीं तुशीं सहज भाषण ये कराया ॥
त्यां दाविसी परि अमंगळ कौतुका या ॥ ११ ॥

## नटास उद्देशून.

तो वेष मोहवि तुझा परि गायनांत ॥
बेताल होऊनि स्वतां कधिं बेसुरांत ॥
ज्यांनीं जगीं मिळविलें यश वादनांत ॥
क्रोधें तयां बघसि चावुनि ओष्ट दंत ॥ १२ ॥

येणेंपरी लपविसी निज दोष साचा ॥
अन्यायि ते न करिसी अपमान त्यांचा ॥
तूं मग्न राहसि सदा व्यसनीं कशाचा ॥
तूं मूर्ख बोधहि तुला न रुचावयाचा ॥ १३ ॥

टाळ्या अनंत मिळल्या जरि प्रेक्षकांच्या ॥
त्या सर्वही असति निंद्य न गौरवाच्या ॥
तूं मात्र मानिसि मनीं अभिनंदनाच्या ॥
नाहींत बा असति या तव कल्पनेच्या ॥ १४ ॥

हे दोष नष्ट करि तूं आपुल्या गुणांनीं ॥
नाट्यास निंद्य वदती तव दुर्गुणांनीं ॥
तूं हे जरी मदभरें नच सोडियेले ॥
ते वाढतील पुढतीं तुज सत्य बोले ॥ १५ ॥

जे हीन दुष्ट व्यसनी तव मित्र होती ॥
मिथ्या स्तुती करुनियां तुज वानिताति ॥
कां थोरवी तुजसि वाटत या खलांची ॥
केव्हांहि संगत तुला न घडे भल्यांची ॥ १६ ॥

त्या कालिदास भवभूतिस लोक राजी ॥
रत्नेंच कीं विलसतीं कवि मंगला जीं ॥
नाहींत आज जरि ते तरि आर्यभूत ॥
ते वंदनीय अजुनी जन वर्णितात ॥ १७ ॥

विद्या विभूषित असे नट लंदनांत ॥
आहेत त्यासि कधिं वाण न लौकिकांत ॥
शृंगारुनी निज कलेस गुणें तयांनीं ॥
संपादिलें यश अलौकिक त्या नटांनीं ॥ १८ ॥
राहे कृतींत कविच्या जरि दोष कांहीं ॥
तो लोपवी गुणबळें नट सर्वदाही ॥
वाही न गर्व अगदीं आपुल्या गुणाचा ॥
ऐशा नटा सतत मान मिळावयाचा ॥ १९ ॥
हें काव्य बोध घडवील ह्मणोनि केलें ॥
व्यक्तीस टोचुनि कुण्या नच लेखियेलें ॥
ऐसे असोनि जरि राग कुणासि आला ॥
तो बुद्धिहीन नट वाटत मन्मनाला ॥ २० ॥

ग्रंथ संग्रहालय
नं. ..........
ता. ..........



कै० मोरोबा वाघुलीकर.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मोरो बापूजी वाघोलीकर.

किर्लोस्कर संगीत मंडळींतील आद्य, प्रमुख व प्रख्यात नट मोरोबा वाघूलीकर हे वाई येथें ता० २० जानेवारी १९०८ रोजीं परलोकवासी झाले. मोरोबा हे किर्लोस्कर मंडळींतील जसे प्रसिद्ध नट होते तसे महाराष्ट्र संगीत नाटकाच्या इतिहासांतही ते प्रसिद्ध पुरुष झाले आहेत. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या प्रसिद्धीला व संगीत नाट्यकलेचा उदयकाळ येण्याला मोरोबा हे बऱ्याच अंशीं कारण आहेत. मोरोबाच्या कुळाचा मोठेपणा दाखविण्याकरितां ते ज्या घराण्यांत निपजले, त्याचा संबंध अकब्बर बादशहाच्या वेळेच्या एखाद्या ब्राह्मण मुत्सद्याच्या घराण्याशीं जोडण्याचा आमचा फार हेतु होता. तसेंच शिवाजीच्या वेळीं जीं देशस्थ घराणीं उदयास आलीं त्यांपैकीं एखाद्या घराण्याशीं मोरोबांच्या पूर्वजांचा धागा लागेल म्हणून फार प्रयत्न करून पाहिला. बाजीरावाच्या पदरीं जे देशस्थ इमानदार पुरुष होते त्यांत तरी मोरोबांच्या वाडवडिलांचे काके, मामे कोणी होते कीं काय म्हणून शोध करून पाहिला; परंतु त्या संबंधानें आमची निराशा झाली व त्यामुळें चरित्रविषयक पुरुषांची महति वाढविण्याकरितां त्यांचा लांब कोठें तरी एखाद्या प्रसिद्ध घराण्याशीं संबंध पोंचवावा ही जी इंग्रजी चरित्रकारांची पद्धति तिचें अनुकरण करण्याची आमची हाव जागच्याजागींच राहिली.* तथापि जो मोठेपणाचा मान मोरोबांना मिळा-

---

* इंग्रजी ग्रंथकारांना प्रसिद्ध पुरुषांची महति वाढविण्याकरितां त्यांची वंशावळ कशी लांबपर्यंत पोंचवावी लागते याचे मासले इंग्रजी ग्रंथांतून पुष्कळ पाहण्यास सांपडतात. एका नटाच्या चरित्रांत अशाच तऱ्हेचा मासला आहे:

"The grace and bearing of Wilks were accounted of as natural in a man whose blood was not of the common tap. His father was descended from gudge Wilks, an eminent lawyer and a gentleman. During the civil wars

( टीप पुढें चालू. )

नं. ........
१८२७५

ला नाहीं तो मोरोबांच्या पिढीला मिळेल असें नांव मोरोबा आपल्या धंद्यांत मिळ-वून गेले आहेत. मोरोबा नाटकाच्या धंद्यांत प्रसिद्ध होण्यापूर्वी चाळीस, वर्षे सुमारें नाटकाचा प्रसार महाराष्ट्रांत होता, व या धंद्यांत पुष्कळ नट प्रसिद्धही होऊन गेले होतें; परंतु समाजांत या धंद्याला व धंदा करणाराला तितकी मान्यता नसल्यामुळें नटाच्या मागोमागच त्यांची प्रसिद्धि जात असे. मोरोबा हे प्रसिद्ध नटांतले पहिले नट आहेत; व नाट्यकलेचें स्थित्यंतर घडवून आणण्याच्या कामांत त्यांची योग्यता अण्णासाहेब किर्लोस्करांबरोबरीची आहे- अण्णासाहेबांस जर मोरोबा व बाळकोबा या जोडीचें साह्य मिळालें नसतें तर हें स्थित्यंतर घडून येणें शक्य नव्हतें. मोरोबा हे इंग्रजी कल्पनेचे किंवा मराठी कल्पनेचेही सुशिक्षित नव्हते. परंतु कुलीनपणाचें जें बालबोध वळण तें त्यांच्या अंगीं पूर्ण बिंबलें असे. त्यामुळें नाटकाचा पेषा स्वीकारण्यापूर्वी त्यांना प्रतिष्ठित आणि धनिक लोकांचाच सहवास घडला; व नाटकांत आल्यावरही तेंच वळण त्यांनीं पुढें चालविलें. हें वळण त्यांच्या प्रसिद्धीला बरेंच कारण झालें आहे.

मोरोबाचें मुख्य राहणें वांईपासून पांच कोसांवर वाघोली ह्मणून गांव आहे तेथील आहे. परतु वांईसच त्यांचा बहुतेक काळ गेला. लहानपणीं त्यांचें शिक्षण झालेलें दिसत नाहीं; परंतु आवाज मधुर असल्याकारणानें वांईचे प्रसिद्ध हरिदास मोरशास्त्री वांईकर यांनीं त्यांस आपल्या मागें उभें राहण्याकरितां घेतलें. त्यांच्याबरोबर हे पटवर्धनांच्या कुरुंदवाड, मिरज वगैरे संस्थानांत हिंडले होते. वर्जारखा ह्मणून

---

( मागील पृष्ठावरून. )

he raised a troop of horse at his own expense, for the kings service. A brother of the judge was in monk's army, with rank of colonel, and with more of honest intention than of common place discretion. The civil wars took many a good actor from the stage, but they also contributed the sons and daughters of many ancient but impoverished families to the foremost rank amon- distinguished players "

एक हिंदुस्थानांतले गवई होते त्यांच्याजवळ यांचा गाण्याचा कांहीं अभ्यास झाला होता. कांहीं दिवस, वाईचे लखोबा व्यास ह्मणून एक उत्तम गाणारे गृहस्थ होते व दादा बागवान ह्मणून लावणी करणारा एक मुसलमान कवि असे, यांच्या बरोबर तमाशा करण्याचाही त्यांनीं छंद चालविला होता. लखोबा आपल्या भावाच्या मागें कथेंत उभे राहत असत. त्यावेळीं पुणें, मुंबई, बडोद्याकडे ते प्रसिद्धीस आले. दादा बागवानही चांगला प्रसिद्ध कवि होऊन गेला आहे.* या सर्वांचा ब्राह्मणी तमाशा करण्याचा विचार ठरला होता; परंतु तो गर्भावस्थेंतच त्यांना सोडावा लागला. यापुढचा मोरोबांचा आयुष्यक्रम बहुतेक मुंबईचे शेट गोकुळदास देवजी, रणछोडदास, पनवेलचे विठोबा खंडाप्पा गुळवे, यांच्या आश्रयानेंच चालला होता. १८८० सालीं किर्लोस्करांची व यांची गांठ पडली व त्यांच्या हेतूस यांच्याकडून उभारणी मिळतांच संगीत कलेचा उदय झाला आहे. त्या वेळच्या समाजाची अनुकूलता नाटकधंद्यांत प्रतिष्ठित लोकांनीं पडण्यासारखी नसूनही मोरोबा त्यांत शिरले यावरून मोरोबांच्या निग्रही स्वभावाची कल्पना होण्यासारखी आहे. प्रथमचें संगीत नाटक झाल्याबरोबरच जादूच्या कांडीनें जसें खऱ्याचें खोटें, व खोट्याचें खरें भासावें त्याप्रमाणें नाटकाबद्दलची पहिली कल्पना बदलून गेली. याला पुष्कळ अंशीं मोरोबा कारण आहेत.

रंगभूमीवर मोरोबानीं सुमारें सतरा वर्षे काम केलें आहे; व सतरा वर्षांत साऱ्या चार भूमिका त्यांनीं केल्या आहेत. शाकुंतलमध्ये दुष्यंत, सौभद्रांत अर्जुन, रामराज्यवियोगांत वसिष्ठ, व विक्रमोर्वशीय नाटकांत पुरूरवा या सर्वांत पहिल्या दोन नाटकांत त्यांच्या भूमिकांचा लोकांच्या मनावर इतका कांहीं वज्रलेप

---

* दादा बागवानाच्या लावण्या व देवावरचीं पदें प्रसिद्ध असून फार रसाळ आहेत: पुढील पद्य हरदासलोक कथेंत नेहमीं ह्मणत असतात:

**गुरुदत्त निरंजनबन्मो ॥ क्या झूल रहे निरगुन्मो ॥ ध्रु० ॥ जटामुगुट ।शरलटा बिराजे ध्यान दिगंबरमुद्रा ॥ भालचंद्र झलके मुखमंडल कुंडलजोत करन्मो ॥ १ ॥ चार वेदकु तन रूप छाडे जोडे कर निशि दिन्मो ॥ मायानंदी कामधेनु है चौविसनाम दरसन्मो ॥ २ ॥ रूप रंग कछु नहीं ब्रह्मकु सुरत बनाये गहिरी॥ दादुदास श्रीदत्त चरनपर स्मरन करत महाबन्मो ॥ ३ ॥ गुरुदत्त॥**

संस्कार झाला आहे कीं, दुष्यंत किंवा अर्जुन ह्मटलें म्हणजे मोरोबाची कल्पना उभी राहते व मोरोबांची आठवण झाली कीं, त्यांच्या दुष्यंत व अर्जुन या भूमिका मनांत येतात. मोरोबांच्या मागें पुष्कळ नट या भूमिका करीत आले आहेत. कोणी नट आपल्या नांवाच्या पख्या हस्तपत्रकावर व जाहिरातीवर खिळ्यानें व शिळेनें कायम करीत आहेत. तरी "दुष्यंत मोरोबानेंच व्हावें" किंवा "अर्जुनाचें काम मोरोबानेंच करावें" असे अद्याप उद्गार निघत आहेत. मोरोबा हे खरे नट असत. नाटकगृहांत गेल्यापासून आपला वेष उतरीपर्यंत त्यांच्या भूमिकेचा त्यांच्यांत एक प्रकारें संचार झाला आहे असें वाटत असे. ते स्वतःही कधीं आपल्या भूमिकेविषयीं दुर्लक्ष करीत नसत व दुसरें कोणी करीत असलेलें त्यांस खपत नसे. दुसरा एक मोठा गुण त्यांच्यांत नटांना अवश्य असा असे कीं, ते अगदीं निर्मत्सर असत. बाळकोबा व भाऊराव यांच्या तोडीचे नट त्यांच्याबरोबर काम करण्यास असत. कधींकधीं कोणाची तारीफ कमीअधिक होत असे; परंतु अशा प्रसंगीं कोणत्याही दुर्विकाराचें वारें त्यांच्या मनाला शिवत नसे. इतकेंच नव्हे, तर दुसऱ्याचा रंग संभाळून आपल्या भूमिकेची छाप पाडण्याकडे त्यांची प्रवृत्ति असे. अण्णासाहेबांच्या शिक्षेंतील सर्व नटांना हें शिक्षण मिळालें आहे. मोरोबांच्या बाळबोधपणाचें वळण त्यांच्या उपयोगीं पडलें तें हेंच. त्यांच्या अंगीं कुवत होती तोंपर्यंत त्यांनीं रंगभूमीची अकृत्रिम सेवा केली, व आपल्या हातून आतां बरोबर कामगिरी होणार नाहीं असें त्यांना समजतांच स्वार्थाकडे नजर न देतां व नफानुकसानीची कल्पना मनांत न आणतां त्यांनीं आपल्या व्यवसायाला रजा दिली. किर्लोस्कर संगीतमंडळीचे ते खांब होते. ते भूषण होते. जसा एखादा कर्तृत्ववान् पुरुष नांव मिळवून आपल्या पुढील पिढीला भूषण देऊन जातो, याप्रमाणें त्यांनीं नांव मिळवून मंडळीवर उपकार करून ठेवले आहेत. एक कुटुंबपद्धतीनें नाटक मंडळ्या चालण्याची किती अवश्यकता आहे व एकाच नाटकमंडळींत राहण्यापासून किती फायदा आहे याला मोरोबांचा किर्लोस्कर मंडळीशीं जो त्यांच्या हयातीपर्यंत संबंध होता त्याचें उत्तम उदाहरण आहे. मोरोबांनीं धंदा सोडून सुमारें अकरा वर्षें होऊन गेलीं, परंतु ते किर्लोस्कर मंडळीच्या कुटुंबांतले एक असून वृद्धपणीं कामकाज न करतां घरीं स्वस्थ आहेत असें वाटत असे. त्यांना धंद्याची चाड असे. मोरोबाच्या स्वभावाचे जर या धंद्यांत सर्व लोक आढळून येतील तर, यापेक्षां धंद्याला अधिक

वजन येईल. त्यांच्या अंगीं दोष नव्हते असें नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या अंगांत जे लहान मोठे दोष जडतात त्याप्रमाणें मोरोबांच्या ठिकाणींही ते होते. परंतु ते दोष आपल्या धंद्याला त्यांनीं कधींही आड येऊं दिले नाहींत. हल्लींच्या समाजस्थितीचे भोवरे असे कांहीं चमत्कारिक आहेत कीं, मनुष्य न जाणतां किंवा समजूनसुद्धां त्यांत पडतो. त्यांत न सांपडतां अजिबात सुटून जाणारा मनुष्य चांगल्याच कोटींतला ह्मटला पाहिजे, पण तसें होणें प्रत्येकास शक्य नसतें. ह्मणून त्याच्या खाजगी वर्तनाकडे दुर्लक्ष करून फक्त व्यावहारीक गुणांकडेच पाहण्याचा शिष्टसांप्रदाय पडला आहे. त्यादृष्टीनें मोरोबांच्या अंगीं दोषापेक्षां गुणच फारच होते; व त्यामुळेंच त्यांना त्यांच्या धंद्यांत यश आलें.

मोरोबा, किर्लोस्कर मंडळीचे एक प्रमुख भागीदार होते. परंतु एखादा संस्थानिक जशी गादीची नोकरी करतो त्याप्रमाणें संस्थेची नोकरी करावयाची अशीच वृत्ति त्यांनीं ठेविली होती. यापेक्षां संस्थेच्या इतर भानगडींत ते कधीं पडत नसत. हें त्यांचें अनुकरण आलीकडच्या पिढींतील आमचे नाचरे नट ध्यानांत घेतील तर त्यांच्यावर मालकीसाठीं सतरा ठिकाणीं हिंडून नाटकमंडळ्या मोडण्याचे प्रसंग येणार नाहींत. मोरोबांचा स्वभाव फार साधा होता. ते मोठे शहाणे—म्हणजे पक्के नव्हते व वेडेही नव्हते; पण करारी होते. आपला मंडळींत किंवा रंगभूमीवर आतां पहिल्यासारखा उपयोग होणार नाहीं हें समजतांच दोन्हीकडेही त्यांनीं, विरक्त मनुष्य जसा संसाराकडे पाहतो तशी दृष्टि ठेविली. एखादी गोष्ट करावयाची नाहीं अशा निकरानें सोडली म्हणजे जसा एखादा मनुष्य तिकडे ढुंकून सुद्धां पाहत नाहीं तसें त्यांनीं कित्येक बाबतींत केलें होतें. आमरण त्यांची अण्णासाहेबासंबंधानें देवासारखी पूज्य बुद्धि होती. साधूंवर त्यांची विशेष भक्ति असे. पुण्याचे जंगलीबोवा, नगरचे खाकीदास बोवा, इंदूरचे भुरेबोवा यांच्यावर त्यांची फार श्रद्धा होती. त्यांच्या भोळसरपणाचे व श्रद्धेचे कांहीं मासले वाचण्यासारखे आहेत. प्रथम शाकुंतल नाटकाचा खेळ पुणें मुक्कामीं झाला त्या दिवशीं जंगलीबोवानीं त्यांना उदाची एक पुडी दिली. प्रसाद ह्मणून त्यांनीं खेळाच्या प्रारंभीं सर्व नाटकगृहांत तिचा धूप फिरवून तें शुद्ध केलें. तेव्हांपासून ती वहिवाट अद्याप मंडळी पाळीत आहे.

मागें जो त्यांचा तमाशा करण्याचा बेत होता ह्मणून सांगितलें तो अशाच भोळसरपणानें मोडला. खंडेराव महाराजांच्या कारकीर्दींत बडोद्यांत तमाशाचें फार

धंद असे. पुण्याकडील बरेच तमासगीर तेथें जाऊन कमाई करून आले होते. लखोबा व्यास बडोद्यास गेले होते तेथें त्यांचीही फार वाहवा झाली होती. त्यांना कांहीं मंडळींनीं सल्ला दिली कीं, येथें ब्राह्मणाचा तमाशा आला तर खोऱ्यांनीं पैसे ओढायला सांपडतील. लखोबांनीं मोरोबा व दादावागवान यांच्या संमतीनें तमाशाचा बेत जुळवून आणला. वाईस चोहून तालमी सुरू झाल्या. परंतु एके दिवशीं तालमीला जात असतां दिव्यानें मोरोबांच्या अंगरखा पेटला. मोरोबांला हा अपशकून वाटून त्यांनीं तमाशाचा विचार सोडून दिला; व झालेला खर्च आपण एकट्यानें सोसला.

मोरोबांनीं काशीयात्रेहून आल्यावर वाईस सहस्रभोजन घातलें. तेव्हां उष्ट्या अन्नाकरितां महारपोर धडपडूं लागलें. मोरोबांची इच्छा ब्राह्मणाचें उष्टें अन्न विटाळूं नये. परंतु महारांना सुग्रास अन्न कसें मिळावें? त्या दिवशीं कोणाही महाराला उष्ट्या अन्नाला शिवूं दिलें नाहीं. परंतु पुढें मोठा समारंभ करून वाईच्या आसपासच्या सर्व महारजातीला बुंदीच्या लाडवांची मेजवानी घालून त्यांनीं तृप्त केलें.

मोरोबांचा चालता काळ आल्यावर त्यांच्याकडून कांहींनीं कर्जाऊ रकम घेतली होती. ती परत करण्याची त्यांना वासना झाली नाहीं किंवा सामर्थ्य नसेल ह्मणून त्यांनीं परत केली नाहीं. मोरोबांनीं त्यांच्या इमानपणावर हवाला टाकला. कां तर फिर्याद करावयाची नाहीं.

थोडासा विक्षिप्तपणाही त्यांच्या स्वभावांत असे. घाई ह्मणून कशी असते ती त्यांना ठाऊक नव्हती. पडदा वर जाण्याची वेळ आली तरी, गाडी चुकण्याची वेळ आली तरी हे आपले स्वस्थ असत. त्यांचें स्नानसंध्येचें प्रस्थ मोठें असल्यामुळें जेवणाला मंडळीला उशीर होई. मंडळी कुरकूर करूं लागली ह्मणजे तुह्मी जेऊन घ्या ह्मणत असत; परंतु मंडळी जेवायला बसली कीं त्यांची तबेत जात असे. त्यांची रंगभूमीवर जाण्याची तयारी झाल्याशिवाय त्यांच्या अगोदरच्या पात्रानें पुढें जातां उपयोगी नाहीं, किंवा पडदा उघडतां उपयोगी नाहीं. परंतु हाच उशीर दुसऱ्या पात्रानें केलेला त्यांना खपत नसे. या गोष्टी त्यांच्या मनाप्रमाणें त्यावेळीं चालवून घेऊन दुसरे वेळीं जर त्यांना कोणी समजून सांगितलें कीं, "आबा, हें असें नाहीं, असें होतें. तुह्मी उगीच रागावला." तर त्यांनीं लागलींच ह्मणावें: "हें काय बरें,

मला काय ठाऊक ? मी आपला वेडगळ मनुष्य आहें तुम्हांला ठाऊक नाहीं ! " त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळें, यांचा विक्षिप्तपणा कोणाच्या ध्यानांतही राहत नसे.

मोरोबा अगदीं निरीच्छ असत. मंडळीशीं त्यांनीं संबंध सोडला तेव्हां आपल्यापासून संस्था चालण्याला कोणतीही अडचण राहूं नये अशा व्यवस्थेनें सोडला. नटांनीं यांच्या चरित्रापासून बोध घेण्यासारखा आहे. यांनीं कधीं मंडळीला अडवून धरलें नाहीं. रंगभूमीवर कधीं कुचराई केली नाहीं व आपसांत पैशाबद्दल ते कधीं भांडले नाहींत. लिहितां वाचतां येण्यापलीकडे त्यांचें ज्ञान नव्हतें. परंतु आपल्या भूमिका बरोबर समजून घेऊन त्यांनीं वठविल्या आहेत. ते बाळकोबासारखे गवयी नव्हते. किंवा भाऊरावासारखा त्यांचा अति मधुर कंठ नव्हता. परंतु त्यांच्या आवाजाचा मोहकधर्म व पदाचा अर्थ समजून काम करण्याची त्यांची पद्धत या दोषांत नव्हती. परंतु तिघेही आपापल्या गुणांत प्रवीण असल्यामुळें कोणापेक्षां कोण अधिक चांगला हें मार्मिक मनुष्यालाही समजणें कठीण पडत असे.

नाटकाचा व्यवसाय सोडल्यापासून त्यांनीं आपला कालक्षेप फार चांगल्या रीतीनें चालविला होता. नाटकांत राहून प्रतिष्ठितपणानें संसारी मनुष्यासारखें राहतां येतें. व संसारांत राहून विरक्त मनुष्याप्रमाणें राहतां येतें, हें त्यांनीं आपल्या उदाहरणानें दाखविलें आहे. " मोरोबांनीं संन्यास घेतला " असें कित्येक लोक जे बोलत असत, त्याला कारण ही त्यांची वृत्ति होय. मोरोबांना वृद्धपणीं संसारांतला एक मोठा धक्का बसला. सुमारें पांच वर्षांखालीं त्यांचा थोरला मुलगा प्लेगला बळी पडला. त्यांचा धाकटा एक कर्ता भाऊ कांहीं वर्षांपूर्वी गत झाल्यामुळें त्याच्याही कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावरच होती. त्यांत हा प्रसंग आल्यानें ते उदासीन असत. त्यांच्या पश्चात् त्यांचें व त्यांच्या भावाचें कुटुंब व एक मुलगा असून तो घर प्रपंच अंगावर घेण्यासारखा आहे.

प्रस्तुत लेखकाचा व मोरोबांचा संबंध किर्लोस्कर संगीत मंडळी स्थापन झाल्यापासूनचा असल्यामुळें, त्यांच्याबद्दल त्यांच्या स्तुतीशिवाय दुसरीं अक्षरें प्रस्तुत लेखकाच्या हातून निघणें शक्य नाहीं. किर्लोस्कर मंडळींतले व नाट्यकलेच्या इतिहासांतले चरित्रनायक अण्णासाहेब किर्लोस्कर व भाऊराव कोल्हटकर यांचींही चरित्रें त्याच लेखकाला लिहावीं लागलीं. अशा तऱ्हेचे एका संस्थेतील तीन पुरुषांचे चरित्रलेख एकामागून एक लिहिण्याचा प्रसंग एकावरच येणें हें एक प्रकारें

उद्वेगजनक कसें आहे याचा उल्लेख अण्णासाहेब यांचे चरित्रांत केला आहे. कुटुंबांतले एकामागून एक कर्ते पुरुष गेले म्हणजे त्यांच्याबद्दल त्यांचे गुण आठवून दुःख करीत बसण्याप्रमाणेंच प्रस्तुत लेखकाची या प्रसंगीं स्थिति झाली आहे हें सांगणें नकोच.

नं.
ता.
ठाणे



कै० प्रो० बाळकोबा नाटेकर.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

[library stamp]

(वर्ष १ लें अंक ५—६ मोरो बापूजी बाघुलीकर यांचे चरित्रावरून पुढें चालू.)

# बाळकोबा नाटेकर.

He was the admir'd example of the age,
And so observ'd all your dramatic laws,
He ne'er went off the stage but with applause,
Who his spectators and his auditors
Led in such silent chains of eyes and ears,
As none, whilst he on the stage his part did play
Had power to speak or look another way.

Lifo of Richard Burbage.

Excellency in the meanest things deserves encouragement, Richard Burbage and Edward Allen. two such actors as no age must ever look to see the like.

Bakers Chronicles.

किर्लोस्कर संगीत मंडळीच्या व महाराष्ट्राच्या नाट्यकलेच्या इतिहासांत जे प्रसिद्ध पुरुष होऊन गेले, त्यांत वरील पु.षाची योग्यता वरच्या प्रतीची आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर, मोरोबा वाघुलीकर, भाऊराव कोल्हटकर व नाटेकर यांची गुणाच्या कामांत परस्पराची तुलना करणें कांहीं अंशी अशक्य होतें. एकांत एक गुण अधिक तर दुसऱ्यांत दुसरा गुण अधिक असा प्रकार असल्यानें ही चौकडी रंगभूमीवर येत होती तेव्हां लोकांची आनंदवृत्ति समतोल रहात असे. म्हणून लोकांच्या स्मरणांतून ते प्रसंग अद्याप कायम आहेत. पुण्यांत निरनिराळ्या गुणांत, कसबांत, विद्येंत जीं एकेक माणसें एके काळीं प्रसिद्ध होऊन गेलीं, त्यांच्यांतच नाटेकर यांची गणना होती. यांस पुणें येथें ता० १३ जानेवारी १९१० रोजीं

दशा झाली. बरोबर तीस वर्षांत किर्लोस्कर मंडळीचे आरंभीचे एकेक पुरुष प्रस्तुत लेखकाशिवाय नाटेकरांच्या मृत्यूनें सर्व नाहींसे झाले. सृष्टिक्रमाप्रमाणें हें स्थित्यंतर व्हावयाचेंच; परंतु त्यांच्या जागा ज्या रिकाम्या राहिल्या आहेत त्या भरून येण्यास किती काळ लागेल तो लागो.

नाटेकर यांचे वडील स्वतः गवयी असल्यामुळें यांस त्यांचे पासूनच गायन विद्येचें शिक्षण प्राप्त झालें होतें. शिवाय पुण्याच्या बाबा गोखले यांच्या शाळेंत यांचें थोडें बहुत इंग्रजी शिक्षणही झालें होतें. परंतु पुढें हे गवयी या नात्यानेंच पुण्यांत प्रसिद्ध होते. यांच्या वेळीं रामभाऊ आलीबागकर, भलोबा, नाना बेलबागकर, रामभाऊ आष्टेकर इत्यादि गवयी मंडळी, बळवंतराव वैद्य पखवाजी, अण्णासाहेब घारपुरे सतार वाजविणार इत्यादि गायनवादन पटूंचा "गायनसमाज" मानूंच्या वाड्यांत भरत असे. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या कचेरीचे दप्तर पुण्यांत १८८० सालांत आलें तेव्हां त्यांच्या मनांत संगीत नाटक करण्याची जी कल्पना उद्भवली ती विशेषतः मोरोबा व बाळकोबा यांची माहिती मिळूनच उद्भवली होती. या दोघांपैकीं एकही जर अण्णासाहेबांच्या उद्देशाला अनुकूल झाले नसते तर कदाचित् संगीत नाटकाची कल्पना जेथल्या तेथेंच जिरली असती. त्या वेळीं नाटकधंद्यासंबंधीं दुराग्रह बाळगणारे लोक फार असल्यानें ते त्यांच्या नव्या कल्पनेला अनुकूल असणें शक्य नव्हतें. हा धंदा हलक्या लोकांनीं करण्याचा ही कल्पना आतांपेक्षां, त्या वेळीं जागृत होती. परंतु अण्णासाहेबांनीं आपल्या निश्चयाची चिकाटी इतकी धरली कीं, बाळकोबाला इतरांबरोबर त्यांनीं होय म्हणण्यास लावलें. १८८० सालीं आक्टोबर महिन्याच्या ३१ तारखेस संगीत नाटकाचा महाराष्ट्रांत आरंभ झाला; त्या प्रसंगीं शाकुन्तल नाटक करण्यांत आलें. त्यांत बाळकोबाकडे कण्वाची भूमिका होती. तेव्हांपासून बाळकोबांची प्रसिद्धि अधिक होऊन त्यांची मान्यता समाजांत ते नुसते गवयी होते, त्यापेक्षां ते नट झाले तेव्हां पासूनच अधिक होऊं लागली.

बाळकोबा सारखीं नाटकांत पात्रें होतीं म्हणूनच संगीत नाटकाला लोक आपले मुकटे गहाण टाकून व विद्यार्थी आपलीं पुस्तकें विकून नाटकास जात

अशा आख्यायिका आहेत. त्या खऱ्या नसल्या तरी नाटकांची लोकप्रियता या आख्यायिकांवरून कळून येते. संगीत नाटकांत दोष काढण्यास कोठेंही जागा नव्हती अशा वेळीं कित्येक मत्सरी लोकांनीं त्यास तमाशाची उपमा दिली होती—परंतु बाळकोबा व मोरोबा यांनीं ( भाऊराव पहिल्या दोन वर्षानंतर आले ) त्यांचीं तोंडें आपल्या गायनपटुत्वानीं तेव्हांच मिटविलीं. कोणतेही गाण्यावाजवण्याचे समारंभ पुणें शहरांत झाले कीं बाळकोबांचें गाणें व्हावयाचें. सुशिक्षित जनसमाजाचें बाळकोबांनीं गायनवादनानें फार दिवस मनरंजन केलें आहे.

किर्लोस्कर मंडळीनें नुसत्या अडीच नाटकांवर सुमारें एक तप लोक झुलविले. त्याचें मुख्य कारण त्यांत बाळकोबासारखीं पात्रें होतीं ह्मणून. इंग्लिश नाटकाच्या इतिहासांत शेक्सपीयरच्या कांहीं कांहीं नाटकाच्या प्रयोगाच्या आवृत्त्या संख्येनें फारच मोठमोठ्या झालेल्या आहेत ह्मणून त्या नाटकांची मोठी महति गाण्यांत येत असते—परंतु कोणत्याही नाटकाच्या इतिहासांत अडीच नाटकावर एका तपाच्या अवधींत हजार रात्रीं तेच ते प्रयोग झाल्याचें उदाहरण सांपडेल असें वाटत नाहीं. बाळकोबानीं मोठाल्या भूमिका अशा तीनच केल्या. शाकुंतल नाटकांत कण्वाची व सौभद्र नाटकांतील कृष्णाची व नारदाची. यांशिवाय मातली, कंचुकी व ऋषिकुमार अशा भूमिका शाकुंतलमध्यें सवडीनुसार ते घेत असत. रामराज्यवियोगांत कधीं कधीं वसिष्ठ व कधीं इतर कामें त्यांनीं केलीं आहेत. तथापि त्यांची कीर्ति कृष्णाची व कण्वाच्या कामाबद्दल विशेष होती.

या दोन्ही भूमिका स्वभावधर्मानें परस्पर भिन्न अशा आहेत. कण्व वनांत राहणारा वृद्ध मुनि व कृष्ण संसारी, विलासी, तरूण सर्व सुखाचा उपभोग घेणारा. एका भूमिकेंत करुणरस भरलेला व दुसरींत शृंगार रस ओथंबलेला. अशा भूमिका एकाच पात्राच्या हातून तंतोतंत बरोबर उठणें बहुधा कठीण असतें. कारण पात्राची प्रवृत्ति बहुतकरून एकाच प्रकारच्या स्वभावाची बनलेली असते. सुधारलेल्या देशांतील नट एकेका विशिष्ट कामांत प्रसिद्ध होतात व त्याप्रमाणें त्यांस "Comic actor" किंवा "Tragic actor" ह्मणजे हास्यरसप्रधान किंवा करुणरस प्रधान नाटकांतील नामांकित नट अशीं नांवें मिळतात. या दोन्ही

नाटकाशिवाय इतर नाटकांतील भूमिका त्यांस करतां येत नाहींत अशा या नांवाचा अर्थ घ्यावयाचा नाहीं. परंतु मुख्यतः त्यांची प्रसिद्धि एका विशिष्ट गुणांत असते.

बाळकोबाचें दोन्ही भूमिकेंत उत्तम प्रकारचें नैपुण्य दिसत असे. कण्वाच्या भूमिकेनें, शकुंतला सासरीं जात असतांना ते आपल्या गाण्यानें व अभिनयानें प्रेक्षकांच्या वृत्ति तटस्थ करीत असत. व कृष्णाच्या भूमिकेच्या वेळीं तिसऱ्या अंकांत रुक्मिणीशीं शृंगारविनोद करीत असतां, आनंदित करीत असत. बाळकोबाचें चरित्र लिहावयाचें ह्मणजे संगीत नाटकांनीं महाराष्ट्रांत कशी चळवळ उडवून दिली या इतिहासाची पुनरावृत्ति करणें आहे. कारण तो इतिहास अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या व भाऊराव कोल्हटकर यांच्या चरित्रांत पूर्वीं आला आहे. संगीतांत कोल्हटकर व बापुलीकर जितक्या योग्यतेचे नट होऊन गेले तितक्याच योग्यतेचे नाटेकर होते. पूर्वोक्त दोघांच्या जागा अंशतःतरी त्यांच्या मागून येणाऱ्या नटांनीं भरून काढल्या आहेत असें ह्मणतां येईल; परंतु नाटेकर यांची कण्वाची भूमिका त्यांच्यासारखी होणें सध्यां तर असंभवनीयच आहे. परंतु आजपर्यंत ती ज्यांनीं ज्यांनीं केली आहे, ते त्यांच्या पासंगालाही लागले नाहींत. इतकें नाटेकर व इतर नट यांच्यामध्यें अंतर आहे. किर्लोस्कर यांनीं लिहिलेलीं शाकुंतल व सौभद्र हीं नाटकें त्यांनीं हीं पात्रें पाहूनच लिहिलीं ही गोष्ट प्रसिद्ध आहेच. बाळकोबाचा कंठ अति मधुर असे. गाण्यांत त्यांचा शब्दोच्चार स्पष्ट होत असे. व गातांना त्यांची हंसत मुद्रा असे. त्यामुळें त्यांचें गाणें कंटाळवाणें कधींही होत नसे. तंतुवाद्यांतही ते निपुण असत. जेव्हां त्यांच्या खाजगी गाण्याचे समारंभ होत तेव्हां तंतुवाद्याचा व स्वतःच्या आवाजाचा मिलाफ करून ते सभा चित्रासारखी तटस्थ करीत होते. नाटेकर या साध्यां नांवानेंच त्यांची कीर्ति चोहोंकडे झाली होती व त्यांनीं रंगभूमि सोडून सुमारें सोळा वर्षें झालीं तरी ती अद्याप कायम आहे. त्यांना कोणी ‘ प्रति गंधर्व ’ ह्मणून पदवी दिली असती तर ती शोभली असती. परंतु टोपण नांवावर विकण्याची त्यांना

अवश्यकता पडली नाहीं. नाटेकर यांचें गाणें युरोपियन लोकांत सुद्धां मान्य झालें होतें. नामदार वेडरबर्नसाहेब अहमदनगरास जज्जाचे कामावर असतांना त्यांनीं नाटेकरास मुद्दाम बोलावून त्यांचें गाणें एकलें होतें व त्यांच्या गाण्याची त्यांनीं टाइम्स आफ इंडियांत तारिफ केली होती. लॉर्ड स्यांढर्स्ट गव्हर्नर असतांना त्यांच्यापुढें यांचें गाणें झालें होतें, व तुह्मी आपला गुण कोणास शिकविला आहे काय ह्मणून त्यांस विचारतां नाहीं ह्मणून उत्तर आल्यावर तुमचा गुण तुमच्याबरोबरच नाहींसा होणार काय ! ह्मणून गव्हर्नरसाहेब ह्मणाल्याचें ऐकिंयांत येतें. तें खरें असेल किंवा खोटें असेल, त्यांच्या गुणासंबंधानें त्यांस सर्व लोक चहात होते एवढेंच सांगण्याचा येथें मुद्दा आहे.


बाळकोबा किर्लोस्कर मंडळींत नोकर या नात्यानेंच होते व दोनशे रुपये पगारापर्यंत ते वाढले होते. मोरोबा, व भाऊराव यांच्याप्रमाणें हे मंडळीच्या व्यवस्थेप्रमाणें वागते तर त्यांचा जसा मंडळीपासून फायदा झाला तसा नाटेकरांचाही झाला असता.परंतु कोती समजूत व कित्येक त्यांची सल्लागार मित्रमंडळी यांनीं त्यांची फार नुकसान केली. त्यामुळें त्यांच्यासारखा अद्वितीय गुणी मनुष्य असूनही त्यांच्याशिवाय मंडळी चालविणें किर्लोस्कर मंडळीच्या चालकांना भाग पडलें. तथापि बाळकोबांनीं आमरण दुसरी नाटक मंडळी पाहिली नाहीं, हा त्यांच्यांतील विशेष गुण ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

येथपर्यंत उत्तम गुणी मनुष्य व उत्तम नट या दृष्टीनें नाटेकर यांच्या चरित्राचा विचार झाला, आतां दुसऱ्या दृष्टीनें विचार करावयाचा, तो न केल्यास त्यांच्या चरित्राची एकच बाजू दाखविल्यासारखी होईल. सबब त्या दृष्टीनें विचार करूं.

बाळकोबा इतके गुणी होते कीं,त्यांच्या इतका त्यांच्या कलेंत दुसरा क्वचितच सांपडेल.परंतु त्यांच्या पाश्चात त्यांच्या गुणांचा अल्पांशही त्यांच्यापासून मिळालेला कोठें शिलक नाहीं. आमच्या समाजांत विद्यादानासारखें पुण्य दुसरें नाहीं अशी समजूत आहे. परंतु दुर्दैवानें एक फार मोठा दुर्गुण त्यांत पसरलेला आहे; व त्यामुळें वरील समजुतीचा आचरणावर मोकळ्या दिलाचा परिणाम झालेला सहसा दिसून येत नाहीं. हा दुर्गुण ह्मणजे कलारहस्य ( Trade-Secret ).

व्यापारी दृष्टीनें पाहिलें असतां कोणाही मनुष्यानें आपल्या कलाकौशल्यांतील विशेष रहस्य गुप्त ठेविलें पाहिजे असें कबूल करावें लागेल; परंतु या रहस्यगोपनाचा अधिकार आमरण बजावीत बसविण्याचा एकाद्या हेकड व्यक्तीनें आग्रह धरिल्यास तो समाजाच्या प्रागतिक हिताला अपायकारक झाल्यावांचून राहणार नाहीं. प्रत्येक व्यक्तीला आपलें आयुष्य हितकर करण्यांत समाजाकडून पुष्कळच मदत मिळते; उलटपक्षीं, समाजही व्यक्तीच्या आयुष्यापासून स्वतांच्या कांहींतरी चिरकालीन फायद्याची अपेक्षा करीत असतो. आमच्याकडे मात्र समाजाच्या या कायदेशीर व न्याय्य अपेक्षेकडे स्वार्थपर दृष्टीनें डोळेझांक करण्यांत येते. एकाद्याला एकादी विशेष खुबी सांपडली की त्यानें प्राणापलीकडे लपवून ठेविलीच! मग त्याच्या मरणकाळीं त्याच्या प्राणाबरोबरच त्याची कलाही नापत्ता व्हावयाची. गुजराथेंतील पाटण शहरचें कुंभारकाम फार कुशलतेचें असतें. परंतु या कुशलतेनें अजून पाटणच्या तटाबाहेर पाऊल टाकिलें नाहीं. कुंभार लोक ही विद्या आपल्या मुलींना न शिकवितां सुनांस मात्र सांगतात. कारण मुली दुसऱ्या घरीं जाणाऱ्या! प्राचीन काळच्या ऋषींनां या कल्पनेनें पछाडलें नाही हें सुदैवच ह्मणावयाचें व त्यामुळेंच वेद, शास्त्रें पुराणें, गायन, वैद्यक इत्यादि विद्या आमच्या समाजांत परंपरेनें गुरुमुखानें शिष्यांस प्राप्त होत आल्या आहेत. नाटेकर यांनीं अशी एखादी संस्था काढली असती तर त्यांच्या एखाद्या तरी गुणाचा कोणी शिष्य निपजला असता. इंदुरास नानासाहेब पानसे ह्मणून एक प्रसिद्ध पखवाज वाजविणारे होऊन गेले; त्यांच्याजवळ अनेक शिष्ये तयार होऊन गेले व ते त्यांच्या विद्येवर त्यांचें नांव चालवीत आहेत. पुण्यास निर्वाहापुरतें वेतन घेऊन विद्यादान करणाऱ्या तीन संस्था आहेत. हें उदाहरण त्यांच्या पुढें जागृत असता त्यांनीं आपलें नांव आपल्या पश्चांत चालविण्याचा कांहीं प्रयत्न केला नाहीं हें आश्चर्य आहे.

ग्यारिक व आर्यव्हिंगसारख्या परकीय प्रसिद्ध नटांचीं चरित्रें कोणी लिहिण्याचें मनांत आणील, तर तीं त्यास उत्तम रीतीनें लिहितां येतील; परंतु नाटेकराच्या मृत्यूच्या पश्चात महिन्याच्या अवकाशांतही त्यांच्याबद्दल आह्मांस विशेष माहिती मिळू नये हा आमच्यांतील गुणी मनुष्याबद्दलचा आमच्यांत अनादर



कै० बळवंतराव जोग.

चि. शा. पुणें.

असल्याचाच दोष समजला पाहिजे. व त्यामुळें नाटेकर यांच्यासंबंधानें याहून विशेष कांहीं लिहितां येत नाहीं. तथापि त्यांच्याशीं जो थोडा काल प्रस्तुत लेखकाचा सहवास होता त्यावरून एवढें सांगतां येतें कीं, ते मोठे विनोदी व स्वभावाचे करारी होते. मंडळीचा संबंध सुटल्यामुळें त्यांची वरीच नुकसान झाली, होती तरी शेवटपर्यंत ते काटकसरीनें आपल्या गाण्यानें जें मिळेल तेवढ्यावर संतोषानें राहिले होते. आलीकडे दोन वर्षें त्यांना सरकारी ट्रेनिंग स्कूलमध्यें गायनवर्गावर शिक्षकाची नोकरी होती. त्यांनीं गायनशास्त्रावर विद्यार्थ्यांकरतां क्रमिक पुस्तकें लिहिलीं आहेत तीं त्यांच्या पश्चात कशीं प्रसिद्ध होणार आहेत हा एक प्रश्न आहे.

नाटेकर यांची कुटुंबस्थिति कांहींशी निराशाजनक आहे. त्यांचे एक बंधु वकील होते, परंतु ते अकालींच मृत्युमुखीं पडेल. त्यांच्या पश्चात त्यांची आसन्नमरण वृद्ध मातोश्री आहे. शिवाय त्यांची पत्नि व एक मुलगी एवढा त्यांचा परिवार आहे.

किर्लोस्कर मंडळी प्रथम स्थापन झाली त्यावेळचे फक्त दोनच इसम अवशेष राहिले होते, त्यांपैकीं नाटेकर गेल्यानें आतां एकच बाकी राहिले आहेत. नाटेकरादिकांनीं पेरलेल्या बीजाचा " किर्लोस्कर संगीत नाटकगृह " हा वृक्ष पाहण्यास ते विद्यमान होते ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय. बाळकाबाचें मृत्युसमयीं वय ५५ वर्षांचें असावें.

# बळवंतराव जोग.

एका महिन्याचे अंतरानें महाराष्ट्रांतील दोन प्रसिद्ध नट या जगद्रंगभूमीवरून अस्तंगत झाले. संगीतांत जसे नाटेकर प्रभृति तसा गद्य नाटकांत वरील नट अद्वितीय होता. गद्य नाटकें करणारी इचलकरंजीकर मंडळी उदयाला आल्यावर संगीत नाटकाची टूम निघाली व तिच्यामुळें एकेक जुन्या नाटक मंडळ्या मोडकळीस आल्या. त्यावर प्रथम जी गद्य नाटकें करणारी मंडळी निघाली ती **शाहूनगरवासी नाटक मंडळी** होय. ही प्रथम

सुमारें वीसवर्षापूर्वी पुण्यांत आली. ह्यावेळीं तिच्यांत कित्येक होतकरू नटाचा समुदाय दिसून आला. प्रथम मंडळी गरीब स्थितींत होती तरी जीर्ण वस्त्रांत सोनें जसें आपल्या स्वयंप्रकाशानें चमकावें तसे मंडळीचे गुण त्या स्थितींतही चमकूं लागले. व ती पुणेकरांच्या आश्रयास पात्र झाली. मंडळी त्या वेळीं " कांतीपूरचे दोन गृहस्थ "-Two gentlenmen of Verona-" झोपी गेलेला जागा झाला" – " मंजुघोषा " " ह्यामलेट " " सिंबेलाईनतारा, " "बाजीराव मस्तानी" अशीं नाटकें करी. त्यांमध्यें गणपतराव जोशी, गोविंदबोवा, सुपेकर, प्रस्तुतचें चरित्रविषयक नट, जोशी बोवा, शास्त्री बोवा इत्यादि नटांचे अंगचे गुण हळू हळू लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. पुढें या मंडळीस कै० वासुदेव बालकृष्ण केळकर, नारायण बापूजी कानिटकर, रा. देवल इत्यादि नाटककारांनीं हातीं धरून त्राटिका, बाजीप्रभू, झुंजारराव, फाल्गुनराव, इत्यादि नाटकें रंगभूमीवर आणविलीं. त्यांत नायिकेच्या बहुतेक भूमिका जोग यांजकडे होत्या. त्या अत्युत्तम रीतीनें जोग यांनीं नटवून दाखविल्या आहेत. नायिकेच्या भूमिकेला अवश्यक असे रूपसौन्दर्यादि गुण व त्या करून दाखविण्याची बुद्धि स्वभावतः असल्यानें त्यांच्या अंगीं इतर शिक्षणाची उणीव होती हे त्यांच्या भूमिकेच्या कामांत कोठेंही दृष्टीस पडत नसे. त्यांच्या भूमिकेवर सर्व लोक फिदा असत यांत नवल नाहीं. पण चांगल्या चांगल्या विद्वान लोकांनीं त्यांच्या गुणाबद्दल माना डोलविल्या आहेत. संगीतांत भाऊराव कोल्हटकर यांनीं जो मान मिळविला तो बळवंतराव यांनीं नाटकाच्या गद्य शाखेंत मिळविला आहे. कांहीं काळ " शाहूनगरवासी " मंडळीसारख्या गुणी मनुष्यांच्या गुणांमुळेंच नाटक संस्था वजनदार होऊन बसली होती. विद्वान लोकांपैकीं बहुतेक नाट्यकलाविशारद्–कै० नारायणराव गोपाळ फाटक, शंकर मोरो रानडे, व रा० रा० दादासाहेब खापर्डे यांच्यासारख्यांच्या ज्ञानाचा फायदा या मंडळीस मिळत गेल्याकारणानें त्यांच्या गुणांत भरच पडत चालली होती. सारांश महाराष्ट्रनाट्यकलेच्या गद्य भागांत इतिहासांत लिहिण्यासारखी कामगिरी या मंडळीनें केली आहे व तिचे बरेच श्रेय या मंडळींतील नायक नायिकेच्या अभिनय कौशल्यावरच आहे.

आमच्या नाटकमंडळ्यांतून स्त्रियांचीं कामें स्त्रिया करीत नाहींत हा प्रकार गौण आहे असें कित्येकांचें मत आहे. नीतिदृष्ट्या या प्रश्नाचा येथें विचार कर्तव्य नाहीं. त्यांचें निराकरण आजपर्यंत स्त्रियांच्या भूमिका करण्याच्या कामांत जे प्रसिद्ध होऊन गेले आहेत त्यांनींच केलें आहे. कोल्हापूरकर नाटकमंडळींतील विनायकराव कवठेकर, इचलकरंजीकर मंडळींतील विष्णूपंत आपटे व प्राकृत चरित्रविषयक जोग यांच्या इतकें स्त्रीपात्रांच्या निरनिराळ्या रसादि अभिनयाचे प्रतिबिंब कोणत्याही स्वतःसिद्ध स्त्रीपात्राला दाखविता यावयाचें नाहीं. नाटकांमध्यें अस्सलापेक्षां नकलेचीच मौज अधिक असते. पुरुषपात्रानें स्त्रीच्या भूमिकेची नक्कल करून दाखवावयाची असते. व स्त्रियांना स्वतःचेंच प्रतिबिंब दाखवावयाचें असतें. प्रत्यक्ष आरसा, आणि तिसऱ्यानें आरशासारखें दिसणारें हुबेहुब काढलेलें चित्र यामध्यें कसबाच्या दृष्टीनें जें अंतर तेंच प्रत्यक्ष स्त्रीपात्र व स्त्रियाची भूमिका करणारें पात्र या मध्यें अंतर आहे. व बळवंतराव जोग यांनीं आपल्या कारकीर्दींत तें सत्यकरून दाखविलें आहे. स्त्रीपात्रांची भूमिका ह्मणजे स्त्रियांसारखें " मी येतें " मी करतें " मी बोलतें " इत्यादि स्त्रीवाचक शब्दांचा उपयोग करणें किंवा त्यांच्यासारखें नटणें, मुरडणें यांत आहे अशा समजुतीनें जर स्त्रियांचीं कामें करावयाचीं असतील तर ती गोष्ट अगदीं साधी आहे. ती प्रत्यक्ष स्त्रियांनीं केली तरी हरकत नाहीं. परंतु यापेक्षां स्त्रीपात्राच्या भूमिकेकडे अधिक कार्य भाग असतो. मनोविकारांच्या निरनिराळ्या भावना जितक्या पुरुष पात्रांकडून स्त्रियांच्या भूमिकेंत दाखविल्या जातात तितक्या प्रत्यक्ष आमच्या नाटकांतील स्त्रियांकडून दाखविल्या जात नाहींत असा आजपर्यंतचा अनुभव आहे. असो. स्त्रियांच्या भूमिकेशिवाय पुरुषांच्याही भूमिका—झुंझारराव, पानिपतचा मुकाबला, तुकाराम इत्यादि नाटकांतून त्यांनीं केल्या आहेत. व त्याही ते चांगल्या वठवीत असत.

या पाश्चात्त्यां योगानें मराठी भाषेंत कांहीं चांगलीं नाटकें पुढें आलीं आहेत. शेक्सपीयरच्या नाटकाशीं पूर्ण परिचय होऊन गद्य रचनेकडे ग्रंथकारांची प्रवृत्ति होण्यास कारण शाहुनगरवासींतील बळवंतराव व गणपतराव हीं दोन पात्रें होतीं. त्याकबेथ, राणाभीमदेव, पानिपतचा मोकाबला इत्यादि नाटकें या दोन पात्रांचीं

कल्पना घेऊन ग्रंथकारांनीं लिहिल्यासारखीं दिसतात. पर्यायानें या पात्रांचे मराठी भाषेवर उपकार समजले पाहिजेत. नट आणि नाटककार हे भाषेच्या प्रगतीचे कार्य कसें करितात याचें उदाहरण या पात्रावरून चांगलें ध्यानांत येणार आहे. सौभद्र व रामराज्यवियोग या संगीत नाटकांची उत्पत्ति होण्यास जसे संगीतांतील आद्यनट–कोल्हटकर, नाटेकर, वायलीकर इत्यादि–कारणीभूत झाले आहेत, त्याप्रमाणें गद्य नाटकांपैकीं वर निर्दिष्ट केलेलीं नाटकें उदयास येण्यास गणपतराव, बळवंतरावासारखीं पात्रें कारणीभूत आहेत. याप्रमाणें प्रस्तुत चारित्राविषयक पात्रांच्या गुणासंबंधानें व त्यानें आपल्या हयातींत नाट्यकलेची सेवा केली त्यासंबंधानें लिहितां येण्यासारख्या गोष्टींचा उल्लेख केला आहे. आतां त्याचा दुसऱ्या बाजूचा इतिहासदृष्ट्या विचार करणें अवश्य आहे.

भाऊराव कोल्हटकर व जोग यांच्या चरित्रांत कित्येक गोष्टींत साम्य आहे. दोघांनींही आमरण नाट्यकलेचें ब्रीद कंठांत धारण केलें होतें. दोघेही अकालीं मृत्युमुखीं पडले. दोघेही आपआपल्या कलेचे कंठमणी होते. दोघेही एकाच परिस्थितींत होते. परंतु एकानें नाट्यकलेला स्वतः बुडन सावरून धरलें व दुसऱ्यानें स्वतः सुद्धां रसातळास नेलें. किर्लोस्कर मंडळीच्या नाटकें पाहण्यास लोकांच्या जितक्या उडया पडत होत्या तितक्याच शाहुनगरवासीच्या नाटकांसही पडत होत्या. परंतु भाऊराव आपल्या नाटकाचें तारूं आवरून धरण्याकरितां मरेपर्यंत सावध होते. व जोग यांच्या दृष्टीदेखत त्यांच्या नाटकाचें तारूं भटकत चाललें होतें तरी ते बेसावध राहिले होते. आपल्या नाटकांस आपण असतांना पहिल्याइतकें प्रेक्षक कां जमत नाहींत याचा जोग यांनीं विचार केल्याचें दिसून आलें नाहीं. त्यांच्या बरोबरीचे एकेक चांगले चांगले नट त्यांना सोडून का जातात या गोष्टीबद्दलही त्यांनीं विचार केल्याचें दिसून आलें नाहीं. या सर्व गोष्टींचा यामुळें परिणाम असा झाला कीं, जी एक संस्था नांवारूपास आली होती व ती तशीच राहती तर नाट्यकलेंत एक भूषणरूप होऊन बसली असती, ती अशा रीतीनें हळूहळू अधोगतीस गेल्याकारणानें नाटकमंडळीची व तिच्याबरोबर कलेची एक प्रकारची हानि झाली आहे. व सर्व हे अनर्थ टळ-

ण्याचे बळवंतराव यांनीं आपल्या धंद्यांत चांगलें लक्ष ठेवलें असतें तरच शक्य होतें. शाहुनगरवासी मंडळीस तिच्या हितचिंतक मित्रांनीं अनेक प्रकारचें साह्य केलें आहे व ती मंडळी पुन्हां उर्जित दशेला यावी ह्मणून कित्येकांनीं तनमनधन खर्च केलें आहे हें सर्वश्रुत आहे. परंतु बळवंतराव यांस त्यांच्या कित्येक मित्रांनीं, नाटक मंडळ्यांना भोंवऱ्यांत पडण्याचे जे जे प्रसंग असतात त्यांपासून दूर केल्याचें दिसत नाहीं. अशा प्रसंगीं 'save me from my friends " असें ह्मणण्याची पाळी येते. व तीच पाळी बळवंतरावावर त्यांच्या कित्येक स्नेही मंडळीपासून आली असली पाहिजे. कारण ज्या ज्या वेळीं गाफीलपणानें खेळ बंद होण्याचे प्रसंग आले आहेत त्यावेळीं त्याला कारण एकटे बळवंतरावच असतील असें संभवनीय नाहीं. तेव्हां असे प्रसंग त्यांच्या स्नेही मंडळीनें टाळले असते किंवा बळवंतरावांचें आपल्या धंद्याकडे दुर्लक्ष आहे याबद्दल त्यांनीं बळवंतरावांचा स्नेह सोडला असता तर त्यांत बळवंतरावांचें कल्याणच झालें असतें. परंतु तशी गोष्ट त्यांचे हयातींत घडून आली नाहीं ही मोठी शोचनीय गोष्ट बळवंतरावांच्या आयुष्यक्रमांत घडून आली.

प्रस्तुतच्या पिढींत रंगभूमिवर जे नट कामें करीत आहेत, त्यांत आपल्या अभिनयादि गुणांनीं प्रसिद्ध असे चार पांच तरी निघतील कां नाहीं ही शंका आहे. परंतु जे प्रसिद्ध असतील त्यांत जोग हे प्रसिद्ध नटांपैकीं प्रमुख होते. तेव्हां धंद्याच्या दृष्टीनें त्यांच्या आयुष्यक्रमाचा विचार करणें भाग पडलें. यांच्या योगानें यांच्या धंद्याची भरभराटी, कुटुंबाची भरभराटी व यांच्या मंडळींतिल प्रत्येक नटाची भरभराटी झालेली जर लोकांस दिसून आली असती तर नव्या पिढीला या धंद्याविषयीं आदर व स्पृहा उत्पन्न झाली असती. व बळवंतरावाचें अनुकरण करणारी पात्रें रंगभूमीवर अनेक दिसलीं असतीं. परंतु अनेक कारणांनीं नाटकाच्या धंद्याच्या चांगल्या गोष्टी लोकांच्या प्रत्ययास आल्या नसल्यामुळें त्याचा प्रगतीमार्ग कांहीं दिवस तरी खुंटून राहिला ह्मणण्यास हरकत नाहीं. उत्तम नट या नात्यानें त्यांस जो मान द्यावयाचा तो लोकांनीं दिला आहे. परंतु त्यांच्या पश्चात त्यांच्या धंद्याला मान मिळण्यासारखी त्यांची कांहीं कृति मागें राहिली नाहीं ही गोष्ट बरी झाली नाहीं असें ह्मटलें पाहिजे.

बळवंतराव हे राजापूर येथें आपल्या घरीं गेले असताना आजारी पडून फेब्रुवारी ता. १९ सन १९१० रोजीं वारले. मृत्युसमयीं त्यांचें वय ३८ वर्षांचें होतें. यांचे पश्चात यांचें कुटुंब व वृद्ध मातोश्री आहे. शाहूनगरवासी मंडळीचे अध्वर्यु गणपतराव यांचा व जोग यांचा बाळपणापासून अकृत्रिम स्नेह होता. पडत्या काळांत पहिल्यापैकीं बहुतेक मंडळी कमी झाली होती तरी हे उभयतां एकोप्यानें असल्यानें तशा स्थितींतही निश्चयानें त्यांनीं मंडळी चालविली होती.

# नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळीचे मालक व नट.



रा० गोपाळ अनंत मराठे.



रा० महादेव विष्णु केळकर.



रा० वासुदेव सदाशिव पटवर्धन.

# नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळींतील दोन प्रसिद्ध नट.



रा० रामचंद्र गणेश कुंदगोळकर.



रा० सिताराम नारायण बापट.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

( वर्ष ३ अंक ७ वरून पुढें चालू. )

## नाट्यकलाप्रवर्तक समाज मंडळी

गेल्या प्रकरणांत एका नटाचा मृत्युलेख लिहितांना नाट्यकलेवर त्याच्या चरित्राचा परिणाम कोणत्या प्रकारचा झाला आहे यासंबंधानें निरुपायानें परंतु जरा स्पष्टोक्तीनें लिहिणें भाग पडलें होतें. प्रस्तुतच्या पिढींतल्या नटांचीं चरित्रें नाट्यकलेच्या भावी इतिहासाची सामुग्री ह्मणून द्यावयाचीं आहेत. महाराष्ट्रांत आजपर्यंत अनेक नाटकमंडळ्या होऊन गेल्या, परंतु त्यांनी आपल्या पश्चात् आपलें स्मरण राहील अशी एकही गोष्ट करून ठेवली नाहीं. किंबहुना त्यास ती कल्पनाही नव्हती. सुदैवानें अलीकडे त्या स्थितींत पालट पडत चालल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. बऱ्याच नाटकमंडळ्यांना आपलें समाजाशीं व स्वतांशीं कर्तव्य समजूं लागलें आहे; व समाजहि त्यांच्यापासून शक्य तितका आपल्याकडून पोंचला जाणाऱ्या आश्रयाचा मोबदला घेण्याची संधि वाया जाऊं देत नाहीं. अशा अन्योन्य शिष्टाचाराच्या संबंधानें एकमेक बांधले जात असल्यामुळें नाट्यसमाज आणि प्रेक्षकसमाज यामध्यें सलगी दिसत आहे. या संबंधापासून निष्पन्न होणारा कार्यभाग हाच नाट्यकलेचा पुढें इतिहास होणार आहे. गेल्या पंधरा वर्षांत एकंदर परिस्थितींत नाट्यकलेच्या उत्क्रांतीचें तत्त्व ज्या नाटकमंडळ्यांच्या डोक्यांत घोळूं लागलें आहे त्यांत वरील नाट्यकलाप्रवर्तक मंडळी ही एक आहे. एकोपा, व्यवस्थितपणा, परिश्रम इत्यादि गोष्टींत नाटक मंडळ्यांविषयीं जो पूर्वापार लोकांचा एक समज होत आला आहे त्यावर बरेंच पांघरूण घालून विद्यमान स्थितींत तिनें आपल्यास लोकादरास पात्र करून घेतलें आहे. संगीत नाटकमंडळ्यांवर मधून मधून निरनिराळ्या कारणांनीं गंडांतरें यावयाचीं असतात. त्यापैकीं, मुख्य गंडांतर ह्मणजे संगीत पात्रांची दुर्मिळता होते तेव्हां; दुसरें पात्रांच्या ठिकाणीं फाजील महत्त्वाकांक्षा उत्पन्न होते तेव्हां; तिसरें मंडळ्यांच्या चालकांत परस्परावर विश्वास नसतो तेव्हां; व चौथें चांगल्या पात्रांच्या अभावीं मंडळयास द्रव्याभावामुळें वाईट स्थिती येते तेव्हां.—हीं गंडांतरें चुकवून नाटकमंडळीचें सुकाणूं तिच्या चालकास चालवावयाचें असतें.

नाटयकलाप्रवर्तक संगीत मंडळी जवळ जवळ या सर्व प्रकारच्या अडचणींतून पार पडली आहे. मंडळीच्या चिकाटीनें व दृढनिश्चयानें तिला आज सुस्थिति प्राप्त झाली आहे. नाटकमंडळ्याची काय किंवा कोणत्याही संस्थेची काय अंतर्व्यवस्था बरोबर असली ह्मणजे बाहेरची दिखाऊ बांधणी बांधून घेण्यास अडचण पडत नाहीं. नाट्यकला मंडळीनें दोन्ही गोष्टी साध्य करून घेतल्या आहेत व आज भित्तीस तिचें नांव चांगल्या नाटकमंडळ्यांत निघत आहे याबद्दल आह्मास अभिमान वाटत आहे.

महाराष्ट्रीय नट या सदरांत यापूर्वीं जीं नटांचीं चरित्रें आलीं आहेत तीं दुर्दैवानें त्यांच्या पश्चात् लिहिण्यांत आलीं आहेत. या खेपेचीं चरित्रें फक्त महाराष्ट्र मंडळींतील मायदेव यांच्या चरित्राशिवाय, त्यांच्या विद्यमान स्थितींत देण्याचा योग येत आहे याबद्दल आम्हास आनंद वाटतो. पुढील नटांचीं आयुष्यांतील वीस पंचवीस वर्षें नाटकांच्या धंद्यांत गेलीं आहेत. त्यांनीं नाटक-धंद्याला अपवादक गोष्टींचा परिणाम आपल्या वर्तनावर घडूं दिला नाहीं. त्यामुळें त्यांच्या चरित्रक्रमांत आतां स्थैर्य आलें आहे व त्यामुळें चरित्रविषय होण्यास त्यांच्या अंगीं पात्रता आली आहे अशी आमची समजूत आहे.

## गोपाळ अनंत मराठे.

रहाणार विलिये तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी. यांचा जन्म शके १७९४ चैत्र शु. ४ स झाला. हे ना. क. प्र. सं. मंडळींतील नायिकेची भूमिका करणारे नट लोकप्रसिद्ध आहेत. गायनकेलेला अभिनय व सुरूपता यांची जोड मिळून रंगभूमीवर रंगदेवता यांना साध्य असलेमुळें लोकप्रिय नटमालिकेंत यांची गणना लोकांकडून करण्यांत येते. शेक्सपियरचीं जीं नाटकें मराठींत झालीं आहेत त्यांत "विकल्पविमोचन" "प्रियाराधन" "समानशासन" "तारा" "Winters tale," "All's well that ends well" "Measure for measnre Cymbiline" इत्यादि नाटकांत यांच्या नायिकेच्या भूमिका अभिनय आणि गायन दोन्ही दृष्टीनें चांगल्या होत असत. हे थोडे दिवस किर्लोस्कर संगीत मंडळींत, कांहीं दिवस वाशीमकर संगीत मंडळींत असून नंतर सुमारें पंधरा वर्षांपूर्वी इतर दोघांबरोबर प्रस्तुतची "नाटयकला प्रवर्तक संगीत"

नांवाची मंडळी यांनीं स्थापन केली. सांप्रत तिच्या आधारस्तंभांपैकीं हे एक असून अलिकडे हे नायकाची भूमिका कित्येक नाटकांतून करूं लागले आहेत. शेक्सपीअरचीं नाटकें महाराष्ट्रभाषेंत उतरविण्याचें बहुतेक श्रेय नाट्यकला-प्रवर्तक मंडळीस आहे. व एकेकाळीं " विकल्पविमोचन " नाटकाचा या मंडळीचा प्रयोग अत्यंत लोकप्रिय होण्यास यांत रा. मराठे यांची राणीची भूमिका बऱ्याच अंशानें कारण झाली होती. शेक्सपीअरचीं नाटकें संगीतांत करण्याकरितां एखाद्या चांगल्या विद्वान गृहस्थाच्या हातांत पडतीं तर कदाचित् तीं याहीपेक्षां लोकप्रिय झालीं असतीं, व त्यांत मराठे यांची कुशलता अधिक नजरेस पडती. परंतु संगीताच्या दृष्टीनें तीं नाटकें अगदीं गौण झाल्यामुळें मराठे यांच्या गाण्याचा ठसा लोकांच्या ध्यानांतून तीं नाटकें मागें पडल्याबरोबर पुसट दिसूं लागला. तीच यांची मथुरेची भूमिका किर्लोस्कराच्या प्रासादिक कवित्वामुळें भाऊराव कोल्हटकर यांच्या खालोखाल होत असे असें लोकमत आहे. " संतापशमन " हें नाटकहि कांहीं दिवस हे नायिकेची भूमिका करीत असतांना लोकप्रिय होतें. प्रत्येक पिढींत नाटकमंडळींत प्रसिद्धीस येणारीं कांहीं पात्रें असतात, गेल्या पिढींत भाऊराव कोल्हटकर हे किर्लोस्कर मंडळींतील नायिकेच्या कामांत विशेष प्रसिद्धीस येऊन गेले. व नाट्यकला प्रवर्तक मंडळींत त्यावेळीं मराठे यांचें नांव निघत असे. यापुढें नायकाच्या कामांत हे आपलें नांव लौकरच पुढें आणतील अशी आम्ही आशा करितों.

## महादेव विष्णु केळकर.

रहाणार पुणें. यांचा जन्म शके १७९० पौष शु. १४ स झाला. हे नाट्यकला प्रवर्तक संगीत मंडळींतील नायकाची भूमिका करणारे नट असून याच मंडळीच्या मूळ आधारस्तंभांपैकीं एक आहेत. यांचा आवाज गोड, निकोप व स्पष्ट आहे. हरिश्चंद्र, वसिष्ठ यांसारख्या सात्विक भूमिका हे उत्तम वठवितात. मराठे यांच्याप्रमाणें हे पूर्वीं वाशिमकर मंडळींत होते. परंतु " रासेलस " गोष्टींतलीं पात्रें आनंदगुहेंत सर्व प्रकारच्या सौख्यांत होतीं तरी संतुष्ट नव्हतीं. त्यांना बाहेरचा मोकळा वारा पाहिजे होता. त्याप्रमाणें केळकर, पटवर्धन,

बापट इत्यादि मंडळी वासिमकर मंडळींत चांगल्या स्थितींत होती. ती मंडळी सोडून हा गटच्या गट एकदम तेथून निघाला. हा का निघाला हें जरी आह्मांस सांगतां येत नाहीं तरी एवढें सांगू शकू कीं, तेथें राहून हल्लीं जी त्यांना सुस्थिति प्राप्त झाली आहे ती त्यांना तथ प्राप्त करून घेतां आली नसती. ईर्षेनें त्यांनीं स्वतंत्र मंडळी काढली तिच्यांत त्यांना यश आलें. सुधारणेच्या वाऱ्याचा सञ्चार त्यांच्या अंतःकरणांत पुरा झाला होता. व त्याच्या द्वारें नव्या मंडळीचें सुकाणूं ते उत्तम रीतीनें चालवीत आले आहेत.

नाट्यकलेच्या घटनेंतील नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळी हा एक घटक आहे. या मंडळीच्या नवीन घटनेनें नाट्यकलेंत एक पायरी पुढें चलन झालें. केळकर, मराठे, पटवर्धन हे वासिमकर मंडळींतले घटक असतांना यांच्या भूमिका सौभद्र, शाकुंतल इत्यादि गासांदिक नाटकें शिवाय करून संभाजी, विक्रमशशिकला, सत्यविजय, संतापशमन इत्यादि सामान्य लोकांना करमणूक करून देणाऱ्या नाटकांतून दिसत असत. त्या स्थितींत पालट करून वरील मंडळींनीं शेक्सपीयरच्या नाटकाच्या रूपानें लोकांस नवी अभिरुचि उत्पन्न केली. हें स्थित्यंतर घडवून आणण्याच्या कामांत केळकर यांच्या प्रमाणेंच यांचे भागीदार--

## वासुदेव सदाशिव पटवर्धन

हेही आहेत.

हे रत्नागिरी जिल्ह्यांतील पेमेडी गांवचे रहाणारे. यांचा जन्म शके १७८९ वैशाख व. ५स झाला. हे नाट्यकला प्रवर्तक मंडळींतील नायकाची भूमिका करणारे प्रसिद्ध नट आहेत. यांचा आवाज मधुर नाहीं तरी यांचीं पद्यें हाणण्याची पद्धत स्पष्ट आहे. व कोणतेंही काम हे समजून करितात. रा. मराठे आणि केळकर यांनीं ज्यावेळीं वाशिमकर सोडली त्यावेळीं हे त्यांच्याबरोबर तिच्यांतून निघाले; व त्यांच्याप्रमाणेंच हे नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळीच्या आधारस्तंभांपैकीं आहेत. आज पंधरा वर्षें यांनीं संस्था जुटीनें व चांगली चालविली आहे. मंडळीला आज जी सुस्थिति प्राप्त झाली आहे, तिला कारण या तिघा "प्रवर्तकां"चे प्रयत्न आहेत. यांनी स्वतंत्र मंडळी स्थापन केल्यावर

तिला रा. शंकर आत्माराम पाटकर या सुप्रसिद्ध गृहस्थांकडून अभिनयाचें शिक्षण बरेंच दिवस मिळत गेलें. त्यामुळें पटवर्धन यांची कोणतीहि भूमिका प्रसंगानुरूप व वळणशुद्ध होते.

नाट्यकला प्रवर्तक मंडळीनें शेक्सपीयरच्या नाटकाची जशी लोकांस गोडी लावून दिली तशी प्रेक्षक समाजांतही नव्या अभिरुचीची लालसा उत्पन्न झाली होती. या दोन्ही गोष्टींचा संगम या मंडळीच्या भरभराटीस विशेष कारण झाला. मराठे यांच्याविषयीं लिहितांना "शेक्सपीयरचीं नाटकें संगीतांत हल्लीं आहेत यापेक्षां चांगल्या मनुष्याकडून भाषांतर केलीं गेलीं असतीं तर पाहिजे होती ह्मणून जें आम्हीं विधान केलें आहे; त्याचें तात्पर्य इतकेंच कीं, तीं नाटकें साधारण भाषांतर झालीं असूनही लोकांना जीं तीं आवडलीं, याचें कारण पुढील उताऱ्यांत फारच चांगलें दिलें आहे:

"The polite world, too, by their decent attention, their sensible taste, and their generous encouragement of poets and players, saw that the stage was, in deed capable of becoming what the judicious of all ages thought it might be-the most rational plan that could be formed to dissipate, with innocence, the cares of life-to allure the ill-inclined from their evil medetations—and to give the leasure hours of business and of virtue instructive recreation."

[ सुशिक्षित लोकांसही नाटकविषयाची योग्य आवड व अभिरुचि उत्पन्न झाली होती. त्यांच्याकडून नाटककार व मंडळ्या यांना उदार मनानें उत्तेजन मिळत होतें यावरून त्यांच्या ध्यानांत आलें असलें पाहिजे कीं नाट्यकला कशी असावी याबद्दल आजपर्यंतच्या समंजस लोकांचा जो अभिप्राय आहे, त्याप्रमाणें तिच्यांत शक्ति आहे. ह्मणजे नाटक हें संसाराच्या अनेक काळज्या सिध्या मार्गानें घालविण्याचा उत्तम उपाय आहे. नाटकाच्या योगानें दुष्ट लोकांना अविचारापासून परावृत्त करतां येईल. आणि उद्योग आणि कर्तव्य केल्यानंतरच्या वेळांत बोधपर करमणूक घेतां येईल. ]

याप्रमाणें विचार गेल्या पिढीपासून आमच्याही सुशिक्षित लोकांच्या

डोक्यांत घोळूं लागले. त्याचा फायदा नाटयकला प्रवर्तक संगीत मंडळीनें घेतला आहे. धंद्याच्या दृष्टीनें या प्रवर्तकापैकीं एकाचें जें चरित्र तेंच दुसऱ्याचें व दुसऱ्याचें तेंच तिसऱ्याचें आहे, व या तिघांच्या जुटीनें ही मंडळी आज चांगल्या स्थितींत आहे, याबद्दल ती स्तुतीस पात्र आहे यांत शंका नाहीं.

## रामचंद्र गणेश कुंदगोळकर.

रहाणार कुंदगोळ. इ० जमखिंडी. जन्म शके १८०७ मार्गशीर्ष व. ६. ना. प्र. सं. मंडळीला या नटाची जोड दोन वर्षांपूर्वी मिळाली. त्या पूर्वी हे सुप्रसिद्ध गवई प्रो. अबदूलकरीमखां बडोदेकर यांचे जवळ गायनकलेचें शिक्षण ६-७ वर्षे घेत होते. त्या अवधींत त्यांनीं ती कला चांगली अवगत करून घेतली आहे.नवीन नट या दृष्टीनें पाहतां हे आपल्या भूमिका चांगल्या तऱ्हेनें करितात असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं; तथापि याबद्दल त्यांची स्तुति करण्यापेक्षां त्यांनीं आपल्या गायनविद्येचा उपयोग नाट्यकलेच्या कामीं लावण्याचा संकल्प केला आहे, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. भावी पिढीला यांच्यासारखी तरुण गाणारी मंडळी आतां अवश्य आहे. मात्र त्यांनीं नाटकाच्या धंद्यांत जे ठिकठिकाणीं नटांना अधोगतीला नेणारे धोके आहेत, त्यांपासून अलिप्त राहण्याचा निग्रह एव्हांपासून ठेवावा. कारण त्यांच्या स्थितींतल्या नटांना वाईट मार्गाला नेण्याला त्यांच्या भोंवतालीं जें ग्रहमंडल जमतें तेंच विशेषतः कारण होत असतें. या मंडलाच्या पाशांत किंवा फासांत न सांपडणारा नट खरोखरच धंद्याचें व स्वतःचें महत्त्व आळखतो असें समजलें पाहिजे.

## सीताराम नारायण बापट.

रहाणार कोल्हापूर. जन्म शके १७८४ चैत्र शु १०. हास्यरस उत्पन्न करणाऱ्या निरनिराळ्या भूमिका हे फार चांगल्या करितात, अशाबद्दल बापट यांची फार ख्याति आहे. विनोदी नटाला अवश्य असें प्रसंगावधान, समयस्फूर्ति इत्यादि गुण यांचे अंगीं स्वाभाविक आहेत. नाट्यकलेंत comic actors—

'विनोदी नटां–'चें फार महत्त्व असतें. आपल्या नाट्यकलेंत अशा नटांना आजपर्यंत विशेषसें क्षेत्र नव्हतें; परंतु इतर सुधारणेच्या आनुषंगिक गोष्टीबरोबर नाट्यकलेंत जी परकीय ज्ञानानें सुधारणा होत चालली आहे, तिच्या योगानें असल्या नटांना पुढें येण्याला नवीन मार्ग झाला आहे. रा. बापट यांचीं आयुष्यक्रमांतील सुमारें ३४ वर्षें नाटकधंद्यांत नट या नात्यानें गेलीं असून या मंडळींत हे प्रारंभापासून आहेत. हे पूर्वीं कोल्हापूरकर नाटकमंडळी, डोंगरे संगीतमंडळी, थोडे दिवस किर्लोस्करसंगीत मंडळींत होते. नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळींत संगीत नटाच्या बरोबरीनें यांची विनोदी नट या नात्यानें योग्यता आहे. यांच्याविनोदीपणांत ( wits ) कृत्रिमपणा नसून सहजपणा असतो. त्यामुळें हे रंगभूमीवर आले असतां लोकांस यांचा कंटाळा येत नाहीं.

दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, असे बुद्धिमान् नट या धंद्यांत असून शिक्षणाच्या अभावीं त्यांचे गुण एकांगी झाले आहेत. महाराष्ट्र भाषेच्या बाहेर नाट्यकलेचा इतिहास किती विस्तीर्ण आहे व नटाच्या ठिकाणीं महत्त्वाकांक्षा उत्पन्न होण्याला त्यांत किती जागा आहे याचें ज्ञान आमच्या इकडील नटांस नसल्यामुळें उंबरांतल्या रहिवाशाप्रमाणें आमच्या बहुतेक नटांची स्थिति झाली आहे, ही स्थिति केव्हां पालटेल ती पालटो !

## नारायण महादेव मायदेव.

रा. बापटाप्रमाणेंच मायदेव हे महाराष्ट्र नाटकमंडळींतील एक प्रसिद्ध विनोदी नट होते. महाराष्ट्र मंडळीच्या चालकांनीं नाट्यकलेंत सुधारणा करण्याच्या उद्देशानें आपलें तनमनधन वाहण्याचा संकल्प केला त्यावेळीं त्यांना जी मंडळी मिळाली, तिच्यांत मायदेव होते व ते हयात असे पर्यंत सुमारें आठ वर्षे त्यांनीं निरनिराळ्या विनोदी भूमिकांनीं नाटकमंडळीच्या लौकीकांत भर घातली.

पूर्वीच्या नाटकमंडळ्यांतून " विदूषक " होणाऱ्या विनोदी नटाचें फार महत्त्व असे. अशा नटास कोणत्य ही प्रकारचें शिक्षण नसे तरी स्वभावतः त्यांच्या अंगचे समयस्फूर्तीचे पुष्कळ गुण नाटकाच्या उपयोगीं पडत असत. अशा रीतीनें पूर्वीच्या पौराणिक नाटकांतून व्यंकणभट, पांडोबा वाटवे, धोंडोबा शेणवी, रा. गोपाळराव दाते वगैरे चांगले विनोदी नट प्रसिद्धीस आले होते. पुढें तीं नाटकें बंद झाल्यावर अशा नटांचे गुण उदयास येण्यास फारशी जागाच नव्हती. ती रा. कोल्हटकर व खाडीलकर यांनीं पुन्हां प्रचारांत आणली आहे. व त्यामुळें मायदेव यांचें नांव लौकरच प्रसिद्धीस आलें होतें. परंतु दोन वर्षांपूर्वीं आपली कीर्ति कायम करण्यापूर्वीं दुर्दैवानें ते आपल्या वयाच्या २५-२६ वे वर्षीं परलोकवासी झाले.



**नारायण महादेव मायदेव.**

महाराष्ट्र नाटक मंडळी.

मृत्यु ता. ९ फेब्रुवारी सन १९१०.

चित्रशाळा, पुणे.



कै० रा० नारायण दत्तात्रय जोगळेकर.

( वर्ष ४, अंक ४ व पु० चा० )

# नारायण दत्तात्रय जोगळेकर !

Astronomers and star-gazers this year,
Write but of four eclipses-five appear;
Death interposing, Burbage, and their staying,
Hath made a visible eclipse of playing. *

*MIDDLETON.*

**जन्म—फेब्रुवारी ता० ७ सन १८७५.**

**मृत्यु—नोवेंबर ता० १५ सन १९११.**

महाराष्ट्रीय नटांची चरित्र-मालिका रंगभूमींत देण्याचा क्रम सुरू केल्यापासून अगदीं थोड्याच अवकाशांत वरील सर्वमान्य, अत्यंत लोकप्रिय व प्रसिद्ध अशा नटाचें चरित्र व अकृत्रिम, उदार अंतःकरणाच्या व जिवास जीव देणाऱ्या लेखकाच्या मित्राचा मृत्यु-लेख लिहिण्याचा प्रसंग येईल ही कल्पना कोणाचीही नसेल. सृष्टिनियमाप्रमाणें आणखी पंचवीस तीस वर्षांनीं त्याच्या जीवमान कालीं त्याचें जीवनचरित्र देण्यासारखी ज्याची शरीरप्रकृति व योग्यता तो गृहस्थ कालाच्या निर्दय लहरीनें कायमचा दृष्टीआड झाल्यानें त्याला नुसत्या नांवानें ओळखणाऱ्या मनुष्याचेंही अंतःकरण दुःखानें दुभंग होऊन जाईल–मग त्याचा ज्याच्याशीं नित्य सहवास, त्याच्या अंगच्या अनेक सद्गुणांची ज्यास पुरी ओळख झालेली व त्याच्या या सद्गुणांच्या जोरावर महाराष्ट्रीय नाट्यसृष्टींत आजपर्यंत कोणीं न घडवून आणलेलें स्थित्यंतर दाखविण्याची ज्याची महत्त्वाकांक्षा अशा त्याच्या एकाद्या मित्राची काय स्थिति व्हावी ? ईश्वराच्या दरबारांत सद्गुणाचें बीज होतें असें सांगण्यांत येतें; परंतु झाडून सर्व हत्तीच्या गंडस्थळांत जसें मौक्तिक सांपडत नाहीं किंवा जंगलांत सर्व चंदनाचींच झाडें असत नाहींत त्याप्रमाणें सद्गुण हे प्रत्येक मनुष्याचे ठायीं परिपूर्ण भरलेले असत नाहींत. व

---

* Richard Burbage नांवाचा एक नामांकित नट १५६६—१६१९ मध्यें शेक्सपीयरच्या नाटकांतील भूमिका करणारा होऊन गेला, त्यासंबंधाचे वरील उद्गार आहेत.

ज्या थोड्या ठिकाणीं ते पुष्कळशा प्रमाणानें असलेले आढळून येतात त्यांची विल्हे-वारी जेव्हां अशा रीतीनें लागलेली पाहाण्यांत येते, त्या वेळीं, ईश्वराच्याच मनांतून जगांतल्या चांगुलपणाचे गुण या सृष्टींत ठेवावयाचे नाहींत कीं काय! असें म्हणण्याची पाळी येते. एकामागून एक घाले ३० वर्षांत किर्लोस्कर संगीत मंडळीवर तीनचार वेळां आल्यानें साहजिकच मन नास्तिक बनतें. जोगळेकर यांच्या मृत्यूचा घाला सर्वांत जबरदस्त, अचानक व मोठ्या हानीचा आहे.

किर्लोस्कर मंडळींत जे कर्ते पुरुष होऊन गेले त्यांनीं एकेका गोष्टींत आपापलें नांव कायम ठेवलें. पण जोगळेकरांनीं आपल्या कर्तबगारीचा कळस केला. किर्लोस्कर मंडळी भाऊरावाचे पश्चात् "नामशेष" होईल ही सर्व लोकांना भीति वाटत होती, परंतु जोगळेकर यांनीं तिचें नांव अधिक मजबुतीनें कायम केलें; हें त्यांच्या दहा वर्षांच्या कारकीर्दींत ज्या लोकोपयोगी संस्था त्यांनीं काढल्या त्यांवरून दिसून येत आहे. ते किर्लोस्कर मंडळीचेंच शिरोभूषण होतें एवढेंच नव्हे तर एकंदर नाट्यकलेचें तें भूषण होतें. नाटकांत शिरण्यापूर्वींचा जो त्यांचा व्यासंग होता तोच त्यांनीं पुढें चालविला असता तर त्यांतही त्यांना यश येऊन अर्थप्राप्ति व नांव कमावतां आलीं असतीं. परंतु किर्लोस्कर मंडळीचें धुरिणत्व व नाटकधंद्याचा पेषा पतकरतांना त्यांनीं अतोनात मनोधैर्य दाखविलें होतें. व त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, कोणाही सुशिक्षित तरुणाच्या अंगीं नाट्यकलेला उपयोगी असे गुण असतील तर त्याला प्रतिष्ठित धंदा म्हणून नाटकाचा पेषा स्विकारण्यास अडचण पडूं नये. या धंद्यांत प्रतिष्ठा मिळवितां येते, लोकांवर उपकार करतां येतो, नांव मिळवितां येतें व अर्थप्राप्ति करून घेतां येते हें त्यांनीं जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे. नाटकधंद्याची हौस म्हणून जोगळेकर यांनीं ह्या धंदा पतकरला नव्हता—तर कै० भाऊराव कोल्हटकर यांच्या अभावीं एक संस्था बुडत आहे ती त्या संस्थेंत आपल्या जाण्यानें तरते आहे—या उदारबुद्धीनें ते आपल्या स्नेह्याच्या भिडेला त्या वेळीं बळी पडले. व एकदां या धंद्यांत पाऊल घातल्यावर यांनीं आपलें तन, मन व धन नाटकधंद्याला ऊर्जितावस्थेला आणण्याच्या कामीं खर्च केलें. सन १९०० सालीं जोगळेकर किर्लोस्कर मंडळींत सामील झाले; त्यांच्या कारकीर्दींत–मराठी भाषेंत चांगल्या दर्जाच्या नाटकांची आणखी

भर पडली. मूकनायक, गुप्तमंजूष, चंद्रहास, सुमति, मतिविकार, प्रेमशोधन, मानापमान हीं नाटकें लोकप्रिय करण्याचें श्रेय जोगळेकर यांजकडे पुष्कळ येत आहे. कै० अण्णासाहेब किर्लोस्कर व रा. देवल यांचीं नाटकें मोरोबा वाघोलीकर, भाऊराव, बाळकोबा नाटेकर यांच्यामुळें प्रसिद्धीस आलीं व लोकप्रिय झालीं तीं लोकप्रिय करण्याची जबाबदारी, किर्लोस्कर आणि देवल यांच्या सुबोध पद्यरचनेमुळें व नाटकरचनेमुळें विभागली गेली होती. परंतु रा. कोल्हटकर यांची पद्यरचना व नाटकें लोकप्रिय करण्याची जबाबदारी मोठी बिकट होती, ती जोगळेकर यांनीं आपल्या गायन व अभिनयकुशलतेनें हलकी केली. व या गेल्या दहा वर्षांत किर्लोस्कर मंडळीच्या संगीत नाटकांमध्यें जीं नाटकें अति लोकप्रिय झालीं तीं जोगळेकरांच्या श्रमाचें फल होय.

जोगळेकर यांनीं नाटकाचा धंदा स्वीकारल्यामुळें एकंदर नाट्यसमाजावर नीतिदृष्ट्या चांगला परिणाम झाला आहे. व किर्लोस्कर मंडळीचा सहवास व दळणवळण सुशिक्षित वर्गाशीं अधिक वाढल्यानें नाटकधंद्याच्या आजूबाजूला घोटाळणाऱ्या मोहाला उजागिरीनें पुढें येण्याला जागा नाहींशी झाली आहे. हा सर्व इष्ट परिणाम नाट्यसमाजावर घडून येण्याला कारण जोगळेकर यांचें नाट्यकलेची दीक्षा घेण्याचें मनोधैर्य समजलें पाहिजे. गेल्या दहा वर्षांत नाटकधंद्यांत सुधारणा घडवून आणण्याची चळवळ व प्रत्यक्ष त्या धंद्यांतल्या लोकांच्या वर्तनांतला फरक यांचें बीज नाटकधंद्यांतलें दूषित वातावरण शुद्ध करण्याला जोगळेकरांनीं आपल्या धंद्यांत जे निरनिराळे प्रयत्न केले त्यांत आहे असें म्हणण्यानें अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं.

गाण्याच्या दृष्टीनें जोगळेकरांनीं आलीकडे अद्वितीयत्व मिळविलें होतें. कांहीं वर्षें त्यांच्या आवाजांत मधून मधून दोष उत्पन्न होण्याची खोड होती, परंतु गेलीं तीन वर्षें त्यांचे खरे गुण लोकांच्या इतके प्रत्ययास आले होते कीं, किर्लोस्कर संगीत मंडळीचें अद्वितीयत्व कायम राखण्यास हाच पुरुष योग्य आहे अशी त्यांची खात्री झाली होती.

त्यांच्या कारकीर्दींत महाराष्ट्रीय नाट्यकलेच्या इतिहासांत घालण्यासारख्या पुढील गोष्टी घडून आल्याः—

१ किर्लोस्कर संगीत नाटकगृह.
२ नाट्यग्रंथ संग्रहालय.
३ रंगभूमि मासिक-पुस्तक.
४ किर्लोस्कर भारत गायन समाज.

गेल्या दहा वर्षांत किर्लोस्कर मंडळीनें अनेक लोकोपयोगी संस्थांना मदत केली-ती त्यांच्या हिंमतीवर केली-व या रीतीनें नाटकसंस्था सार्वजनिक दृष्ट्या किती उपयोगी आहे याची लोकांस प्रचीति आणून दिली.

जोगळेकर यांनी धंद्याचें महत्त्व व आपल्यावरची जबाबदारी पूर्ण ओळखून त्याप्रमाणें वर्तन ठेवलें होतें. कित्येक वेळीं आजारीपणामुळें काम करण्याच्या लायखीचे ते नसत-परंतु जाहिरातीनें एकदा खेळ प्रसिद्ध झाल्यावर त्यांनीं तो स्वतःच्या अडचणीनें केव्हांही थांबूं दिला नाहीं. इतकेंच नाहीं तर केव्हां केव्हां त्यांचा आवाज बसला असल्यामुळें त्यांचा उपहास होण्याची पाळी त्यांच्यावर येई, परंतु त्या गोष्टीची भीति न बाळगतां प्रसंगाकडे नजर देऊन ते त्या गोष्टी सहन करीत.

स्वदेशी चळवळीच्या वावटळींत कांहीं कांहीं शहरांतील तरुणसमाज बेसुमार झाला होता. कोणावर कोणत्या रीतीनें " बायकाट " चा प्रसंग येईल याचा नियम नसे; एका प्रसंगीं एका पदाला "once more" घेण्याकडे जोगळेकरांचें दुर्लक्ष झालें. व प्रवेश बराच पुढें गेला. या प्रमादाबद्दल स्वदेशीवाल्यांचें डोकें भणाणून त्यांनीं नाटकगृह डोक्यावर घेतलें. " बायकाट, " " बायकाट, " ध्वनि चोहोंकडून निघूं लागला. सभ्य स्त्री-पुरुषांला आपण सुखरूप बाहेर पडतों कीं नाहीं याबद्दल पंचाईत वाटूं लागली. या प्रसंगांतून सुटण्याला एकच मार्ग मोकळा होता तो हा कीं, मार्गे परतून जोगळेकर यांनीं तें पद पुन्हा म्हणण्याचा. तें त्यांनीं केलें तेव्हां त्या प्रसंगांतून सर्व सुटले. ही गोष्ट सांगण्याचा हेतु एवढाच कीं, कार्याकरितां मानहानिही सोसण्याइतके ते सहनशील होते.

स्वार्थदृष्टीनें द्रव्यसंचय करण्याचें जोगळेकर यांनीं मनांत आणलें असतें तर तो या दहा वर्षांत त्यांनीं पुष्कळ केला असता; परंतु संस्थेच्या चिरस्थायित्वाकडे त्यांचें विशेष लक्ष अलीकडे लागल्यामुळें, आपल्या श्रमाचा बराचसा भाग ते त्याच उद्देशाकडे खर्च करीत असत. आपल्या गायन व अभिनयकुशलत्वाची साक्ष त्यांनीं

अलीकडे मूकनायक, प्रेमशोधन व मानापमान नाटकांत लोकांच्या मनांत पूर्णपणें विंबवून दिली होती. मानापमान नाटकांतील चौथ्या अंकांतील त्यांच्या करामतीचें चित्र लोकांच्या अंतःकरणांतून पुसून जाण्याला फार दिवस लागतील. या नाटकांत जोगळेकरांना भूमिका करतांना पाहून " अण्णासाहेबांच्या मंडळीची पुण्याई जबर म्हणून त्यांना अशीं पात्रें मिळतात ! " असे लोकांनीं उद्गार काढावे. नट या दृष्टीनें जोगळेकरांच्या गुणांचें चित्र यापेक्षां रेखाटणें या पुढें शक्य नाहीं; परंतु खाजगी वर्तनांतही त्यांच्याइतका दिलदार, मोकळ्या मनाचा, निगर्वी—इत्यादि अंतर्बाह्य गुणांनीं परिपूर्ण असा पुरुष क्वचित् सांपडेल. सन १९०० च्या सप्टेंबरमध्यें ते किर्लोस्कर संगीत मंडळींत आले. प्रथम एक वर्ष पगारदार राहून १९०२ सालीं ते भागीदार झाले. भाऊराव कोल्हटकर यांच्या जागीं आपणांस काम करावयाचें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवून त्यांनीं मेहेनतीनें—आपलीं एकेक कामें लवकर वसविलीं. रा. गोविंद बल्लाळ देवल व कै. मोरोबा वाघुलीकर—हे त्यावेळीं धंदा सोडून घरीं बसले होते, यांनीं श्रम घेऊन; तीं तयार करून दिलीं. पहिलीं दोन तीन वर्षें—भाऊरावांच्या भूमिका लोकांच्या नजरेसमोर असल्यानें जोगळेकर यांच्या भूमिकांचा जितका अनुकूल ग्रह प्रेक्षकांच्या मनावर व्हावयास पाहिजे होता तितका झाला नाहीं, तरी पुढें त्यांनीं लोकांचीं अंतःकरणें आपल्याकडे इतकीं वेधून घेतलीं कीं, किर्लोस्कर मंडळींतील मागच्या पिढींतल्या कोणाही प्रसिद्ध नटाशीं तुलनेनें आपली कमतरता भासूं दिली नाहीं. आलीकडे तीनचार वर्षांत किर्लोस्कर मंडळीच्या भरभराटीचीं चिन्हें त्यांस भासूं लागल्यावरोबर ही मंडळी चिरस्थायी कशी होईल या योजनेस ते लागले होते. **फ्रान्समध्यें–' थिएटर फ्रान्से '** * म्हणून एक जुनी दोनशें वर्षांपूर्वीची नाट्यसंस्था आहे, तिच्यांत नामांकित नटांचा व नाटककारांचा समावेश केलेला असतो. त्या धर्तीवर आपली संस्था आपल्या मागें चालून—वेळीं संस्थेस पैसे कमी मिळाले तरी तिला धोका येऊं नये अशा तऱ्हेची फंड जमविण्याची योजना चालली होती, व या योजनेस त्यांना बराच स्वार्थत्याग करावा लागला असता. परंतु निर्दय काळाच्या मनांतून त्यांना इतक्या चांगुलपणाचा भाग घावयाचा नेव्हता !

---

* रंगभूमि व. ३ रें अं. १ " नाटकविषयक बाहेरची माहिती " यांत सदर नाट्यगृहाची माहिती दिली आहे.

## जन्मवृत्त.

जोगळेकर यांचा जन्म कर्नाटकांतील रामदुर्ग येथें शके १७९६ माघ शुद्ध १ स झाला. यांचें मूळ घराणें अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें जें गांव गुर्लासूर येथील होय. प्रथम यांचें प्राथमिक शिक्षण रामदुर्ग येथें होऊन त्याबरोबरच कै० बळवंतराव केतकर गवयी यांचेकडून गाण्याचें शिक्षण त्यांनीं मिळविलें. कांहीं दिवस ते आपल्या बंधूबरोबर उज्जयनीस तेथील हायस्कुलांत शिकत होते. १८९९ सालीं ते अलाहाबाद युनिव्हर्सिटींतून म्यॉट्रिकच्या परीक्षेंत पास झाले, नंतर पुण्यांत वकिलीचा अभ्यास करण्याकरितां येऊन राहिले. या वेळींच भाऊराव कोल्हटकर आजारी पडून मंडळी त्यांच्या जागीं नवीन मनुष्याच्या योजनेंत होती. त्या वेळीं दोनतीन उमेदवार उभे होते. परंतु प्रत्येकाच्या निरनिराळ्या अडचणी उभ्या राहिल्यानें नवीन मनुष्य मिळण्याचें काम रेंगाळत पडलें. मंडळी अशा प्रसंगांत पडलेली पाहून जोगळेकर यांनीं स्वतः होऊन मंडळीचें संकट वारण्याचें आश्वासन दिलें. कित्येकांनीं "तुम्ही ही दिशा पतकरतां परंतु या मार्गांत तुम्ही फसाल" अशीही सल्ला दिली–तिला त्यांनीं एकच उत्तर दिलें कीं, "मला कोणीं फसविलें तरी माझी विद्या कोणी घेऊन जात नाहीं." हा मार्ग पतकरण्याविषयीं ज्यांनीं त्यांना पोक्त सल्ला दिली– त्यांनीं एवढेंच सांगितलें कीं, "तुमच्यामुळें जर एक संस्था आज तरते आहे तर तुम्ही अवश्य जावें मात्र तुम्ही गेल्यासारखें नाट्यकलेंत कांहीं करून दाखवा." या सल्ल्याप्रमाणें यांनीं कृति करून दाखविली. आक्टोबरमध्यें हुबळीचे प्रयोग संपून मंडळी बेळगांवास आली. तेथें स्वतंत्र नाटकगृह बांधून प्रयोग करावयाचें ठरलें होतें. नोवेंबरच्या ३ तारखेस त्यांना संध्याकाळीं–एका स्नेह्यास भेटण्यास गेले असतांना–थंडी वाजून ताप भरला, म्हणून गाडींतून घरीं आले. ३।४ तारखेस ताप १०५ डिग्री होता, तो पुढें दोन दिवस उतरला तेव्हां साधारण ताप आहे अशी समजूत झाली. ७ तारखेस पुन्हा भरला. घाम येई परंतु ताप पुन्हा चढत असे. बेळगांवची हवा अतिशय थंड, तेथें ताप थांबणार नाहीं म्हणून मिरजेच्या कोरड्या हवेवर नेण्याचें ठरलें. त्याप्रमाणें १४ तारखेस मिरजेस नेलें. परंतु अगोदर एकदोन दिवस अशक्तपणाचीं चिन्हें अधिक दिसत होतीं. १५ तारखेस दिवसा ३ वाजतां शेवटीं काळानें त्यांचे मित्र, आप्त व त्यांच्याकरितां हळहळणाऱ्या हजारों लोकांतून त्यांस निर्दयपणानें खेंचून नेलें!

त्यांचे वृद्ध वडील, वडील बंधु, बंधूचे तीन मुलगे व त्यांची पत्नी इतकीं त्यांच्या कुटुंबांतलीं माणसें आहेत. या कुटुंबांत उदार प्रकृतीची प्रवृत्ति अधिक आहे. जोगळेकर यांची मातोश्री नुकतीच चार महिन्याखालीं निवर्तली. ही माउली मोठी सुशील स्वभावाची होती. आपला मुलगा दुखण्यांत वरचेवर आपल्याकडे आला तर धंद्याला अडथळा येईल म्हणून तिनें आपल्या प्रकृतीची खरी हकीकत मुलाला कळूं देऊं नये. जोगळेकर एकदां भेटून आल्यावर "आतां मी सुखानें मरेन" असें तिनें सांगितलें. वडील व बंधूही अशाच स्वभावाचे आहेत. आपल्या मुलापेक्षां ते संस्थेचें हित-अहित अधिक पहात होते.

## स्वभाव व गुण.

जोगळेकर यांनीं आपल्या सौजन्यानें अनेक मित्र संपादन केले होते. मोठमोठ्या संस्थानिकांपासून तों अगदीं गरीब स्थितींतल्या आपल्या मित्राशीं ते फार मोकळे-पणानें व प्रेमानें वागत त्यामुळें ते सर्वांस प्रिय झाले होते. त्यांच्या मृत्यूनें आपल्या कुटुंबांतला एक मित्र गेला असें सर्वांस वाटत आहे. त्यांच्या मृत्यूबद्दल आलेल्या सर्व पत्रांत औपचारिकपणाचा लेशही नसून खऱ्या दुःखानें व कळकळीनें लिहिलेलीं तीं आहेत. "समाजांत नटांची जागा" मानाच्या सदरांत घातलेली अद्याप फारशी पाहण्यांत येत नाहीं. परंतु जोगळेकर व त्यांच्यापूर्वी त्यांच्या जागीं होऊन गेलेले नट यांनीं आपल्या गुणांनीं व उत्तम शीलांनीं ती मानाच्या सदरांत आणून ठेवली होती. ज्या समाजांत उत्तम नट नाहींत त्या समाजांत एक व्यंग आहे असें सुधा-रलेल्या देशांतील समाजाची समजूत आहे. व जेव्हां विद्वान् लोक अशा एकाद्या गुणी नटाबद्दल आपली आदरबुद्धि व गुणग्राहकता व्यक्त करतात तेव्हां ते त्या नटाला अगदीं उच्च दर्जाला नेवून बसवितात. निरनिराळ्या काळांत इंग्लिश समा-जांत जे उत्तम नट होऊन गेले त्यांचेसंबंधानें त्यांच्या समकालीन विद्वान् लोकांनीं जे उद्गार काढले आहेत, ते जोगळेकर यांच्यासंबंधानें पूर्ण लागू पडतात, म्हणून तेच येथें देत आहोंः—

"A man who, whatever were his abilities or skill as an actor, deserves at least to be remembered for his virtues, which are not often to be found in the

world, and perhaps less often in his profession than in others.—

*Dr. JOHNSON.*

राबर्ट वुइक्स नांवाचा नट १६७०–१७३२ मध्यें होऊन गेला त्यावद्दलचे हे उद्गार आहेत.

If manly sense, if nature linked with art;
If through knowledge of the human heart;
If powers of acting vast and unconfined;
If fewest faults with greatest beauties joined;
If strong expression, and great powers which lie;
Whithin the magic circle of the eye;
If feelings which few hearts like his can know,
And which no face so well as his can show;
Deserve the preference: Garrick, take the chair,
Or quit it, till thou place an equal there.

*CHURCHILL.*

That young man never had his equal as an actor, and he will never have a rival.

*ALEXANDER POPE.*

ग्यारिक नांवाचा जो सुप्रसिद्ध व अद्वितिय नट १७१६–१७७९ मध्यें होऊन गेला त्या संबंधाचे हे उद्गार आहेत. नाटकाच्या इतिहासांत अनेक तऱ्हेचे फेरफार चालू शतकापर्यंत होऊन गेले आहेत, परंतु त्याचें नांव अजरामर होऊन राहिलें आहे.

जोगळेकर यांच्यामध्यें कांहीं व्यंगें नट या नात्यानें असतील, परंतु तीं व्यंगें त्यांनां आपल्या गुणांच्या जोरानें दडपून टाकलीं होतीं. ते गुण कशा प्रकारचे होते याचें वर्णन पुढील थामस् शेरिडन् ( १७२१–१७८८ ) नांवाच्या नटाच्या वर्णनांत चांगलें दिलें आहे.

But spite of all defects his glories rise,
And art, by judgment formed, with nature vies
Where he falls short 'tis nature's fault alone,
Where he succeeds, the merits all his own.

*CHURCHILL.*

या सर्व नटांच्या गुणांचें एकीकरण सदर जोगळेकर यांच्यांत अढळून येत असे. दुर्दैवाची गोष्ट ही झाली कीं, एवढ्या मोठ्या प्रसिद्धीस ते येतात न येतात तोंच त्यांचें सर्व चरित्र मनोराज्याप्रमाणें स्वप्नवत् झालें. पुढें पांच वर्षें हा धंदा करून विश्रांति घेत राहावयाचें हा त्यांचा संकल्प होता. परंतु आमच्या समाजाचें हतदैव असें आहे कीं, कोणत्याच धंद्यांत श्रम करून त्याचें फळ विश्रांतिसुखांत कोणास मिळावयाचें नाहीं. मग त्यालाच हा धंदा अपवाद कोठून असेल ?

## खासगी.

किर्लोस्कर मंडळींतील एकेक धुरंधर नटांचे मृत्युलेख लिहिण्याचा प्रसंग एकाच व्यक्तीवर यावा यापेक्षां अभागीपणाची सीमा दुसरी कोणती असणार? ज्याची इच्छा आपल्यावरची जबाबदारी दुसऱ्यावर सोंपवून विश्रांतीसाठीं घरीं बसण्याची. त्यावरच पुन्हा श्री-गपासून संस्थेच्या जोपासनेची पाळी यावी हा दुर्दैवाचा योग समजला पाहिजे. ज्याच्या बळावर व हिमतीवर किर्लोस्कर मंडळीचें एकेक पाऊल पुढें टाकत आलें, त्याचीच मजबुती एकाएकीं अशा रीतीनें खचल्यावर कोणत्या मनुष्याची छाती अशी पाषाणाची घडविली आहे कीं तो कोणत्याही कार्याला धीरानें हात घालील! जोगळेकर शरिरानें खंबीर होते व मनानें उदार होते, इतकी मजबुती असल्यावर त्यांच्या जोडीनें काम करणाऱ्या कोणा मनुष्यास "मी असें करीन" "तसें करीन" म्हणून महत्त्वाकांक्षा उत्पन्न होणार नाहीं ? व या महत्त्वाकांक्षेचा असा विपरीत परिणाम झालेला पाहून ईश्वरालाच चांगली गोष्ट केलेली आवडत नाहीं कीं काय असें कां मनांत येऊं नये ? जोगळेकर यांनीं एकोप्यानें, एक विचारानें, एक मनानें काम कसें करावें याचा धडा संस्थेला घालून दिला आहे. दहा वर्षांच्या त्यांच्या कारकीर्दींत एकाही गोष्टींत त्यांनीं मतभेद दाखविला नाहीं. सदा हसत-

मुख, आनंदी त्यांची मुद्रा असून संस्थेतील प्रत्येक मनुष्यावर त्यांचें प्रेम सारखें असे. त्यांना कोणीं शब्दानें अथवा कृतीनें दुखविलें असलें तरी ती गोष्ट पुढच्या क्षणांत ते स्मरणांत ठेवीत नसत. रंगभूमींत महाराष्ट्रीय नटांचीं चरित्रें आलेलीं पाहून त्यांनीं थट्टेनें म्हणावें: "... ... ... तुम्ही माझें चरित्र काय लिहिणार ?" या प्रश्नाचा परिणाम त्यावेळीं कांहीं होण्यासारखा नव्हता; परंतु आतां त्याचें स्मरण होऊन अंत:करणाला तो कशा प्रकारानें तीव्र वेदना देतो याची कल्पना अनुभव घेणारालाच ठाऊक ! ! !

मित्रत्व, एकत्र सहवास, आणि स्वभावधर्मांतील उत्तम गुणांची पूर्ण प्रचीति या तीन गोष्टींनीं पूर्णपणें बद्ध झाल्यामुळें किंवा अंध झाल्यामुळें चरित्रनायकाकडे दोष-दृष्टीनें पाहवतच नाहीं. कितीही लिहिलें तरी थोडें लिहिलें असें वाटत आहे, व उद्वेगाच्या भरांत लेख लिहिला गेल्यामुळें कदाचित् त्याच त्या गोष्टींची पुनरावृत्तीही झाली असेल. कर्तव्याची सीमा येथेंच संपत नसल्यामुळें इतका पाल्हाळ करणें कदाचित् लोकदृष्टीनें अवश्य वाटणार नाहीं हेंही खरें आहे ! !

या संकट प्रसंगीं सर्व व्यवसायबंधूनीं, स्नेहीवर्गांनीं, हितचिंतकांनीं परोपरीनें दु:खाचा भार हलका करण्याची तत्परता दाखविली, याबद्दल मंडळी त्यांची अत्यंत आभारी आहे.

## वर्तमानपत्रांचे अभिप्राय:—

### इंदुप्रकाश.

सुप्रसिद्ध किर्लोस्कर संगीत मंडळीचे एक मालक व नाट्यकला-भूषण रा० रा० नारायणराव जोगळेकर हे बुधवारीं ( ता० १५ ) मिरज मुक्कामीं मृत्यु पावल्याची अत्यंत दु:खकारक वातमी आली आहे. विषारी ज्वरानें आजारी पडल्यामुळें त्यांस मिरज येथें औषधोपचारार्थ नेण्यांत आलें होतें. परंतु दुर्दैवानें त्यांतच त्यांचा अंत झाला. रा. जोगळेकर यांची मृत्युवार्ता ऐकून महाराष्ट्रांतील आबालवृद्धांस तीव्र दु:ख वाटल्याखेरीज राहणार नाहीं. त्यांच्या मृत्यूनें महाराष्ट्रांतील संगीत नाट्यकलेचें तर सौभाग्य नष्ट झाल्यासारखें झालें आहे. 'आरंभशूरा: खलु: दाक्षिणात्या: ' हा आरोप फोल ठरविण्याच्या ज्या मूठभर संस्था महाराष्ट्रांत आहेत त्यांत किर्लोस्कर संगीत

मंडळीची प्रामुख्यानें गणना होते; आणि किर्लोस्कर संगीत मंडळीस हें महत्त्व प्राप्त होण्यास मंडळीचे संस्थापक कै० अण्णासाहेब किर्लोस्कर व तत्कालीन नटवर्ग यांची पुण्याई जितकी कारण झाली, तितक्याच सदर मंडळीचे प्रमुख गायन-अभिनय-कौशल्यपटु नट रा. जोगळेकर--ज्यांस कैलासवासी हें उपपद लावण्याचा दुर्धर प्रसंग महाराष्ट्रावर कोसळला आहे-व मंडळीचे हल्लीचे सेक्रेटरी रा. रा. शंकरराव मुजुमदार यांची संघटनाशक्ति, संहति व स्वार्थत्यागवुद्धि ह्याही कारण झाल्या आहेत. त्याच्या दुजोड अमदानींत किर्लोस्कर मंडळीनें ललितकलेंत तर पहिला नंबर मिळविलाच आहे; परंतु लोकोपयोगी संस्थांस व फंडांस निःस्वार्थ बुद्धीनें सहाय्य होण्यांतही किर्लोस्कर मंडळीनें श्रेष्ठ स्थान मिळविलें आहे. उज्जयिनीच्या माधव कॉलेजांत रा० जोगळेकर अभ्यास करीत होते त्यावेळच्या त्यांच्या कित्येक सहाध्यायांस व त्यांच्या अनेक मित्रांस रा. जोगळेकर यांचा मनमिळाऊपणा व मित्रप्रेम आठवून त्यांच्या मृत्यूनें अत्यंत दुःख होईल यांत संशय नाहीं. कै. जोगळेकर हे चांगल्या प्रकारचें शिक्षण संपादन करून वकिलीचा अभ्यास करीत होते. थोर लोकांनीं सल्ला दिल्या-वरून व अंशतः नाट्यकलेची सेवा करण्याच्या स्वयंस्फूर्तीनें त्यांनीं सुप्रसिद्ध कै० भाऊराव कोल्हटकर यांच्या जागीं मुख्य नटाचें काम करण्याचें कबूल करून संगीत नाट्यकलेची मनःपूर्वक सेवा करण्यास आरंभ केला. ही सेवा त्यांनीं किती श्रेयस्कर रीतीनें केली व त्यांच्या कारकीर्दींत सुसंघटित संगीत नाट्यकलेची कशी उन्नति झाली हें महाराष्ट्रीयांस विदित आहेच. त्यांच्या मृत्यूनें संगीत नाट्यकलेचें झालेलें नुकसान भरून येण्यास पुष्कळच काळ लागेल. रा. जोगळेकर हे लोकप्रिय होण्यास त्यांचें श्रेष्ठ प्रतीचें गायनकौशल्य जितकें कारण झालें, तितकेंच त्यांचें मनमिळाऊपणाचें, सभ्यतेचें व दिलदारपणाचें खासगी वर्तनही कारण झालें. मरणसमयीं त्यांचें वय अवघें छत्तीस वर्षांचें होतें. अकालीं मृत्यु आणखी याहून तो कोणता ? ' Those whom the Gods love die young ' अशी कव्युक्ति आहे. त्यांच्या मृत्यूनें त्यांच्या कुटुंबावर व किर्लोस्कर मंडळीवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला आहे. परंतु, ' मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ' ह्या कठोर व अपरिहार्य सृष्टिनियमाकडे पाहून व सर्व महाराष्ट्रीयांची आपणांस सहानुभूति आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांनीं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें पाहिजे. जगदधिष्ठात्री विश्वशक्ति रा० जोगळेकर यांच्या आत्म्यास शांति देवो !

## केसरी.

‘ किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी ’ चे मालक, प्रमुख नट, व गवई रा. रा. नारायण दत्तात्रय जोगळेकर यांस मिरज येथें दोषी तापानें गेल्या ता. १५ रोजीं देवाज्ञा झाली, हें कळविण्यास फार वाईट वाटतें. ‘ किर्लोस्कर मंडळी ’ बेळगांवीं गेली असतां तेथें रा. जोगळेकर यांस तापानें पछाडलें व प्रकृतीच्या आरामाकरितां ते मिरजेस आले असतां एकाएकीं त्यांचा आजार विकोपास जाऊन त्यांतच त्यांचा अंत झाला ! रा. जोगळेकर हे सुशिक्षित असून, गायनकलेंतील प्राविण्य, अभिनय-कौशल्य व अंतःकरणाचा चांगुलपणा यांनीं ते सर्वांस अत्यंत प्रिय झाले होते. रा. भाऊराव कोल्हटकर यांच्या मृत्यूनंतर ‘ किर्लोस्कर मंडळी ’ चें महत्त्व यत्किंचितही कमी होऊं न देतां ती चालविण्याचें काम त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें उत्कृष्ट पार पाडलें. यांनीं गेल्या सुमारें दहाबारा वर्षांच्या अवधांत निरनिराळ्या सार्वजनिक संस्थांना प्रशंसनीय द्रव्यसहाय्य केलें; आणि ‘ किर्लोस्कर नाटकगृह, ’ ‘ नाट्यग्रंथ-संग्रहालय, ’ ‘ रंगभूमी ’ मासिक, किंवा नुकताच निघालेला ‘ भारत गायनसमाज ’ यांसारख्या उपयुक्त संस्था स्थापण्याचें श्रेय झीज सोसून संपादिलें. ‘ किर्लोस्कर मंडळी ’ ची व संगीत नाट्यकलेची त्यांच्या मृत्यूनें झालेली हानि भरून येणें सांप्रत दुष्कर आहे. परमेश्वराच्या इच्छेपुढें इलाज नाहीं; पण महाराष्ट्रांतील रसिक व गुणी जनांची पूर्ण सहानुभूति या संकटसमयीं किर्लोस्कर मंडळीकडे आहे, हें मनांत आणून झालेलें नुकसान भरून काढण्याचा उद्योग सदर संस्थेकडून होईल अशी आम्हांस उमेद आहे.

---

## MAHRATTA.

Death took place at Miraj on the 15th instant of Mr. Narayan Dottatraya Joglekar, of the Kirloskar Sangit Dramatic Company. Mr. Joglekar was the leading hero actor in the company for many years past and had earned a good name in that capacity. He had

passed the Matriculation. His proficiency in Hindu music and his skill as an actor stood the company in very good stead. His death is a serious loss to the Maharastra Sangit stage, which it will be very hard to repair.

---

## ADVOCATE OF INDIA.

The death of Mr. Narayanrao Joglekar a well-known Marathi actor of the day, occurred at Miraj on Wednesday last. Mr. Joglekar was one of the proprietors and the chief actor of the well-known Kirlosekar Company. Originally intended for the law, on the demise of the late Mr. Bhaurao Kolhatkar, the popular musician and actor in the Maharashthra, Mr. Joglekar, at the request of the lovers of Indian drama, took to the stage and achieved distinction and success in that profession. He was ever willing to give the benefit of his performances to deserving charitable institutions He was only 36 years of age and leaves behind him a young widow.

---

# गणेश सदाशिव भागवत !

यंदाच्या वर्षी नाट्यकलेवर मोठा घाला यावयाचा हा ईश्वरी संकेत दिसतो. संगीत नाटक मंडळ्यांतील एक प्रमुख नायक, व गद्य नाटक मंडळ्यांतील एक प्रमुख नायक हे एका महिन्याच्या अंतरानें इहलोक सोडून गेले. कै. जोगळेकर यांच्या इतकेंच कै. भागवत यांचें महत्त्व महाराष्ट्र मंडळींत होतें. परंतु दोन्ही मंडळ्यांचें दुर्दैव यंदा बलवत्तर होतें असें म्हटलें पाहिजे.

गद्य नाटकें करणाऱ्या सुप्रसिद्ध ' महाराष्ट्र नाटक मंडळींतील प्रमुख नट रा. गणेश सदाशिव भागवत यांनीं गेल्या ता. ३ सप्टेंबर रोजीं आत्महत्त्या करून आपला प्राण दिला, हें कळविण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटतें. मंडळीच्या दहाबारा वर्षांच्या कारकीर्दींत चांगल्या नटांच्या हानीचा महाराष्ट्र मंडळीवर हा ३ रा प्रसंग होय. किर्लोस्कर मंडळीशीं या कामांत स्पर्धा करण्याचा अशा रीतीनें प्रसंग यावा ही तिच्या दुर्दैवाची गोष्ट होय ! प्रकृतीच्या अस्वास्थ्याच्या सबबीवर रा. भागवत सुट्टी घेऊन अकोल्यास गेले होते, तेथून कांहीं कामाकरितां म्हणून ते नागपुरास गेले आणि एकाद्या आप्तइष्टाच्या घरीं न रहातां त्यांनीं एका घरांत भाड्यानें जागा घेतली. घराच्या मालकानें ती जागा रिकामी करून देण्याविषयीं त्यांना ' नोटीस ' दिली होती; पण घराचा मालक घरांत येऊन राहूं लागला; तों रा. भागवत रहात होते त्या खोलीच्या बाजूनें घाण येऊं लागली; म्हणून खोली उघडून पाहिली असतां तींत त्यांचें प्रेत सांपडलें. त्यांनीं पोलीस सुपरिंटेंडेंट यांच्या नांवानें एक पत्र लिहून ठेविलेलें खोलींत आढळलें; आपण जाणून-बुजून, स्वयंप्रेरणेनें, आणि शांत व स्वस्थ चित्तानें आत्महत्त्या केली आहे; आपल्या मनांत कोणाबद्दल वैर नव्हतें, किंवा आपलाही कोणी वैरी नव्हता, असें त्यांनीं त्यांत म्हटलें आहे. जीव देण्याचें कारण ' जिवास कंटाळणें ' याखेरीज कांहींएक असल्याचें प्रसिद्ध झालें नसून त्यासंबंधानें बरोबर तर्क करणेंही शक्य नाहीं.

रा. भागवत यांना नाट्यकला फार प्रिय होती. आंग्ल भाषेचें ज्ञान असल्यामुळें त्यांनीं अनेक इंग्रजी नाटकें, नाटकांवरील टीकालेख, प्रख्यात नटांचीं चरित्रें व नाट्य-विषयावरील इतर कित्येक ग्रंथ वाचले होते; आणि त्यांचें अध्ययन करून अभिन-यादि नाट्योपयोगी गुण आपले अंगीं आणण्याचा त्यांनीं मनापासून प्रयत्न केला होता. त्यांचें शरीर, त्यांचा वर्ण अगर त्यांचा आवाज त्यांस अनुकूल नव्हता; तरी दीर्घोद्योग केल्यानें असला माणूसही किती चांगला नट होऊं शकतो, हें त्यांनीं सर्वांचें निदर्शनास आणून दिलें. नाटक-धंद्यासंबंधानें त्यांचा सतत विचार चाले व आंग्ल रंगभूमीवरील उपयुक्त गोष्टींचा फायदा महाराष्ट्र रंगभूमीस व्हावा अशी त्यांची मोठी इच्छा असे. ' ग्रीज-पेंट ' नें चेहेरे रंगविण्याची चाल त्यांनींच प्रथम इकडे आणिली. त्यांना अभिनयाची इंग्रजी पद्धत विशेष प्रिय आहे असें दिसत असे.

कारण त्यांचा अभिनय त्या धर्तीवर होत असे. रा. कृ. प्र. खाडिलकर यांच्या 'कीचकवध' नाटकांतील कीचकाचे कामामुळें जरी ते प्रेक्षक वर्गाच्या विशेष नजरेस आले तरी 'जयध्वज' नाटकांतील शोकरसोत्पाक व 'फाल्गुनराव' नाटकांतील हास्यरसोत्पादक भूमिकेंतील त्यांचीं कामें विशेष प्रशंसनीय होत असत. त्यांचें अलीकडील 'प्रेमध्वज' नाटकांतील 'बुद्धिसिंगाचें कामही उत्कृष्ट वठत असे; आणि 'आथेल्लो' च्या कामाबद्दलही त्यांची ख्याती होती. यांशिवाय इतर नाटकांतील नायकांचीं अगर दुसरीं प्रमुख कामें बहुश: तेच करीत असत. दिवसेंदिवस त्यांच्या अभिनयांत सुधारणा होत होती आणि तो विशेष निसर्गास धरून व म्हणून अधिक चित्ताकर्षक होत चालला होता. इतक्यांत त्यांचा अशा भयंकर रीतीनें अंत व्हावा—नव्हे त्यांच्या आयुष्याची रज्जु त्यांनीं स्वहस्तानें कापून टाकावी हें 'महाराष्ट्र नाटक मंडळी' चें दुर्दैव तर खरेंच; पण तें मराठी रंगभूमीचेंही दुर्दैव होय. आतां सुशिक्षित इसम नाटकाचे धंद्यांत शिरूं लागले आहेत, त्यांचा कित्ता इतर नटांनीं वळवावयाचा, तोंच असे प्रकार घडावेत, हें खरोखर अत्यंत शोचनीय आहे असें कोण म्हणणार नाहीं ?

रा. भागवत हे निर्व्यसनी असून त्यांचे विचार फार उच्च होते असें म्हणतात. त्यांचा स्वभाव मोठा करारी होता; आणि एकादी गोष्ट गैर आहे असें त्यांचें मनानें घेतलें म्हणजे ती त्यांस असह्य होत असे. त्यांना एकटें रहाणें विशेष प्रिय असल्यामुळें त्यांची खासगी स्नेही मंडळी वास्तविक असावी त्यापेक्षां थोडी आहे; तेव्हां 'जिवाला कंटाळण्याला' त्यांस काय कारण झालें असावें, हें कोणास सांगतां येईल किंवा नाहीं याची शंका वाटते. आम्हांस तर असें वाटतें कीं, रा. भागवत हे स्नेही मंडळींत अगर समाजांत विशेष मिसळणारे असते तर, जगांत दुःखें आहेत तशीं न्यायी व दयाळू परमेश्वरानें सुखेंही ठेविलीं आहेत, हा अनुभव त्यांना विशेष येऊन कदाचित् हें आत्महत्येचें पातक त्यांजकडून घडलें नसतें. त्यांच्या कांहीं कांहीं कल्पना बहुजनसमाजांत विशेष न आढळणाऱ्या अशा होत्या. उदाहरणार्थ—ज्या नाटक मंडळींत ते होते त्या मंडळीच्या नाटकांचें पुस्तकांत, आणि ज्या भूमिकांचीं कामें ते करीत असत त्या भूमिकांचे आपले फोटो प्रसिद्ध होणें त्यांस आवडलें नाहीं व रा. खाडिलकरांच्या नाटकांतील त्यांच्या भूमिकांचे प्रवेशांत दुसऱ्या नटांना फोटो-

करितां उभें रहावें लागलें. सध्यां त्यांचा फोटो उपलब्ध नाहीं; तेव्हां तो आम्हांसही देतां आलेला नाहीं. रा. भागवत यांचा विवाह झालेला नसल्यामुळें त्यांच्यावर कौटुंबिक आपत्तीचा घाव जोरानें बसण्याचा संभव कमी होता; त्यांची रहाणी साधी असल्यामुळें व त्यांना इतर कांहीं व्यसन नसल्यामुळें द्रव्यसंबंधी आपत्तीच्या भाराखालीं त्यांचें मन मोडून पडणें संभवनीय नव्हतें, शारीरिक स्थितीसंबंधाची गोष्ट थोडी काळजी करण्यासारखी असली तरी तेवढ्यानें त्यांनीं आपले प्राण सृष्टिक्रमानें जाण्याचे पूर्वींच सृष्टीच्या स्वाधीन करावे, हें चमत्कारिक वाटतें; तेव्हां कांहीं अशक्य कल्पना या मर्त्य व सर्व बाजूंनीं मर्यादा घालून देणाऱ्या निष्ठुर व व्यापारी जगांत शक्य झाल्या नाहींत, म्हणून कदाचित् त्यांनीं हें विलक्षण कृत्य केलें असावें, असें एक वेळ वाटतें. विकारप्रधानवृत्तीचीं व कोवळ्या मनाचीं माणसें 'जिवास कंटाळून' आत्महत्या करण्याचा पाश्चात्य प्रकार इकडे इंग्रजी विचारांबरोबर व कल्पनांबरोबर होत आहे, हें अत्यंत चिंता उत्पन्न करणारें आहे, यांत संशय नाहीं.

रा. भागवत यांच्या मृत्यूमुळें ' महाराष्ट्र नाटक मंडळी ' नें आपला एक खेळ बंद ठेविला होता. रा. भागवत यांच्या मृत्यूनें या मंडळीची मोठी हानि झाली आहे. पण मासिकपुस्तककार या नात्यानें व अशा प्रसंगीं दुसऱ्यास उपदेश करण्याच्या सोप्या भाषेनें आम्ही मंडळीस सांगतों कीं, " परमेश्वरी इच्छेपुढें मान वांकवून, आपल्यास दुसरी एक समदुःखी मंडळी आहे इकडे लक्ष देऊन व रा. भागवत यांचे आप्तइष्ट यांजवरही हा केवढा मोठा दुःखाचा प्रसंग आला आहे हें मनांत आणून मंडळी आपलें कर्तव्य करीत राहील अशी आम्ही आशा करितों. "

'महाराष्ट्र नाटक मंडळी' तील उत्साही व्यवस्थापकांच्या परिश्रमानें व नटवर्गाच्या उद्योगानें रा. भागवत यांची जागा लवकर भरून निघो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून या दुःखकारक विषयाची रजा घेतों.

---



रा. गोपाळ नारायण दाते, यांची सुमेरसिंगाची भूमिका.



रा. विनायक वामन कवठेकर, माजी कोल्हापूर-
कर मंडळींतील नायिकेची भूमिका करणारे नामांकित नट.

## रा. विनायक वामन कवठेकर.

जन्म—पंढरपुराजवळ पाठकुळें. देशस्थ. मूळचे राहणारे वाई, लहानपण निपाणी येथें. सुमारें वीस वर्षांपूर्वी पौराणिक नाटकमंडळ्यांतील अवशेष राहिलेल्या मंडळ्यांपैकीं **कोल्हापूरकर नाटक मंडळी** नांवाची एक प्रसिद्ध नाटक मंडळी असे. तिनें सुमारें चाळीस वर्षे पौराणिक, गद्य व संगीत नाटकांवर लोकरंजन केलें होतें. चांगल्या व कुशल नटांचा संग्रह या मंडळींत असे. त्यांतच मंडळीचे मालक नरहर बोवा कोल्हापूरकर, व्यंकण भट वाडीकर, व विनायक वामन कवठेकर हे प्रमुख होते. इतकेंच नाहीं तर कोल्हापूरकर मंडळीची प्रसिद्धि या तीन गृहस्थांमुळेंच विशेष होती. अशिक्षित असूनहि नाटकमंडळी कशी चालवावी याचा कित्ता या मंडळींतून घेण्यासारखा होता. जोंपर्यंत शिस्त राखून मंडळी चालली होती तोंपर्यंत सुमारें चाळीस वर्षे त्या मंडळीचें अस्तित्व टिकलें. नरहरबोवा हे धोरणी व व्यवहारकुशल होते. त्यांनीं आपल्या मंडळीशीं नव्या व शिकलेल्या लोकांचें दळणवळण व मिलाफ बराच ठेवला होता. संगीताची धूम निघाल्याबरोबर-संगीत नाटकें बसविण्यास त्यांनीं सुरवात केली. गद्य नाटकाची गोडी प्रथम यांनींच लोकांना लावली ह्मटलें तरी चालेल. आण्णासाहेब किर्लोस्कर यांचें " शांकर दिग्जय " नाटक व "स्वैर सकेशा" हीं जुनीं गद्य नाटकें कोल्हापूर संगीत मंडळीनीं लोकप्रिय केलीं होतीं. त्यांतील नायिकेच्या भूमिका रा. विनायकराव यांच्याकडे होत्या. जुन्या नाटक मंडळ्यांची माहिती असलेले लोक जेव्हां जुन्या नाटकाच्या गोष्टी बोलतात, त्यांत विनायकराव यांचें नांव निघाल्याशिवाय रहात नाहीं.

पूर्वींच्या नाटक मंडळ्यांत जेव्हां संगीताचें मोहक आकर्षण नव्हतें तेव्हां नायिकेचीं कामें करणाऱ्या नटांवर त्या मंडळ्याची किम्मत असे. पौराणिक कथाभागांत नायिकेकडे विशेष कार्यभाग असत. सांगलीकर, इचलकरंजीकर, कोल्हापूकर वगैरे जुन्या प्रसिद्ध मंडळ्यांतून एकेक वेळा नायिकेच्या कामांत नाणावलेलीं पात्रें होऊन गेलीं आहेत. त्यांत विनायकराव यांचें नांव प्रसिद्ध आहे. पूर्वीं नाटकपात्राला अगदीं एकेरी नांवानें संबोधण्याची वहिवाट असे. त्यांत नाटकीमुलास " भावड्या, " " विन्या, " " धोंडया, "

" दगड्या, " " मसण्या " इत्यादि नांवानें ओळखण्याची सभ्य व संभावित लोकांत रीत असे, ह्यामुळें "विन्या"चें "विनायकराव" हें नांव जुन्यापिढींतल्या कित्येक लोकांना अपरिचितहि वाटेल. आतांचे विनायकराव ह्मणजे लहानपणाचा विनायक. हे त्यावेळीं नाटकांत होते ह्मणूनच नाटकी होते, परंतु त्यांचें त्या वेळेपासून इतकें शुद्धाचरण आहे कीं, त्यांचें–पायाचें- तीर्थ त्यांस विन्या ह्मणणाऱ्यानें खुशाल घ्यावें.

हल्लीं जसें एकेका संगीत मंडळीचें एकेक नाटक कोणत्या तरी प्रमुख पात्रावर लोकप्रिय झालेलें असतें, तशीं पौराणिक नाटकाच्या वेळीं त्या त्या मंडळीचीं कांहीं नाटकें प्रसिद्ध होतीं. सांगलीकर मंडळीचीं "रास," "कात्यायनीव्रत," " हरिश्चंद्र आख्यान " इचलकरंजीकर मंडळीचीं " प्रमिला स्वयंवर " [ ह्मणजे ज्यावर " बायकांचें बंड " हें नाटक झालें आहे तें ] " कचदेवयानी " " कंसवध " हीं नाटकें त्यांतील कांहीं पात्रांच्या कामावरून लोकांस आवडत असत. त्याप्रमाणेंच कोल्हापूर मंडळीचीं " दक्षप्रजापति यज्ञ " " राधाविलास " " पारिजातक " " द्रौपदीवस्त्रहरण " हीं नाटकें लोकप्रिय असत.

हीं नाटकें ज्यावेळीं प्रचारांत असत, त्यावेळीं इंग्रजी भाषेचा प्रसार आतांइतका झाला नव्हता व मराठी भाषाहि आतांइतकी " नखरेबाज " व " छिनाल " झाली नव्हती. मनांत आलेले विचार वेड्यावाकड्या परंतु बोध होईल अशा वाक्यानें लिहितां व बोलतां येत असत. त्यामुळें आतांचे Popular, most popular–ह्मणजे "लोकप्रिय" "अतिशय लोकप्रिय" "सुप्रसिद्ध" वगैरे वगैरे फसवणुकीचे शब्द त्यावेळीं कोणास ठाऊकहि नव्हते; इतकेंच नव्हे तर actor ह्मणजे "नट" हा शब्दहि कोणास ठाऊक नव्हता. चांगल्या खेळास " हातखंडा " खेळ ह्मणत. " अमक्या मंडळीचा अमुक खेळ फार हातखंडा आहे." ह्मटलें ह्मणजे त्यांत उत्कृष्टपणाची सर्व कल्पना येत असे. आज अमक्या पात्रानें अमुक नाटकांत फार बहार केली किंवा कमाल केली एवढीच भाषा त्या पात्राच्या स्तुतीबद्दल प्रेक्षकांच्या तोंडून निघत असे. ह्मणजे तें पात्र सर्वगुणपरिपूर्ण समजण्यांत येई. सुमारें ४०

वर्षांपूर्वी नाटकावर अभिप्राय कसे दिले जात असत याचा नमुना पुढील उताऱ्यावरून कळून येईल.

" मागील पत्रांत लिहिल्याप्रमाणें करवीर नाटकवाले व वाडीकर नाटकवाले या उभयतांनीं खेळाचें काम सुरु केलें आहे. उभयतांचेहि दोन दोन खेळ या आठवड्यांत झाले. करवीरकरांतील कित्येक पात्रांनीं येथील लोकांस इचलकरंजिकरांचें विस्मरण केलें. यांच्यांतील सूत्रधार, विदूषक, तसेंच, राजवेषापैकीं दादा काळे, स्त्रीवेषापैकीं बाळामिरजी, व राक्षसवेषापैकीं बाबाजीराव मिसाळ आदीकरून बहुतेक पात्रें आपापल्या कसबांत बहुतेक गोष्टीनें परिपूर्ण आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शनिवारीं रात्रौ जें सिमंतिनी आख्यान झालें त्या वेळीं सदर स्त्रीवेषपात्रानें जो शोक केला तो श्रोते मंडळीस गहिंवर आणल्यासारखा केला. तसेंच त्या प्रसंगीं सिमंतिनीचा पतिवेष धारण करणाऱ्यानें फार उत्तम भाषण केलें. तो बोलते वेळीं डोळे फार मिटतो, तें उपयोग नाहीं. जर हे नाटककार कांहीं दिवस राहून आपल्या नाटकांत आणखी सुधारणा करतील तर येथील लोकांकडून त्यांस चांगली प्राप्ति होईल असें आह्मांस वाटतें. वाडीकर नाटककारांत सूत्रधार, विदूषक, स्त्रीवेष घेणारा, राजवेष घेणारासारखे जर चांगले असते, तर तें नाटक असें शोभतें. परंतु तें नसल्यामुळें त्यांची रीझ येथें पडली नाहीं. "

बेळगांव समाचार—१८७०.

पूर्वीच्या नाटकपात्राला आपल्या नांवाची प्रसिद्धि आपलें नांव जाहिरातींत छापून किंवा ह्यांडबिलांत छापवून प्रसिद्ध करण्याची अवश्यकता पडत नसे. एकदां नव्या गांवांत जाऊन एक दोन वेळां तें पात्र चांगल्या तऱ्हेनें चमकलें व आपल्या ठिकाणीं अंगच्चें कांहीं कसब आहे असें त्यानें लोकांच्या निदर्शनास आणून दिलें कीं,त्याचें नांव त्या गांवांत सर्वतोमुखीं होत असे व तेथून एका गांवांहून दुसरीकडे अशा क्रमानें कीर्ति मिळविलेले नट त्या पिढींत पुष्कळ होऊन गेले. त्यापैकीं विनायकराव कवठेकर हे वरच्या योग्यतेचे नट होत. वर जीं कोल्हापूरकर नाटकमंडळीचीं " हातखंडा " नाटकें सांगितलीं त्यांत पार्वती, यशोदा, सत्यभामा, द्रौपदी या भूमिका

विनायकराव यांनीं पूर्वीच्या भाषेंत सांगावयाचें ह्मणजे " हुबेहुब " करून दाखविल्या आहेत. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच कराव्या अशा तऱ्हेच्या सूचना मधून मधून कोणाकडून येत असतात—परंतु या सूचनेची प्रयोजकता व नामदार बसूचें " म्यारिएज बील " त्याची प्रयोजकता सारखीच. वेष आणि अभिनय या गोष्टी कला आणि विद्या या दृष्टीनें पाहिल्या पाहिजेत. व आजपर्यंत जे जे स्त्रियांच्या भूमिका करण्याच्या कामांत महाराष्ट्रीय नाटकमंडळ्यांतून प्रसिद्ध होऊन गेले आहेत, त्यांच्यासंबंधानें हाच विचार पाहणारांनीं केला आहे. विनायकराव यांची भूमिका पाहण्याकरितां, हल्लींच्या संगीत नाटकांतून नायिकेच्या भूमिका करणारे, भाऊराव कोल्हटकर, बालगंधर्व, महागंधर्व, उपगंधर्व इत्यादिकांस पाहण्यास लोक जसे उत्सुक असत व हल्लीं होतात, त्याप्रमाणें लोक उत्सुक असत. आण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या शांकरदिग्जय नाटकांतील सरस्वतीची, देवल यांच्या दुर्गा-नाटकांतील दुर्गेची किंवा वरील पौराणिक नाटकांतील भूमिका करणें सामान्य बुद्धीचें काम नाहीं. या भूमिका त्यांचें हृद्गत कळून खुल्या मनानें व प्रसंगावधान साधून करण्याच्या होत्या. आतांप्रमाणें पुस्तकी भाषणें पाठ करून त्यावेळीं रंगभूमीवर बोलावयाचीं नसून नुसतीं सांगून व शिकवून पाठ झालेलीं भाषणें बोलावयाचीं असत. कित्येक वेळेला समयसूचकतेनें पदरचेंहि भाषण लहान मुलाला सुद्धां बोलण्याचा प्रसंग येई. हरिश्चंद्र आख्यानांतील रोहिदासाची भूमिका विनायकराव हे अल्पवयी असतांना करीत असत. ही भूमिका करतांना त्यांनीं देवासचे राजे परलोकवासी कृष्णराव पवार यांस सद्गदित केलें होतें. दुर्गेच्या कामाबद्दल यांची प्रसिद्धि अलीकडच्या पिढींत आहेच. किंबहुना दुर्गा नाटक यांच्यामुळेंच प्रसिद्धीस आलें ह्मटलें तरी चालेल. कारण यांच्यानंतर शाहूनगरवासी व इतर मंडळ्या सुद्धां या नाटकाचा प्रयोग करूं लागल्या. परंतु कोल्हापुरकराइतकें उठावदार नाटक दुसरें कोणाकडून झालें नाहीं. दुर्गेची भूमिका तर विनायकरावांच्या बरोबरीनें कोणीच करूं शकले नाहींत.

चाळीस वर्षांपूर्वी " स्वैर सकेशा " नांवाचें नाटक प्रसिद्ध झालें. व तें कांहींसें त्या वेळेच्या वस्तुस्थितीला धरून रचलें गेलें होतें. त्यामधील नायिकेची

भूमिका विनायकरावांकडे होती. ती इतकी कांहीं अप्रतिम होत असे कीं, त्यामुळें त्या नाटकावर लोकांच्या उड्यावर उड्या पडूं लागल्या. व ज्या कांहीं विशेष व्यक्तींवर तें नाटक रचलें होतें त्यांविषयीं लोकांत चर्चा होऊं लागली. त्यांनीं शेवटीं नाटकमंडळीच्या मालकाची पायधरणी करून त्याच्याकडून तें नाटक रंगभूमीवर आणण्याचें बंद करविलें. असा या नाटकासंबंधाचा इतिहास आहे. विनायकरावांचें स्त्रीवेषांतलें सोंग, सौंदर्यवान् स्त्रीची जितकी कल्पना करवेल तितकें आवर्णनीय सुंदर दिसत असे. वयाच्या बरींच वर्षें ते नायिकेचें काम करीत असत, तरी त्यांत व्यंग दिसत नव्हतें. कोल्हापुरकर नाटकमंडळीचें बरेंचसें अस्तित्व यांचेवर अवलंबून होतें. व यांनीं या मंडळीशीं संबंध सोडला, त्यानंतर थोड्याच दिवसांनीं ती लयास गेली.

सुमारें तीस वर्षे नाटकांत यांनीं घालविलीं. दहाव्या वर्षी हें नाटकांत गेलें. १८९६ सालीं हा धंदा सोडून ते घरीं बसले. तेव्हांपासून ते स्नानसंध्यादि व्यवसायांत सत्कालक्षेप करीत आहेत. नाटकांत राहून चार पैसे मिळवून शेवटचें आयुष्य सुखांत घालवितां येतें हें उदाहरण ज्यांनीं नाटकमंडळ्यांस घालून दिलें आहे, त्यांत विनायकराव हे आणखी एक आहेत.

हे मोठे दूरदृष्टी व विचारी आहेत. नाटकांतून घरीं राहिल्यावर यांचें कुटुंब वारलें व पुन्हां लग्न केलें असतें तर पुन्हां त्यांचा संसार झाला असता. परंतु एकंदर परिस्थितीचा विचार करून त्यांनीं तो मार्ग पतकरला नाहीं. कोल्हापूर येथें स्वतःचें घर बांधून तेथें ते हल्लीं राहत आहेत.

नाटकमंडळ्यांतील प्रमुख समजणाऱ्या नटांनीं यांच्या चरित्रापासून बोध घेण्यासारखा आहे. चांगल्या स्त्रीपात्राच्या भोंवतालीं त्यांच्या नादीं लागणारांचा जो घोळका जमत असतो— तो यांच्या अमदानींत यांच्याहि मागें होता.— परंतु त्यामुळें त्यांनीं आपली दृष्टि धुंद होऊं न देतां, आपली राहणी साधी ठेवली होती. ते अगदीं निर्व्यसनी राहिले होते व अद्याप तसेच आहेत. व एक नाटकमंडळी धरून राहिल्यानें फायदा कसा होतो याचें उदाहरण त्यांनीं पुढच्या पिढीस घालून दिलें आहे.

# रा. गोपाळराव दाते.

जुन्या पिढींतल्या प्रसिद्ध नटांपैकीं अवशेष राहिलेले जे नट हल्लीं विद्यमान आहेत त्यांत वरील नट रा. गोपाळराव दाते हे आहेत. पूर्वी नाटक हा शब्द निघाला कीं, त्याबरोबर गोपाळराव दाते यांचें नांव आठवणीनें निघावयाचें-च. ज्यावेळीं युरोपियन लोकांशीं शहरांतूनहि फारसें दळणवळण नसे, त्या वेळीं कधीं काळीं एखादा " साहेब " किंवा " सोजीर " रस्त्यानें जाऊं लागला कीं मुलें साहेब कसा असतो किंवा सोजीर कसा असतो, हें पाहण्यास उत्सुक असत, त्याप्रमाणें गोपाळराव दाते हे रस्त्यानें चालले कीं, " हा पहा गोप्या दाते " ह्मणून लोक त्यांस पाहण्यास उत्सुक असत. नाटकाच्या इति-हासांत जीं जीं मन्वंतरें बदलत गेलीं त्यांपैकीं एक मन्वंतर बदलण्याचा मान गोपाळराव दाते यांस आहे. पौराणिक नाटकांतून " विदूषक " होण्याऱ्या पात्राचें महत्त्व तीं नाटकें अस्तित्वांत होतीं तोंपर्यंत असे. हें पात्र समय-सूचक असावें लागत असे. त्यावेळचीं नाटकें सुधारलेल्या नाटकाच्या दृष्टीनें बसवलेलीं नसत. तरी प्रसंगोचित रसोत्पत्ति त्यांपासून होत होती. विदूषक या पात्रानें हास्यरसाची बाजू उचलली होती. दाते यांची या कामांत फार प्रसिद्धि असे. ज्या नाटक मंडळींत हे असत त्या मंडळीचीं नाटकें पाहून करमणूक होईल अशी सर्वसाधारण समजूत हे रंगभूमीवर काम करीत असतांना लोकांची होती.

यांचा जन्म १८४३ सालीं सातारा जिल्ह्यांतील जांब गांवीं फाल्गुन शु० ४ स झाला व वयाच्या नवव्या वर्षी तें पुण्याहून नाटकांत गेले. किंवा त्यांस पळवून नेलें ह्मटलें तरी चालेल. त्यावेळीं, त्यापूर्वी व पुढेंहि कांहीं दिवस नाटकांत जाणारीं मुलें अशींच पळवून नेलेल्यापैकींच असत. राम-भाऊ ओक या नांवाचे एक गृहस्थ असत त्यांची 'पुणेकर कंपनी' असे तिच्यांत हे प्रथम गेले--नंतर तेथून मुंबईच्या अमरचंद वाडीकर नाटक-मंडळींत गेले. सुमारें १९ व्या वर्षी यांची व संगीत नाटकाचे कुलगुरु अण्णासाहेब किर्लोस्कर यांची प्रथम गांठ पडली. किर्लोस्करहि त्यावेळीं विद्याभ्यासाकरितां पुण्यास अभ्यासाकरितां राहिले होतें ते नाटकांत शिरले.

पुणेंकर नाटक मंडळींत या दोघांचा तीन वर्षे एकत्र सहवास होता. या वेळीं अण्णासाहेब " देवपार्टी " चीं कामें करीत व गोपाळराव " स्त्री पार्टी " चीं कामें करीत. राधाविलासांत दाते हे राधेचें, गोपीचंद आख्यानांत मैनावतीचें अशीं कामें हें फार चांगलीं करीत असत असें ह्मणतात.

नाटकाच्या नंतर " फार्स " ची जी टूम निघाली ती कोणी बाळा-सोनार या नांवाच्या इसमानें काढली. परंतु पुढें ती लोकांत पसरविण्याचें श्रेय गोपाळराव यांनीं घेतलें. " मार्तंड नायकाचा फार्स " " गुलाब छकडीचा, " " आनारशा " चा " उसाच्या फडांत मारामारी " चा " अलमभे पलख पलखेम दर्याव " " बगीनाऱ्याचा " हे सर्व फार्स गोपाळरावांमुळें लोकांत ठाऊक झाले. यांत कांहीं बीभत्सपणाहि असे व कांहीं कल्पकताहि असे. सोंगांत हुबेहुब नक्कल करून ( imitation ) दाखविण्याच्या कलेची फार्सांत अवश्यकता लागे.

शूद्रासारखें बोलणें, मुसलमानी ऐट दाखविणें, ह्मातान्यासारखें सोंग बनवणें, या गोष्टी या फार्सांत फार येत असत. व गोपाळराव त्या हुबेहुब करून दाखवीत. " अळतेकर नाटक मंडळींत " असतांना हे फार्स दाते यांनीं सर्वतोमुखीं करून सोडले होते. त्यावेळीं नाटकास सुरवात रात्रीं अकरा वाजतां होऊन तें समाप्त ५ वाजतां व्हावयाचें असा संप्रदाय असे. " फार्साला वेळ राहिला " नाहीं असें फारसें कधीं होत नसे. दुसरें, त्या वेळीं नवीनपणामुळें ह्मणा किंवा लोक श्रद्धेनें पहात होते ह्मणून ह्मणा, नाटक कितीहि रात्रीपर्यंत चाललें तरी पाहाण्याचा कंटाळा येत नसे. नाटक पाहून तृप्ति न झाल्यामुळें फार्स पहावासा वाटे. गोपाळरावाचें नाटकांतलें विदूषकाचें काम पाहूनहि फार्सांतलें पाहण्याविषयीं सर्व लोक उत्सुक असत.

## सुमेरसिंगाची भूमिका.

या भूमिकेचें ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्व आहे. पुणें शहरांत पेशवाईंतल्या गोष्टी अनुभवलेले, पाहिलेले व ऐकत आलेले लोक चाळीस वर्षांपूर्वी पुष्कळ होते. पुराणांतल्या गोष्टींप्रमाणें या गोष्टीवर लोकांची भक्ति असे. नारायणरावाला मारल्याच्या गोष्टी तर लहानापासून थोरापर्यंत विश्रुत होत्या ह्मटल्यें तरी

चालेल. इतका अत्यंत हृदयद्रावक भाग नाटकरूपानें लोकांच्या नजरेस पडण्याचा योग येतांच त्याची चोहोंकडे वाहवा होऊं लागली. सुमेरसिंगाच्या भूमिकेनें त्या ऐतिहासिक भागाला रंगभूमीवर फारच महत्त्व आलें. इंग्लिश नाटकांमधून कांहीं कांहीं ऐतिहासिक भूमिकांना पात्रामुळें महत्त्व आलेलें आहे. रिचर्ड दि थर्ड ची भूमिका उत्तम करून दाखविण्यांत—ग्यारिक, आयर्व्हिंग हे कुशल नट आपली बुद्धि खर्च करीत असत. त्याप्रमाणें या सुमेरसिंगाच्या भूमिकेचा इतिहास आहे. प्रसिद्ध गोपाळराव दाते हे सुमेरसिंगाचें काम करतील हीं जाहिरातीवर अक्षरें फडकलीं कीं नाटकमंडळ्यांची चांदरात झडावयाचीच. असा कित्येक दिवस प्रकार होत होता. हल्लीं जसें संगीतांतील गंधर्व, बालगंधर्व या नांवांत कांहीं विशेष आहे असें समजून जो तो गंधर्व बनूं पाहतो, त्याप्रमाणें लोकांना फसवावयाला " गोपाळराव सुमेरसिंगाचें काम करतील " ह्मणून जाहिराती प्रसिद्ध होत असत. मग गोपाळराव दाते यांच्या ठिकाणीं एकादा " गोपाळराव " तांबट असला तरी चाले. असो. गोपाळराव यांनीं नारायणराव पेशव्याच्या चरित्राचा कथाभाग आपल्या सुमेरसिंगाच्या भूमिकेनें अबालवृद्धांस प्रिय करून टाकला होता. यांचे मागून यांचें अनुकरण करणारे बरेच नट पुढें आले होते. परंतु यांची हातोटी कोणासहि साधली नाहीं. अद्यापिहि हे सुमेरसिंगाची भूमिका घेऊन नुसती गोष्ट सांगून लोकांचें खाजगी रीतीनें रंजन करीत असतात.

' पुणें हेरल्ड ' नांवाचें इंग्लिश मराठी वर्तमानपत्र पुणें शहरांत पूर्वीं प्रसिद्ध होत असे त्यांत नारायणराव पेशव्याचे वधाचें नाटक पाहून एकानें लिहिलेलें पत्र पुढें दिलें आहे. त्यावरून त्यावेळीं हें नाटक पाहून लोकांस काय वाटत होतें याबद्दलची कल्पना होण्यासारखी आहे. या नाटकांत सुमेरशिंगांची भूमिका रा. दाते यांचेकडेच होती.

Poona Deccan College.
28-7-1878.

To

The Editor of the Poona Herald.

Dear Editor,

I perused one of your issues—in which you penned

your views on the farce of the death of श्रीमंत नारायणराव पेशवा, performed by सांगलीकर मंडळी. you are of opinion that the grace displayed by the boy who played the part of नारायणराव was not commensurate with his dignified position. On this sccore only I dissend from you. I am of opinion, and some of your readers, I fear, who were present on the occassion would share the same opinion that the boy endowed with exquisite beauty one of the essential properties for one playing such a delicate part, did aequit himself of his duty to his great credit. The air of superiority which he put upon at the time of expostulating with Sumersing, but gradually sunk into its opposite level when he came to know the purpose which brought Sumersing there, together with the cogent arguments couched in such words as could not but produce the effbect, was unmistakably such as could not help bewitching the minds of the audience, He left no stone unturned to dissuade Sumersing from postulating his hands with the blood of a royal prince There was none, I fear, as hard hearted as not to shed tears, on this occassion, when the blood of a young promising royal prince, who would have done a great good to his country, had his life been spared to us for a longer percod. was on the point of being shed. vear editor after the farce was over I came out of the theatre when the great

Shanwar palace presented itself to my view. Oh ! for words in English language to express my different feelings which chased one after and which were engendered in my mind by the sight of that very place where the scene acually took place some handred years ago. The state of grandeur to which we are most probably lost for ever, and the eminent position which we once accupied in the scale of nations flashed accross my mind; I was lost for some time in deep contemplation and was insendesible to external things. With these reflections I now wish to take your kind leave.

Yours truly.
X

गोपाळराव हे सुमेरसिंगाचे कामांत खरी कल्पकता दाखवीत असत. इतिहासांत सुमेरसिंग नारायणरावास द्रव्यलोभानें मारण्यास तयार झाला असो किंवा जुलमानें तयार झाला असो. नाटकरूपानें तो भाग हृदयद्रावक होण्यास गोपाळरावानीं सुमेरसिंगाच्या भूमिकेंत योग्य ठिकाणीं फेरफार केले होते. ते हे–सुमेरसिंग प्रथम खुनाचें व स्वामीवधाचें भयंकर कृत्य करण्यास कबूल नव्हता परंतु आनंदीबाईनें कपटानें त्याच्याकडून बेलभंडार उचलून शपथ घेतल्यामुळें लाचार होऊन तो राजवधास प्रवृत्त झाला. पुढें प्रत्यक्ष नारायणराव हातांत सांपडल्यावर त्याची दीन स्थिति डोळ्यापुढें उभी राहून सुमेरसिंगाचें मन डळमळूं लागलें. हें पाहतांच, आनंदीबाईनें " बेलभंडार उचलून दिला आहेस. रजपूत आहेस कीं षेंड आहेस " ह्मणून स्मरण देतांच, निराशेनें, त्वेषानें व संतापानें नारायणरावाची सुमेरसिंगानें खांडोळीं केलीं.

याठिकाणीं गोपाळराव आपल्या नाट्यनिपूणतेची शिकस्त करीत असत, वळवीत असत. गोपाळरावाइतकी सुमेरसिंगाची भूमिका लोकांच्या मनांत शितकी बिंबली होती तितकीं दुसरी कोणाची बिंबली नाहीं.

गोपाळराव हे किर्लोस्कर मंडळींत अगदीं आरंभीं होते. शाकुंतल नाटकांतील " करभक " नांवाच्या सांडणीस्वाराची भूमिका यांचेकडे होती. " आईसाहेब पुत्रपिंडपालन वृत्त करीत आहेत तर आपण तेथें हजर असावें " एवढा निरोप दुष्यंतास कळविण्याकरितां दुसऱ्या अंकांत याचा प्रवेश आहे. गोपाळरावांनीं एवढेंच भाषण हिंदुस्थानांत बसविलें होतें. हा निरोप दुष्यंतास कळविल्यावर दुष्यंतानें आणखी नगरांतील काय खबरबात आहे ह्मणून त्यास विचारलें. यावर " विशेष कांहीं नाहीं, महाराजांना पुत्ररत्न व्हावें ही सर्व प्रजाजनांची इच्छा आहे " असें त्यांनीं सांगितलें. हा भाग पुस्तकांत नाहीं. व गोपाळराव यांस कोणी बोलण्यासहि सांगितला नव्हता. परंतु त्यांनीं समयसूचकतेनें बोलल्याबरोबर पुण्याच्या त्यावेळेच्या तिही मजल्याच्या प्रेक्षकांकडून टाळ्यांचा गजर झाला. अशा प्रकारची समयसूचकतां गोपाळराव प्रसंगा प्रसंगानें अनेक वेळां दाखवीत असत. सौभद्रांतील वक्रतुंड ब्राह्मणाची भूमिका अण्णासाहेबांनीं गोपाळरावाकरितांच योजली होती. सदर मंडळीस हे आजपर्यंत चिकटून राहते तर मंडळींतील हें एक प्रमुख घटक बनले असते. परंतु दोन तीन वर्षेंच मंडळींत राहून यांचा व मंडळीचा संबंध सुटला.

बरोबर साठ वर्षें हे नट या नात्यानें प्रसिद्ध आहेत. साठ वर्षांचा त्यांनीं आपल्या धंद्याचा अनुभव एकत्र केला असता तर पुढच्या पिढीला त्याचा फार उपयोग झाला असता. त्यांचें दळणवळण थोर थोर लोकांत होतें. विद्वान् लोकांच्या खाजगी बैठकींत हे त्यांचें मनरंजन करीत होते. या सर्व गोष्टींचा फायदा त्यांना नाटकाच्या धंद्याला सहज करून देतां आला असता.

परंतु तसा प्रकार यांच्या आयुष्यक्रमांत झाला नाहीं हें फार गौण झालें. त्यांनीं पुष्कळ द्रव्य कमाविलें असावें असें वाटतें. परंतु त्यांच्या उर्वरित आयुष्यांतील विश्रांतिसुखाला ते कितपत उपयोगी पडले हें त्यांचें त्यांसच माहीत.

---



रा. रा. **केशव विठ्ठल भोसले**—ललितकलादर्श नाटकमंडळीचे मालक.

[ चित्रशाळा प्रेस, पुणे सिटी. ]

# श्री० केशव विठ्ठल भोसले.

(वर्ष ५ अंक १ वरून.)

नुकत्याच उदयास आलेल्या 'ललितकलादर्श संगीत नाटक मंडळी'चे मालक, केशव विठ्ठल भोसले, हे अगदीं तरुण ह्मणजे अवघे बावीस वर्षांच्या वयाचे असून, त्यांच्या चरित्राचा बराचसा महत्त्वाचा भाग अद्याप भाविष्य कालाच्या उदरांत अदृश्य आहे. तरी पण त्यांच्या बावीस वर्षांच्या वयांत नाट्यसृष्टींत त्यांनीं केलेली कामगिरी व मिळविलेलें महत्त्व त्यांच्या विवक्षित परिस्थितींत कौतुक करण्यासारखें असल्यामुळें त्यांच्या चरित्राचा आतांपर्यंतचा भाग 'रंगभूमी'चे वाचकांस सादर करीत आहों.

रा. केशवराव भोसले यांचा जन्म कोल्हापूर येथें ता. ९ आगस्ट १८९० (शके १८१२ श्रावण वद्य ९) रोजीं झाला. हे जातीचे मराठे आहेत. यांचे वडील वैद्यकी करीत असत. ते वारल्यानंतर यांच्या कुटुंबास दारिद्र्य आल्यामुळें यांना व यांच्या वडील बंधूंना त्यांच्या मातोश्रीनें 'स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीं'त घातलें. त्या वेळीं यांचें वय अवघें ३ वर्षांचें होतें; अर्थात् यांना शिक्षणाचा संस्कार होण्यापूर्वीं यांच्या परिस्थितीनें यांस नाटक-धंद्यांत ढकललें ह्मटलें तरी चालण्यासारखें आहे. 'स्वदेशहितहिंतक नाटक मंडळींत' रा. गणपतराव ळळित, रा. माधवराव चौगुले, रा. प्रधान हे असत. त्यांनीं यांना गाण्यांतील सुरांची व नाटकांतील अभिनयाची साधारण माहिती करून दिल्यावर सुमारें एक वर्षाचे आंतच रा. केशवराव—त्या वेळेचा केशव—यांनीं 'बाजीराव व मस्तानी' नाटकांत समशेरबहादुराचें, 'अक्षविपाक' या नांवाच्या नाटकांत शिष्याचें, आणि यांच्याकरितां 'रामराज्यवियोग' या नाटकांत मुद्दाम पदें घातल्यामुळें त्यांतही एक काम केलें. हे रूपानें सुंदर नसले, तरी तरतरीत व हौशी असल्यामुळें बालवयांतच यांनीं भराभर कामें उचललीं; आणि आठ वर्षांचें वय होण्यापूर्वींच 'रामराज्यवियोगां'त चतुरिका व शंबुक, 'संशयसंभ्रम' यांत राजपुत्र, 'हरिश्चंद्रां'त रोहिदास, 'मृच्छकटिकां'त रोहसेन, 'राजाराम' नाटकांत शाहू—शिवाजीचा मुलगा, कै० ना. बा.

नाटक-धंद्याची आवड, या आवडीकरितां परिश्रम व वेळीं स्वार्थत्यागही करण्याची तयारी, स्वाभिमान व चिकाटी, हे गुण यांच्या बावीस वर्षांच्या आयुष्यांतच व्यक्त झाले आहेत. यांच्या आवाजांत एक प्रकारचा मर्दानीपणा असून यांचें गाणें गवई ढंगाचें असतें. पण अलीकडे यांचें अभिनयाकडे पूर्वीच्या मानानें दुर्लक्ष होऊं लागल्याचें दिसूं लागलें असून ताना मारून नादी प्रेक्षकांकडून टाळ्या मिळविण्याचें व्यसनही त्यांस जडूं लागलें आहे, असें दृष्टोत्पत्तीस येतें.

यांच्या गुणावर लुब्ध होऊन ठिकठिकाणच्या लोकांनीं यांचा या चार वर्षांच्या अवधींत पुष्कळच गौरव केलेला आहे. कोल्हापूरचे श्रीछत्रपती महाराज, कोल्हापूर गायनसमाज धुळें येथील क्युमिन क्लब, हैद्राबादचा शंकर दरबार, गदग, नागपूर, मुंबई येथील नागरिक, पुणें मराठी ग्रंथसंग्रहालय, 'धि न्यू इंडियन सर्कस' चे मालक प्रो. काशिनाथ विनायक छत्रे, वगैरेंच्या तर्फे यांचा गौरव होऊन यांच्या आजवरच्या रंगभूमीवरील आयुष्यांत यांस चार रौप्यपदकें व आठ सुवर्णपदकें मिळालीं आहेत. गेल्या चार वर्षांत यांनींही बेळगांवचें 'गणेश विद्यालय,' सांगलीचें दत्तमंदिर, उमरावतीस भरलेली मराठा परिषद, धुळें येथील प्राणिसंरक्षक संस्था, इंदूर सॅनिटोरियम, पुणें यंग क्रिकेटर्स क्लब, पुणें मराठी ग्रंथसंग्रहालय, या संस्थांस द्रव्यसाहाय्य करून सुमारें हजार दीड हजार रुपये धर्मार्थ दिले आहेत.

शिक्षण नसतां लहान वयांत नाटक धंद्यांत शिरलेल्या मुलानें दाखविलेले गुण व कर्तबगारी या नात्यानें त्यांची विशेष प्रशंसा होणें साहजिक आहे. पण विवक्षित मंडळीच्या कल्पनांचें वातावरण व नियमांचें बंधन नाहींसें होऊन अर्वाचीन कालच्या जगांतील स्वतंत्रतेंत येण्यास त्यांस अद्याप फार दिवस झालेले नाहींत. मूर्ख प्रेक्षकांच्या खुषामतीचा अनुभव त्यांना आला असेल; अभिनय आणि गायन या विषयांचें ज्ञानही त्यांस असेल; जगांतील स्वार्थप्रियताही त्यांना दिसली असेल; पण गुणाबरोबर दुरभिमान, धनाबरोबर ऐषआराम, अधिकाराबरोबर बेमुर्वतखोरपणा व लहरीपणा, आणि तारुण्याबरोबर नाना प्रकारचे मोह कसे अंगांत शिरूं लागतात, याचा अनुभव त्यांस नसेल. तेव्हां या गोष्टींच्या भोवऱ्यांतून सुरक्षितपणें आपली आयुष्यरूपी नौका हांकारण्याची बुद्धी ते बाळगतील, आणि आपल्या हितचिंतकांच्या व व्यवसायांत आपल्या बरोबर काम करणारांच्या साहाय्यानें अधिक नांवलौकिक व धन संपादितील, अशी आम्ही आशा करितों.

## पौराणिक नाटककार.



धोंडो भिकाजी मराठे.
सांगलीकर नाटककार.



रा. बळवंतराव मराठे.
सांगलीकर नाटककार.



नरहर गोपाळ सरडे.
कोल्हापूरकर नाटककार.



परशरामपंत साठे.
पुणेंकर स्त्रीनाटककार.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

# महाराष्ट्रीय नट.

## जुने नाटककार.

विष्णुदासांनीं नाटकाची कला दक्षिण महाराष्ट्रांत सुरू केल्यानंतर साठ वर्षें सुमारें पौराणिक नाटकें चालत होतीं. यांत पौराणिक नाटकांची अव्वल पिढी सांगलीकरांची. तिच्यामागून इचलकरंजीकर, कोल्हापूरकर, कवठेकर, तासगांवकर, आळतेकर व पुणेंकर, अशा पुष्कळ मंडळ्या झाल्या. त्यांपैकीं सांगलीकर, इचलकरंजीकर व कोल्हापूरकर यांच्या मंडळ्या एका व्यवस्थेनें चाळीस पंचेचाळीस वर्षे चांगल्या टिकल्या होत्या. त्या वेळीं मंडळींत पगारदार इसम कोणीच नसत. सर्वांचा मुशाहिरा--दोन वर्षांनीं किंवा तीन वर्षांनीं गांवोगांवीं फिरून आल्यावर मूळ गांवीं—ह्मणजे जेथें मंडळी स्थापन झाली असेल, तेथें जाऊन वांटणी करून येईल तो! पुन्हां चार महिने विश्रांति घेऊन नवी तयारी करून मंडळी फिरण्यास निघे. या पद्धतीनें त्या वेळेच्या नाटक मंडळ्या स्थायिक बनलेल्या असत. मध्यंतरीं स्वतःची नुकसान करून घेतल्याशिवाय कोणास मंडळी सोडून जातां येत नसे. व स्वारी अखेर—(एक फेरी फिरून आल्यावर जी वांटणी होई, तिला स्वारी असें ह्मणण्याची जुन्या नाटक मंडळींत वहिवाट असे.) कांहीं तरी रोख पदरीं बांधून प्रत्येक माणसास घरीं जातां येत असे. या सर्व नाटक मंडळ्यांचे जे मुख्य चालक असत, त्यांना नाटककार ह्मणत. हे चालक सूत्रधार असत, किंवा नटही असत. आतांच्या नाटक मंडळ्यांपेक्षां त्या वेळेच्या नाटक मंडळ्यांतून पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या असत. पहिली मुख्य गोष्ट आतांच्या संगीत पात्राला—भाषणाचा व पद्याचा अर्थ समजल्याशिवाय भाषण करण्याची जणूं काय मुभाच आहे. तसा प्रकार त्या वेळीं चालत नसे. भाषणाचा अर्थ समजल्याशिवाय कोणाही पात्राला आपल्या अभिनयाचा ठसा प्रेक्षकांवर उठवितां येत नसे. पूर्वीं नाटक पाहून बाहेर पडल्यावर प्रत्येक पात्राची भूमिका प्रेक्षकांच्या मनांत घोळत असे. तो संस्कार आतांच्या संगीत पात्रामुळें प्रेक्षकांच्या मनावर

टिकत नाहीं. पूर्वीचे चालक किंवा सूत्रधार आपल्या पात्रांना तयार करण्याचे कामांत निष्णात असत, यामुळें त्यांना चांगलीं पात्रें तयार करतां येत असत. पूर्वीच्या नाटक मंडळ्यांत प्रत्येक मंडळींत दोन चार देव कामाचीं, दोन चार राक्षस कामाचीं, कांहीं स्त्रीपात्रांचीं, त्याशिवाय लहान मुलाचीं कामें करणारीं—विदूषकाच्या कामाचा मनुष्य, ऋषिपात्राच्या कामाचा मनुष्य, अशीं माणसें उत्तम असत. एकेका मंडळींत एकेक मनुष्य निरनिराळीं कामें करीत आल्यानें वेळेस पडेल तें काम करण्यास तयार होई. अशांपैकीं तयार होऊन ज्यांनीं आपल्या हयातींत आपली मंडळी उत्तम तऱ्हेनें चालविली, अशांचें चरित्र क्रमशः देत आहों.

## धोंडो भिकाजी मराठे.

“ सांगलीकर हिंदुनाटककार मंडळी ” चे धोंडोपंत हे मालक होते. यांच्या अमदानींत पौराणिक नाटकांबद्दलची आवड लोकांस जास्त उत्पन्न झाली. नाटकाच्या धंद्यांत कर्तृत्ववान व हिंम्मतवान असा हा पुरुष असे. त्यामुळें लहानपणापासून चढत चढत हे नाटकाची मालकी संभाळण्यापर्यंत पोचले. हे मूळचे सांगलीपासून ५ । ६ कोसांवर असलेल्या गणेशवाडी गांवचे राहणारे. हे आपल्या वयाच्या सुमारें ९ व्या १० व्या वर्षी सांगलीकरांच्या नाटकांत शिरले. हें नाटक त्या वेळीं विष्णुदासांच्या मालकींतून बाळंभट नांवाचे एक भिक्षुक असत, त्यांच्या मालकीखालीं आलें होतें. हे प्रथम “ बाळपार्टीची ’ ह्मणजे पौराणिक नाटकांतील लहुकुश, बभ्रुवाहन अशासारखीं कामें करीत. नंतर ते स्त्रियांच्या भूमिका करूं लागले. त्यांत त्यांनीं चांगलें नांव मिळविलें होतें. पुण्यास नाटकगृहें होण्यापूर्वी येथील श्रीमंत सांगलीकरांच्या वाड्यांतील पुढील चौकांत नाटकें होत असत. हा काल सुमारें १८६०।६२ सालचा असावा. त्या वेळीं धोंडोपंतांनीं स्त्रियांची भूमिका घेण्याचें सोडलें होतें. परंतु पुणें येथील लोकांच्या आग्रहानें त्यांनीं उत्तर गोग्रहणांत बृहन्नडेचें काम केलें. तें फारच चांगलें केलें होतें. पुढें हे सूत्रधाराचे मागें उभे राहूं लागले. या वेळीं गोविंदभट करमरकर ह्मणून नाटकाचे मालक असून सूत्रधार होत असत. हे दिसण्यांत मोठे भव्य असून यांची शरीरकांति तेजःपुंज असे त्या वेळीं सूत्रधाराचा पोषाख ह्मणजे मोठें चक्रीदार पागोटें, नानाफड-

णिसासारखा पायघोळ झगा, व कंबरेला शालजोडी, असा असे. या पोषाखाला संक्षेप मिळतां मिळतां सूत्रधारालाही आतां संक्षेप मिळूं लागला आहे. असो. गोविंदभटानंतर धोंडोपंत नाटकाचे मालक झाले. व सूत्रधारही होऊं लागले. यांच्या नाटकांत ऐन भरभराटीच्या वेळीं चांगलीं पात्रें असत. नरसिंहभट जोशी विनायकराव दाणी, गोपाळराव दामले, हे राक्षसी कामांत; गंगाधरपंत मराठे, बळवंतराव मराठे हे देव कामांत; रामभाऊ उकिडवे, पांडोबा काळे, हे स्त्रियांचे कामांत; गोविंदभट खोहे व महादेवभट अग्निहोत्री हे ऋषींची भूमिका करण्यांत, व लखोबा मराठे हे बालभूमिकेंत, त्या वेळीं प्रख्यात असत. गोविंदभट खोले यांचें हरिश्चंद्रांतील विश्वामित्राचें काम, उकिडवे यांचे तारामतीचें काम, लखोबा मराठे यांचे वामन अवतारांतील वामनाचें काम, याबद्दल गेल्या पिढीपर्यंत जेव्हां जेव्हां नाटकाचा विषय निघे, तेव्हां तेव्हां तारीफ झाल्या वांचून रहात नसे.

त्या वेळीं आतांप्रमाणें नाटकांचीं पुस्तकें नसत. नाटक पात्रांकडून सर्व भाषणें तोंडानें पाठ करून घ्यावीं लागत असत. व हें काम नाटकें लिहिण्याइतकें बुद्धीचें असे. पौराणिक कथांच्या आधारावर निरनिराळ्या रसांच्या अनुरोधानें भाषणें बसवून देण्यांत धोंडोपंत मोठे कुशल असत. सांगलीकरांचें हरिश्चंद्र आख्यान, गोपींचा रास, चक्रव्यूह किंवा अभिमन्यु आख्यान, प्रमिला स्वयंवर हे प्रयोग लोकप्रिय असत. स्त्रीपात्रांचा संग्रह धोंडोपंतांच्या मंडळींत नेहमीं चांगला असे. नाचकाम धोंडोपंत चांगलें जाणत असत, व तयार करवीत असत.

नाटक मंडळयांतील प्रतिष्ठित मंडळींत धोंडोपंत सांगलीकर याच्या मंडळीचें नांव असे. पूर्वी संस्थानांतून नाटक मंडळया गेल्या असतां त्यांचा तेथें चांगला परामर्श घेतला जात असे. बडोदें, इंदूर, येथील खंडेराव महाराज व तुकोजीराव व बाळासाहेब महाराज यांचा धोंडोपंतांवर लोभ असे.

पूर्वींच्या नाटकांतून सूत्रधारांचें फार महत्त्व असे. नाटकाचा आरंभ झाल्यापासून संपेपर्यंत उभें राहून त्याला नाटकाचीं सर्व सूत्रें चालवावीं लागत असत. धोंडोपंतांसारखा सूत्रधार नाहीं, अशी त्या वेळीं लोकांची समजूत असे.

परशुरामपंत गोडबोले यांचें गद्यपद्यात्मक मृच्छकटिक धोंडोपंतांनीं प्रथम रंगभूमीवर पुणें येथें १८७७।७८ सालीं डेक्कन कालेजमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाखालीं आणलें. तें फार लोकप्रिय झालें होतें. यांत स्वतः धोंडोपंत चारुदत्ताचें काम करीत असत. याशिवाय नारायणराव पेशवे यांचे वधाचे नाटकांत राघोबादादा, दामाजीपंताचें नाटकांत दामाजीपंत हीं कामें ते फार चांगलीं करीत. सुमारें ४० वर्षे त्यांची नाटक मंडळी भरभराटींत होती. पुढें संगीताचा प्रसार झाला. यांचें उतार वय झालें. व ते डोळ्यांनीं पंगू झाले. यामुळें यांची कंपनी मोडकळीस आली. व उतारवयाची तरतूद अगोदर जशी करून ठेवावयास पाहिजे, तशी न ठेवल्यामुळें यांचा अंतकाळ वाईट दशेंत गेला. हे स्वभावानें दिलदार व परोपकारी असे होते. यांनीं " विलासतरंगिणी " नांवाचें एक नाटक रचलें होतें. परंतु तें सामान्य होतें. सांगलीनजीक हरिपुर येथें यांचें मंडळींचें सदर ठिकाण असे. तेथेंच हे सुमारें १८९९ मध्यें वयाचें ६० वें वर्षीं वारले. यांस एक ३५ वर्षांचा मुलगा आहे.

---

## बळवंतराव मराठे.

" सांगलीकर हिंदी नाटक मंडळी " चे हे मालक आहेत. धोंडोपंत यांचे चरित्रांत सांगितलेले बळवंतराव मराठे ते हेच. यांची मंडळी अद्याप आहे. प्रथम हे धोंडोपंत सांगलीकर यांचे नाटकांत होते. त्यांतून यांनीं व महादेवभट अग्निहोत्री यांनीं निघून दुसरी सांगलीकर मंडळी काढली, व ती सुमारें चाळीस वर्षे चांगली चालविली. तंजावर, बडोदें, पुणें, बेळगांव, इकडे या मंडळीच्या स्वाऱ्या झाल्या आहेत. पुणें येथें १८५४ सालाच्या सुमारास मोरोबा दादांच्या वाड्यांत नाटक उभारून या मंडळीनें खेळ केले आहेत. पुढें इकडे संगीत झाल्यापासून व पौराणिक नाटकें मोडत आल्यापासून या मंडळीनें मद्रास, ह्मैसूर, कटक, ओरिसा या प्रांतांकडच हिंदुस्थानींत पौराणिक नाटकें बसवून स्वाऱ्या केल्या. मराठे हे स्वतः नाटककारही आहेत. यांनीं कांहीं संगीत व कांहीं गद्य नाटकें हिंदुस्थानींत व मराठींत रचलीं आहेत. तीं येणें प्रमाणें—

संगीत मराठी नाटकें–१ संगीत सारंगधर, २ नल दमयंती व ३ पद्मावती. व हिंदी रचलीं आहेत तीं–१ गोपीचंद, २ गालवचरित्र, ३ कृष्णपारिजातक, ४ सारंगधर, ५ श्रियाळचरित्र, ६ रुक्मांगद, ७ चंद्रकांत, ८ वसंतमाधव, ९ जयंत व जयपाळ, १० उषापरिणय, ११ बभ्रुवाहन, १२ विक्रमचरित्र, १३ पद्मावती-परिणय, १४ शाकुंतल, १५ सुभद्रा, इत्यादि.

मराठे हे चांगले नट आहेत. पुणें येथें धोंडोपंत सांगलीकराचे व श्रीपादपंत लेले सांगलीकर यांच्या नाटकांचे सामने १८६९ सालीं झाले. त्यांत धोंडोपंतांकडे बळवंराव मराठे हे देव कामांत असत. व कर्णपर्व, किरातार्जुन युद्ध हे सामान्याकरितां प्रयोग लाविलेले असत. यांत मराठे हे कर्ण व किरात झाले होते. या सामन्यांत पुण्यांतील त्या वेळचे विद्वान् व सर्वांना वंदनीय असे कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरूनाना छत्रे, अशी मंडळी पंच असत. हा सामना धोंडोपंत यांच्या मंडळीनें जिंकला होता. सांगली मिरजेकडे ज्या वेळीं हीं पौराणिक नाटकें होत असत, त्या वेळीं बळवंतराव मराठे यांची उत्तम नटांत गणना असे. सुरतसुधन्वा आख्यानांत सुधन्व्याची भूमिका मराठे यांची चांगली होत असे. हा प्रयोग त्या वेळीं इतका लोकप्रिय होता कीं, त्या प्रयोगांतील सुधन्व्याची पत्नी होणाऱ्या नटास "प्रभावती" हें पडनांव पडले होतें. बळवंराव हे तरवार खेळण्यांतही पटाईत आहेत. "सांगलीकर" या नांवाच्या तीन मंडळ्या झाल्या. प्रथम मूळची सांगलीकर मंडळी. तिचे धोंडोपंत हे तिसऱ्या पिढीचे मालक झाले. त्यांनीं सुमारें तीस वर्षें आपली मंडळी चालविली. मराठे हे कांहीं मंडळीसह पूर्वीच त्यांच्यांतून फुटून निघाले होते. त्यांनीं स्वतंत्र मंडळी काढल्यास आज जवळ जवळ बेचाळीस वर्षें झालीं. त्यामुळें सांगलीकर नाटक मंडळीची परंपरा आज सुमारें ७० वर्षें कायम ठेवण्याचें श्रेय बळवंतराव मराठे यांनीं मिळविलें आहे. यांचें वय आज सुमारें ६५ वर्षांचें आहे. इतकीं वर्षें अव्याहत धंदा चालदिण्याची यांची हिम्मत वर्णन करण्यासारखी म्हटली पाहिजे. यांनीं नाटकगृहाच्या आकारासारखा एक स्वतःचा तंबू करविला होता. व तो घेऊन ते मद्रासेकडे फिरत असत. परंतु वाऱ्याच्या कामाला तो उपयोगी पडेना. यांनीं सांगलीजवळ स्वतःचा जमीन जुमला बराच केला

आहे. अलीकडे पगाराखेरीज नाटक मंडळींत माणसें मिळेनाशीं झाल्यामुळें यांचा विचार आतां पुढें मंडळी चालविण्याचा नाहीं. त्यांनीं पूर्वी चालविलेल्या पद्धती-प्रमाणें ह्मणजे भागीदारांच्या पद्धतीनें नाटक मंडळ्या चिरस्थायी असत. पूर्वी सर्वांचें हित अनहित एक आहे, असें समजलें जात असे. आतां पगारी पद्धतीनें लोक " टाकभाड्याचें काम " अशा पद्धतीनें कामें करतात. व त्यांच्यासारख्या दूरच्या देशांत जाऊन नाटकें करणाऱ्या मंडळीला अशा उपरी मंडळींना घेऊन जाण्याचें धोक्याचें वाटत असावें, असें दिसतें.

पूर्वीच्या नाटक मंडळ्या बाळबोध वळणाच्या असत. पुढें जीं नाटक मंड-ळ्यांतून व्यसनें वाढलीं, तीं त्यांच्यांत नसत. त्या वेळच्या चालीप्रमाणें मोठीं माणसें दोन वेदाक्षरें शिकलेलीं असत. व ब्राह्मण वर्गांतीलच लोक या धंद्यांत पुष्कळ असत. त्यामुळें प्रत्येकजण आचारविचार संभाळून वागे. त्या वेळीं दक्षिण महाराष्ट्रांत रेलवे नव्हती. व इंग्रजी विद्येचा प्रसार नव्हता. तेव्हां इंग्रजी व्यसनेंही नव्हतीं. आतांच्या परिस्थितींत कोणी मनुष्य कसाही वागला, तरी त्यास तसें वागतां येतें. लोकांच्या बरें वाइट ह्मणण्याची पर्वा करावयाची नाहीं, असें जरी त्यानें मनांत आणलें, तरी चालेल. चाळीस वर्षांपूर्वी तशी स्थिति नव्हती. नाटक मंडळ्यांना मुळींच मान नसे. नाटकाव्यतिरिक्त बहिष्कार घातल्याप्रमाणेंच बहुतकरून त्यांना वागविण्यांत येई. त्यांना घरीं बोलवावयाचें तरी लोकांना भिऊन ! त्यांच्या बरोबर बाहेर फिरावयाचें तरी लोकांना भिऊन ! अशा स्थितींत धंदा करून दिवस काढा-वयाचे; अशी त्या वेळची नाजूक स्थिति होती. परंतु जुनी नाटक मंडळी अशा स्थितींत रहात असे. ह्याचें कारण त्यावेळचे चालक धोरणी असत व चार प्रतिष्ठित मंडळींच्या आर्जवानें राहून त्यांचें बरें म्हणवून घेत असत.

बळवंतराव मराठे यांची मंडळी फिरावयास गेली, ह्मणजे बाहेर जी प्राप्ति व्हावयाची, ती त्यांनीं हरिपुरचे 'लागू' ह्मणून सावकार असत, त्यांच्या येथें जमवून ठेवावयाची, व स्वारी फिरून आल्यावर तिची वांटणी करून सर्व मंडळीनें हातांत सोन्याचीं कडीं घालून घरोघर जावयाचें. हा जुन्या नाटक मंडळ्यांचा क्रम असे. धोंडोपंतांचे सावकार गोखले, व इचलकरंजीकर मंडळीचे दाते. याप्रमाणें जी ती

मंडळी आपापल्या सावकाराकडे दोन दोन वर्षे रकमा शिलकी ठेवीत असे. जशा भागीच्या पेढ्या किंवा दुकानदार वर्षाअखेर हिशेब पाहून नफातोटा वांटून घेतात त्याप्रमाणें जुन्या नाटक मंडळ्यांची वहिवाट असे. त्यामुळें फाटाफुटीचे हल्लींपेक्षां पहिल्या मंडळींतून कमी प्रसंग येत असत.

बळवंतराव यांच्या मंडळीसंबंधानें माहिती देतांना तेलंगणांतील लोक यांचीं नाटकें किती श्रद्धेनें पहात असत, याची माहिती द्यावीशी वाटते. पूर्वी सूत्रधारानें नाटकारंभीं मारुती स्टेजवर आणून ठेवावयाचा, व नंतर नाटकास सुरवात व्हावयाची, अशी वहिवाट असे. ही गोष्ट आतांच्या पिढींतील लोकांस कदाचित् माहित नसेल. ही पद्धत अद्याप बळवंतरावांच्या मंडळीनें कायम ठेविली आहे. त्यामुळें नाटकाच्या दिवशीं मारुतीपुढे ठेवण्याकरितां म्हणून नारळ, पोफळें, सुपाऱ्या, अंब्याच्या दिवसांत आंबे--मेवामिठाई, इत्यादि पदार्थ विजयानगर, राजमहेंद्री व त्याच्याजवळ असलेलें अमलापूर, इकडे पाट्याच्या पाट्या लोक आणून देतात. चाळीस वर्षांपूर्वी पौराणिक नाटकांत गणपतीसरस्वतीला नवस करणारे लोक हैदराबादकडे असत. व नाटकानंतर जी आरती होत असे,तिच्यांत ओवाळणीचा चाळीस रुपयापर्यंत खुर्दा जमत असे. परंतु अद्यापही भाविकपणानें नाटकें पाहणारे लोक कोठें कोठें आहेत, या गोष्टीचें आम्हांस कौतुक वाटतें.

गेल्या वर्षी बळवंतराव हे हरिपुर येथें स्वारी फिरून येऊन स्वस्थ बसले आहेत. नाटकाइतकीं शरीरमेहनतीचीं व जागरणाचीं कामें दुसरीं कोणतीं नाहींत. परंतु वाईट व्यसन न बाळगितां राहिलें, तर नाटकांतील मनुष्य कसा राहूं शकतो, याचीं जुन्या नाटक मंडळींतील उदाहरणें देतां येतील. इंग्रजी नटांचीं जी चरित्रें आमच्या वाचण्यांत आलीं आहेत, त्यांत पुष्कळ नट असे आहेत कीं, ६०।६५ वर्षेपर्यंत रंगभूमीवर काम करून त्यांनीं विश्रांतीहि बरीच घेतली आहे. आमच्या इकडे गोपाळराव दाते, विनायकराव कवठेकर, बळवंतराव मराठे, यांचें जीवनचरित्र आम्हांस यांच्या हयातींत देण्याची उत्तम संधि मिळाली, याबद्दल आम्हांस अभिमानपूर्वक आनंद वाटत आहे.

# नरहरबोवा कोल्हापूरकर.

" चित्तचक्षुचमत्कारिक कोल्हापूरकर हिंदु नाटक मंडळी " नांवाची एक प्रसिद्ध नाटक मंडळी सुमारें १५ वर्षांपूर्वी होती. तिचे नरहरबोवा हे मालक असत. नरहरबोवा नाटक मंडळी चालविण्याच्या कामांत अत्यंत हुषार, धोरणी व आर्जवी असे गृहस्थ असत. नाटकी गुणांतही हे वाकबगार असत. यांची मंडळी सांगलीकर, इचलकरंजीकर, यांच्याप्रमाणें चांगलीं पात्रें संग्रहीं असल्याबद्दल प्रसिद्ध असे. विनायकराव कवठेकर हे यांच्यातील प्रसिद्ध नट होते. राघोबा शेणवी, रामभाऊ साने, व्यंकणभट, हीं त्यांच्या नाटकांतील प्रसिद्ध पात्रें होऊन गेलीं. एके काळीं प्रत्येक नाटक मंडळी चांगल्या चांगल्या पात्रांबद्दल प्रसिद्ध असे. त्यांत कोल्हापूरकर मंडळीचेंही नांव असे.

नरहरबोवांचा जन्म सन १८४० मध्यें झाला. यांचें बाळपण कोल्हापुरांत द्वडपणांत गेलें. कुस्ती करण्यांत हे पटाईत असत. व यावरच पैसे मिळवून यांनीं नाटक मंडळी सन १८६१ त उभारली. कै० आण्णासाहेब किर्लोस्करांचें ' शांकर दिग्विजय ' नाटक यांच्या मंडळीमुळें विशेष प्रसिद्धीस आलें होतें. या नाटकांत हे शंकराचार्यांची भूमिका करीत. त्यांची दक्षप्रजाप्रति आख्यानांतील दमित ऋषींची भूमिका कोल्हापुरच्या प्रांतांत प्रसिद्ध असे. दुर्गा नाटकांत ते चंद्ररावाची भूमिका करीत असत. हीं सर्व नाटकें एके काळीं सर्वप्रिय होतीं. पौराणिक नाटकांत हे सूत्रधार होत असत. यांनीं आपल्या मंडळींत संगीतही चालू ठेविलें होतें.

नाटकांतील देखावे, पडदे, इत्यादि प्रकार यांनींच प्रथम सुरू केले. पूर्वीच्या " कीचक वध " या नाटकास त्या वेळीं " सैरंध्री किंवा विराटपर्व " नाटक असेंही ह्मणत असत. नाटकांत याच्याकडे जिमूतमल्लाची भूमिका असे. पुणें मुक्कामीं या प्रयोगाचे वेळीं एकदां यांची ह्मणजे जिमूतमल्लाची कुस्ती भीमाशीं—बल्लवाशीं झाली. ती पाहून त्या वेळच्या नगरकरांच्या तालमीचे वस्ताद इतके खूष झाले कीं, त्यांनीं आपली इच्छा यांच्याशीं कुस्ती करण्याची दर्शविली. नरहरबोवांची मेहनत सुटली होती, तरी त्यांना कुस्ती करावी लागली, व तिच्यांत तेच विजयी झाले, असें सांगतात.

( वर्ष ५ अंक ५-६ वरून पुढें चालू )

जुन्या नाटककारांत नरहरबुवा कोल्हापूरकर यांचें नांव वारंवार निघण्यासारखें आहे. संगीत नाटकें निघाल्याबरोबर कै. अण्णासाहेबांपासून त्यांच्या नाटकांची परवानगी घेऊन व संगिताकरितां स्वतंत्र पात्रें ठेवून संगीत प्रयोग करण्यास त्यांनीं सुरवात केली. ' स्वैर सकेशा अथवा प्रबोध विद्युत् ' नांवाचें गद्यपद्यात्मक एक नाटक १८७१ मध्यें प्रसिद्ध झालें होतें. तें सामाजिक होतें. त्याचा प्रयोग नरहरबुवांच्या मंडळीनें रंगभूमीवर आणला होता. हें नाटक कल्पित म्हणून लिहिलेलें होतें असें जरी प्रस्तावनेंत म्हटलेलें आहे तरी वस्तुस्थिति अशी होती कीं, प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीवर तें नाटक ग्रंथकर्त्यानें लिहिलें होतें. त्यामुळें तसेंच पात्राच्या अभिनयकुशलतेमुळें तें फारच लोकप्रिय झालें होतें. परंतु त्यांतील संविधानकांत जीं पात्रें आणलीं होतीं तीं ज्यांना उद्देशून होतीं त्या प्रत्यक्ष असलेल्या लोकांच्या विनंतीवरून तो प्रयोग करणें नरहरबोवांस सोडून द्यावें लागलें.

नाटकमंडळ्यांतून बेदा उत्पन्न करणारीं माणसें असतात ही गोष्ट प्रत्येक नाटकमंडळीच्या अनुभवांतली आहे. नरहरबोवापासून चांगलीं पात्रें तयार होऊन बाहेर पडलीं तरी पुन्हा नवीं पात्रें तितक्याच तोलाचीं तयार करून त्यांनीं मंडळी चालविली होती. नाटककारांत नरहरबोवांचें नांव चांगलें निघतें याचें कारण त्यांनीं आपली वागणूक ' नाटकी ' पद्धतीची ठेविली नव्हती, सुशिक्षित लोकांशीं त्यांनीं दळणवळण ठेवलें होतें. दुर्गा, शुकरंभासंवाद, संगीत संभाजी हीं नाटकें प्रथम त्यांनीं

विद्वान लोकांपासून बसवून घेऊन लोकप्रिय केली. पूर्वीं सीनसिनरी व संगीत नाटकें नव्हतीं अशा वेळीं भाषण व अभिनयानें उत्तम नाटकें करून दाखविणें व प्रेक्षकांचें मनरंजन करणें हीं कामें नाटक मंडळ्यांचीं असत तीं नरहरबोवा चतुरपणानें व दूरदर्शीपणानें करीत असत. त्यांनीं आपली मंडळी सुमारें ४२ वर्षे उत्तम चालविली. शेवटीं १८९८ मध्यें आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी ते वारले. त्यांच्या पश्चात त्यांचा एक मुलगा आहे.

## परशुराम रामचंद्र साटे.

'विबुधजन चित्तचातक स्वाती वर्ष पुणेंकर हिंदुस्त्री नाटक मंडळी' नांवाची जी एक नाटक मंडळी असे तिचे परशुरामपंत हे मालक असत. पौराणिक मंडळ्यांत जीं नाटक पात्रें प्रसिद्ध होऊन गेलीं त्यांत पुणेंकर मंडळींत हे साटे देवकाम करण्यांत प्रसिद्ध पात्र असत. इतर नाटकमंडळ्यांपेक्षां त्यांच्या नाटकांत विशेष हा होता कीं, त्यांच्या नाटकांत स्त्रियांचीं कामें स्त्रियाच करीत असत. साटे स्वतः देखणे व देव कामास योग्य असत 'विराटपर्व कीचक वध' 'बभ्रुवाहन आख्यान' 'भीष्म पर्व' 'कर्णपर्व' इत्यादि भारतीय खेळ, 'बाणासूर अथवा उषा हारण' 'पारिजातक' 'नरसिंह आवतार' इत्यादि पौराणिक खेळ साटे यांची मंडळी करीत असे. पुढें लोकांची भक्ति गद्य नाटकावर दिसूं लागली तशी तीं नाटकें रंगभूमीवर आणण्याची सुरवात साटे यांनीं केली. गोपाळ अनंत भट मुनसफ यांनीं रमा व तारा नांवाचीं दोन नाटकें रचलीं होतीं. तीं साटे यांच्या मंडळीनें लोकप्रिय केलीं. साटे गद्य नाटकांत मात्र काम करीत नसत. पुणेंकर मंडळी सुमारें ४० वर्षे

अस्तित्वांत होती. तिच्या पहिल्या अमदानीचे मालक अण्णा इनामदार म्हणून इंदापूरचे एक गृहस्थ होते. नंतर परशुरामपंताकडे तिची मालकी आली व तेच पुणेंकर मंडळीचे अखेरीपर्यंत मालक होते. परशुरामपंतासंबंधानें वर्णन करावयाचें म्हणजे मुख्य त्यांच्या निर्व्यसनीपणाबद्दल करावयास पाहिजे. कारण त्या वेळेच्या नाटकमंडळ्यांत व्यसनाचें प्राबल्य फार, लोक काय म्हणतील याचीही फारशी भीति नाहीं. त्यांत धंद्याकारितां घेतलेल्या स्त्रियांचा समुदाय नेहमीं भोवतालीं असलेला, अशा स्थितींत आपलें वर्तन सभ्य गृहस्थाप्रमाणें ठेवावयाचें हें कठीणच म्हटलें पाहिजे. तें त्यांनीं ठेवलें होतें. साठे हे स्वभावानें फार चांगले होते. मरणापूर्वींच यांनीं नाटक मंडळीचा पसारा आवरून विश्रांति घेतली होती. १८९५ सालापर्यंत पुणेंकर मंडळी अस्तित्वांत होती. परंतु दिवसेंदिवस पौराणिक नाटकें अप्रिय होत चाललीं व प्रोज नाटकायोग्य पात्रें त्यांच्या संग्रहीं नव्हतीं त्यामुळें साठे यांनीं आपला व्यवसाय सोडला व पुढें ते एक दोन वर्षांतच १९०० सालामध्यें वारले.

## रावजी पवार.

पुणेंकर नाटकमंडळींत हे प्रसिद्ध देव व राक्षस कामाचें पात्र होतें; व आतां जशीं नाट्यसमाजांत किंवा प्रेक्षकसमाजांत नाट्यविषयक चर्चेंत नटवर्गाचीं नांवें निघालीं असतां शाहुनगरवासींतले गणपतराव किंवा किर्लोस्कर व इतर संगीत मंडळींतल्या पूर्वी होऊन गेलेल्या व प्रस्तुत प्रसिद्धीस आलेल्या पात्रांचीं नांवें निघतात, त्याप्रमाणें "रावजी पवार" हें नांव पौराणिक नाटकाच्या काळांत सर्वांच्या परिचयाचें असे. हा मनुष्य मराठा जातीचा असे, परंतु याची वाणी शुद्ध व रसाळ असे. त्यामुळें

याचें भाषण ऐकण्यास गोड लागत असे. पौराणिक नाटकें पुराणांतील सरळ कथाभागाच्या अनुरोधानें करून दाखविण्यांत येत असत. त्यांची आवड लोकांत उत्पन्न करून देण्यास रावजी पवार सारख्या पात्रांनीं फार मदत केली आहे. "भीष्मपर्वांत" याच्याकडे भीमाची भूमिका असे. "विराटपर्वांत" कीचकाची असे. दोन्ही प्रयोगाच्या दिवशीं याचें भीष्माचें व कीचकाचें काम पाहण्याकरितां पुण्याचें आनंदोद्भव नाटकगृह तिन्हीं मजले प्रेक्षकांनीं भरून जात होतें. असलीं नाटकें आतां पाहण्यास मिळावयाचीं नसल्यामुळें त्यांतील पात्रांची बरोबर कल्पना करून देणें अशक्य आहे. याच्या कामाची भरभराट १८७८ १८७९ पर्यंत होती. पुढें याच्या जोडीचीं नाटकपात्रें नाहींशी झाल्या-मुळें तीं नाटकें मागें पडलीं; व याची रीज पडेना. नाटकांतला याचा काळ साठे यांच्या मंडळींतच गेला. पुढें नुसती पुणेंकर या नावानें नाटकमंडळी निघाली होती, तिच्यांत हा मधून मधून काम करीत असे. ही पुणेंकर मंडळी "खरी नाटकी" होती ह्मटलें तरी चालेल. त्यामुळें गृहस्थी पेषांतल्या लोकांत या मंडळीची व तिच्यांतील पात्रांची चहा नसे. पुढें पुढें तर अगदींच गटारावरची मंडळी सोंगाला येऊं लागली व नाटकाविषयीं लोकांच्या मनांत तिरस्कार येण्याला हेंच कारण उत्पन्न झालें. पवार यानें पुढें नाटकाचा धंदा सोडून दिला. नाटकांत असतांनाच पुण्यांत याचें अफू विक्रीचें दुकान असे. त्यांतही त्याला फायदा झाला नाहीं. इ० स० १८८० च्या पुढें हा केव्हां व कोठें वारला हें समजलें नाहीं.

# कै. बाबाजी दौलतराव राणे.



जन्म शके १७९६,
वैशाख वद्य १२.

मृत्यु शके १८३५,
कार्तिक कृष्ण ९.

[ पुणें " किर्लोस्कर " छा. छा. ]

# महाराष्ट्रीय नट.

[ वर्ष १ अंक ९ वरून पु. चा. ]

## बाबाजी दौलतराव राणे.

नाटक धंद्यांतील कर्त्या पुरुषांत ज्यांची गणना करतां येईल, अशांत ज्यांचें नांव निघेल, असे पुरुष बाबाजी दौलतराव राणे हे होत. यांची जन्मभूमि जिल्हा रत्नागिरी तालुकें राजापूरमधील डोंगर ही होय. यांचा जन्म शके १७९६ वैशाख व० १२ रोजीं मातुल घराणें तेथीलच शेलार यांचें घरीं झाला. यांच्या वयाच्या सहाव्या महिन्याचे सुमारास यांचे वडील परलोकवासी झाले. नंतर राणे यांचें पालनपोषण त्यांच्या मातोश्री वारणाबाई राणे यांनीं आपल्या बंधूच्या घरीं केलें. यांचा मराठी पांचव्या यत्तेपर्यंतचा अभ्यास तेथेंच चवदाव्या वर्षापर्यंत झाला; नंतर कांहीं तरी उद्योगधंदा करावा, या हेतूनें त्यांच्या मातोश्रींनीं व मामांनीं राणे यांस मुंबई येथें मामाचे घरीं पाठवून दिलें. पुढें दोन महिन्यांनीं राणे हे मुंबई येथील जगदीश्वर छापखान्यांत कंपॉझिटरचें काम शिकूं लागले. त्या कामांत चार आठ महिन्यामध्यें चांगली माहिती करून घेतल्यावर बारापंधरा रुपयपये पगारावर वरील छापखान्याची नोकरी दोन वर्षेपर्यंत केली. या सुमारास यांचें लग्न झालें व ते सहकुटुंब मुंबईस राहूं लागले.

राणे यांना गाण्याबजावण्याचा थोडा बहूत नाद असल्याकारणानें मुंबई येथें " विद्वज्जनाश्रित नाट्यामोद प्रसारक समाज " या नांवाची एक मंडळी होती तिच्यांत ते सामील झाले. वरील मंडळीची कधींतरी गद्य व संगीत अशीं नाटकें होत असत. त्यांत राणे प्रमुख स्त्री पार्टीची भूमिका घेत असत. याप्रमाणें एक वर्ष गेल्या नंतर छापखाना सोडून ते मुंबई येथें नवीन निघालेल्या " न्यू व्हिक्टोरिया

नाटक " मंडळींत मुख्य स्त्री पार्टाचें काम करण्याकरितां वीस रुपये पगारावर राहिले. मुंबई, वसई, ठाणें, पुणें, बेळगांव, हुबळी, वगैरे ठिकाणीं फिरून कोल्हापुराहून ही मंडळी पुन्हां पुण्यास परत आली. व तेथें मंडळीमध्यें आपसांत भानगड उपस्थित होऊन फुटाफूट झाली. त्यावेळीं राणे व त्यांचे बरोबर कांहीं मंडळी वेगळी निघाली. व पुण्यासच कांही दिवस विश्रांति घेत बसली. राणे पुढें धुळें येथें "भवसागरानंद लहरी " नांवाची नाटक मंडळी होती, तिच्यांत पंचवीस रुपये पगारावर राहिले. तेथ सुमारें आठ महिने होते. परंतु तीही मंडळी पुढें टिकली नाहीं, आकोल्यास मोडली. तेव्हां राणे यांनीं आपल्या बरोबर असलेल्या मंडळीच्या मदतीवर स्वतःच नवीन नाटक मंडळी काढण्याचा आकोला येथें विचार केला. व " मुंबईकर नाटकमंडळी " या नांवानें चारवर्षपर्यंत वऱ्हाड, खानदेश, व माळवा या प्रांतांत हिंडून मंडळी नांवारूपास आणली.

राणे यांना कविता करण्याचाही नाद असे. त्यांनीं आपल्या मंडळी करितां " वीरसेन-मंजरी " " रूपसेन रूपवती " " अल्लाउद्दीन," " वीरांगना " व " कुसुमचंपा, " इत्यादि नवीन नाटकें पारसी तऱ्हेवर व पारसी नाटकाचे फेरफार करून बसविलीं. या नाटकांचेही भक्त प्रेक्षक असत. १९०३ चे सुमारास त्यांनीं आपली मंडळी मुंबईस आणली. मुंबई शहरीं मुंबईकर या नांवाच्या किरकोळ नाटक मंडळ्या पुष्कळ असतात, त्यांत आपल्या मंडळीची गणना होऊन आपलें वजन पडणार नाहीं, ह्मणून त्यांनीं स्वतःच्या राहत्या गांवच्या तालुक्याचें " राजापूरकर नाटक मंडळी " हें नांव मंडळीस दिलें हा कालपर्यंत वर सांगितलेल्या वीरसेनमंजिरी

इत्यादि नाटकांवर त्यांची मंडळी चालली होती. बहुतेक अडाणी समाज या नाटकांचा भोक्ता असे; परंतु आतां राणे यांनीं नाटकाची दिशा बदलली. त्यांतच कंपनीची सर्व प्रकारची जबाबदारी संभाळण्याची जोखीम. रा. राणे यांच्यावर पडल्यानें नाटकें लिहिण्याचें काम त्यांच्या हातून होईना म्हणून त्यांनीं दुसरे नवीन ग्रंथकार हाताशीं धरून त्यांच्याकडून भक्तिरस प्रधान अशीं चार नाटकें करवून घेतलीं. पहिलें भक्तिरसप्रधान नाटक. "संगीत दामाजी" १९०४ मध्यें रा. लक्ष्मण नारायण जोशी यांचे कडून करवून घेतलें; परंतु तें विशेष लोकप्रिय न झाल्याकारणानें सातारा येथील रा. आगटे यांच्याकडून "उदार दामोदर" चरित्राच्या आधारें पुन्हां नवीन तयार करविलें या नाटकापासून राणे यांचा उत्कर्ष सुरू झाला म्हटलें तरी चालेल.

१९०५ मध्यें चाळीसगांव येथें मंडळी असतां एका रात्रीं कच्या बांधलेल्या नाटकगृहास आग लागून सर्व सामानाची अग्नी-नारायणानें आहूती घेतली. परंतु अशा प्रसंगीं राणे यांनीं आपलें धैर्य खचूं न देतां चार महिन्याच्या अवधींत सर्व सामान नवीन तयार केलें; व शंकर विनायक वढावकर व रा० दत्तात्रय विष्णू तिनईकर या दोघांस पगारी ठेवून त्यांजकडून पंढरीमहात्म्याचे आधारें "श्री पुंडलिक" नांवाचें आणखी नवें दुसरें नाटक तयार करून घेतलें. या दोन नाटकांवर महाराष्ट्र, खानदेश, वऱ्हाड, मध्यप्रांत या ठिकाणीं फिरून आल्यावर संगीत "तुकाराम" नांवाचें नाटक तयार करून बसविलें. त्याचे प्रयोग १९११ पासून सांगली येथें सुरू झाले, त्यालाही सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी इत्यादि गांवीं सर्वोत्तम असा लोकाश्रय मिळाला. पुढें मंडळी कोल्हापूर सरकारच्या पुतणीच्या लग्नानिमित्त कोल्हापूर मुक्कामीं

गेली असतां १९१२ च्या एप्रील महिन्यांत राणे यांची कांहीं नोकर मंडळी व बरेचसे नट एकदम यांना सोडून गेले. राणे यांनी त्यावेळा मिळाली ती नवी मंडळी जमवून पांच दिवसाच्या अवकाशांतच पुन्हां संत तुकाराम नाटकाचा पहिला प्रयोग श्रीमंत करवीर छत्रपतीच्या आश्रयाखालीं मोठ्या हिमतीनें पार पडला. या प्रसंगीं बाबाजीरावांना निघालेल्या मंडळीस इजित न जातां पुन्हां जमवाजमव केल्याबद्दल त्यांची चोहोंकडे तारीफ झाली. व तेथें सबंध मे महिना मुकाम करून जूनमध्यें मंडळी मुंबई येथें आली. मुंबईस आल्यापासून सुमारें अकरा महिने "संत तुकाराम," "पुंडलीक," "दामाजी" या नाटकांचे प्रयोग सारखे चालू होते.

गुजराथी नाटक मंडळ्यांनीं आपल्या समाजास भक्तिरस नाटकाची जशी गोडी लावली तशी बाबाजीरावांनीं खालच्या वर्गांत भक्तिरस प्रधान नाटकाची गोडी प्रथम लावली. त्यानंतर इतर मंडळ्या त्यांचें अनुकरण करूं लागल्या. नाटकधंद्यावर कमाई करून स्वस्थ न बसतां त्या धंद्याचें पाऊल पुढें पडावें अशी बाबाजीरावांची फार इच्छा होती. आपण जवळ जवळ आज १५।१६ वर्षे हा नाटकधंदा करून पैसा व लौकिक पुष्कळ संपादन केला. चार मंडळींचें प्रेम संपादन केलें. आणि या धंद्यावर आपल्या कुटुंब पोषणाचें साधन सर्व साधारण रीतीनें करून ठेविलें. पण ज्या धंद्यावर मी आपला उत्कर्ष करून घेतला त्या धंद्याच्या उत्तेजनार्थ मी विशेष असें कांहींच केलें नाहीं, करितां या धंद्याला उपयोगी पडणारें असें एखादें कायमचें नाटकगृह मुंबई मुक्कामीं स्थापन करावें. पण मुंबई मुक्कामीं नाटकगृह स्थापन करण्याइतकी मोठी शक्ती माझ्या अंगीं नसल्यामुळें निदान

मुंबईच्या आसपास २५ कोसांचे आंत ठाणें अगर कल्याण या दोन गांवांपैकीं कोणत्या तरी एका गांवीं जागा घेऊन तेथें कायमचें नाटक-गृह बांधावें असें मला वाटतें व तसें केलें असतां मी आजपर्यंत मिळ-विलेल्या लौकिकांत आणि वित्तांत भर घातल्यासारखें होऊन अल्प-प्रमाणानें कां होईना पण या नाटकधंद्याची सेवा केली असें होणार आहे; असे विचार त्यांच्या मनात येऊं लागले. या विचाराला मंडळीचे व मुंबईतील त्यांचे स्नेही रा. रा. दामोदर सावळाराम यंदे, रा. रा. खंडेराव पांडूजी वनकर, रा. रा. माणगांवकर वगैरेंचे अनुमोदन मिळतांच रा. राणे यांनीं कल्याण येथें नाटकगृह बांधण्याचें स्थळ पसंत केलें. कल्याण हें स्थळ मुंबईपासून जवळ व जंक्सनचा गांव असल्यानें रेल्वेनें पांच पन्नास गांवच्या लोकांस येण्याच्या सोयीचें, मुंबईचे नाटकाचे कायदे उत्तरोत्तर नाटक-मंडळ्यास त्रासदायक, शिवाय मुंबईची राहणी दिवसेंदिवस खर्चाची वाढूं लागल्यानें सर्व नाटकमंडळ्याच्या विचारानेंच कल्याणास नाटकगृह बांधण्याचा त्यानीं विचार कायम केला; व ३५०० रुपयांस जागा खरेदी केली. जानेवारी १९१३ मध्यें नाटकगृहाचे पायाचा कल्याण येथील मामलेदार रावसाहेब विनायक हरिश्चंद्र ठाकूर यांनीं बसविला. थिएटरच्या इमारतीचें काम रा. राणे यांनीं स्वतःचे देखरेखीखालीं तीन महिन्याचे आंत पूर्ण करून घेतलें; व एप्रीलमध्यें कल्याण येथील नागरिकाचें मदतीनें व गांवांतील विद्वान ब्राह्मणांचे हस्तें नाटकगृहाची वास्तुशांत करविली. जें नाटक त्यांस यशदायी व फलदायी झालें तेंच नांव "संत तुकाराम नाटकगृह" या नाटकगृहास ठेविलें. जून महिना अखेरपर्यंत कंप-नीचा मुक्काम कल्याणासच होता. जून इ. स. १९१३ पासून मंडळी

नागपूरास खेळ करू लागली. नागपूरकरांकडून रा. राणे यांनीं चांगला मान मिळविला. पण दैवाची गति कांहीं विचित्र आहे हें ठरलेंच आहे. ता. २२ नोव्हेंबर इ. स. १९१३ शनिवार रात्रौ "संत तुकाराम" नाटकाच्या पहिल्या अंकांतील शेवटच्या प्रवेशांत शिवाजी राजाकडून आलेल्या नजराण्याचें रा. राणे हे जिजाईची भूमिका घेऊन वर्णन करीत असतां अकस्मात काळाची झडप त्यांच्यावर पडून दहा मिनिटांचे आंत त्यांचें देहावसान झालें !

राणे हे सर्व नाटकमंडळ्यांना एके रीतीनें आदर्शवत होऊन राहिले होते ह्मटलें तरी चालेल. त्यांना समजावयास लागल्यापासून आपल्या मंडळीची इभ्रत त्यांनीं पुष्कळ वाढविली. त्यांच्या नाटकांत उत्तम प्रकारचें गायन वगैरे जरी प्रकार नव्हते तरी त्यांनीं आपले पौराणिक व भक्तिरसपूर्ण नाटकप्रयोग इतर उपायांनीं फारच लोकप्रिय व चित्ताकर्षक असे करून ठेवले आहेत. सीनसीनरी, पोषाख, विजेची रोषनाई वगैरे उपायांनीं आपल्या नाट्यप्रयोगांना त्यांनीं रमणीयता आणली होती. स्वतः राणे हे जी जी भूमिका घेत तींतील अभिनय ते पूर्णपणें व मार्मिकपणें करीत असत. ज्या प्रयोगाचे रात्रीं त्यांचें देहावसान झाले त्या रात्रीं स्वतः पार्ट घेण्याचा त्यांचा मानस नव्हता, परंतु थिएटर भरलेलें असून आपण आपलें काम केलें नाहीं तर लोक थोडक्याकरितां नाखूष होतील हें मनांत आणून त्यांनीं ऐन वेळेवर दुसरा नट तयार असतां आपणच तें काम केलें. या नाटकांत त्यांच्याकडे जी भूमिका असे ती ते फार चांगली करीत असत. त्यांची आपल्या हाताखालील सर्व मंडळीशीं वागणूक व मंडळी चालविण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी होती. राणे

हे हयात असतां मधून मधून आपल्या संस्थेतील मंडळीशीं असें ह्मणत असत कीं, माझा मुलगा थोडें बहूत इंग्लिश शिकून हुशार झाला कीं,त्यास कंपनींतच ठेवून, या नाटक धंद्यांतील एकंदर व्यवहाराची पूर्ण माहिती त्यास करून देईन, व त्याच्या हातीं चालू धंद्याचीं सूत्रें देउन, मी विश्रांति घेत हरी हरी ह्मणत स्वस्थ बसेन. त्यांच्यासारखा करारी, कर्तव्यदक्ष, धाडशी, निस्पृह आणि निर्व्यसनी असा पूरुष ह्या संस्थेचा जनक असल्यामुळें आजपर्यंत त्यांच्या संस्थेचा व्यवहार फारच सुरेख चालला होता.

नाटकाचा धंदा प्रतिष्ठितपणानें चालवावा ही गोष्ट बाबाजीराव यांच्या मनांत अलीकडे पांच सहा वर्षांत अधिक बिंबली होती. तेव्हांपासून त्यांनीं आपल्या मंडळीची अंतर्बाह्य व्यवस्थाही चांगली ठेवली होती. कांहीं वर्षांपूर्वी मुंबईस नाटकाचे मक्ते घेऊन त्यावर व्यापार करणाऱ्या मंडळ्या असत. त्या कोणा तरी नाटक मंडळ्यास हाताशीं घेऊन त्यांच्यावर व्यापार करीत. नाटक पाहणारा प्रेक्षक व कंत्राटदार यामध्यें सस्त्याच्या भावानें ह्मणजे १ रुपयाला पांच सहा जशीं देतां येतील तशी तिकीट विक्री चालावयाची. अशा तऱ्हेनें जमलेला प्रेक्षक समाज बहुतेक गिरणींतले मजूर, भंडारी, कोळी यांपैकीं जमत असे. व त्यांना खूष करण्याकरितां हीं वीरसेनमंजिरी भूपसेनसुंदरी सारखीं नाटकें नाटकमंडळ्यास करावीं लागत असत. परंतु बाबाजीरावांनीं आपण होऊन ती चाल बंद केली. ( आतां ती बहुतेक मोडत मोडत आली आहे. ) व वर सांगितलेली नाटकांची दिशाही बदलली, तेव्हांपासून त्यांचें दळणवळण चांगल्या लोकांत वाढत गेलें, व त्याचा त्यांनीं फायदाही करून घेतला.

राणे यांनीं सहकुटुंब राहण्याकरितां यवतमाळ येथें एक मोठें घर व चाळही बांधली आहे. व आपले नांवचें एक मोठें धान्याचें दुकान आपल्या राहत्या घराच्या दर्शनीं भागामध्यें प्रशस्त जागेंत घातलें आहे. सारांश अशा रीतीनें राणे यांनीं लौकीक आणि पैसा योग्य मार्गानें मिळवून त्याची जोपासनाही चांगले प्रकारें केली आहे. पुढें आपल्या वंशांतील मुलांमाणसांस कोणत्याही गोष्टीची दधात न ठेवितां सर्वकाळ सुखानें संसार करून राहतां येईल अशी तयारी करून त्यांनीं आपली आयुष्ययात्रा संपविली आहे. त्यांच्यामागें त्यांच्या संस्थेचें काम त्यांच्या मंडळींतील प्रमुख लोकांनीं अव्याहत चालविण्याचें ठरवून बाबाजीराव वारल्यानतर मंडळीची मालकी त्यांचे चिरंजीव रा. महादेव बाबाजी राजवर सोंपवून पुन्हां मंडळी ६।१२।१३ पासून सुरू झाली आहे. *

* बाबाजीराव यांच्या चरित्राची माहिती त्यांच्या मंडळींतील प्रमुख व ने नट रा. पुरुषोत्तम वामन शुक्ल यांनीं पाठविली याबद्दल त्यांचे आभारी आहों. [ रंगभूमि ]



बळवंतराव डाके.        रावजी पवार.



पौराणिक नाटकाच्या वेळची रावणाची भूमिका.

# पौराणिक नाटकांतील स्त्रिया.



१. ताई तासगांवकर १८८३ पूर्वी.
तासगांवकर मंडळींतील नटी.



२. म्हाळसा. १८७८ पूर्वी.
परशरामपंत साठे यांच्या नाटकांतील,

नाटकांतून स्त्रियांचीं कामें स्त्रियांकडून करविण्याचा परिपाट- परशुरामपंत साठे यांच्या नाटकाचे मूळ उत्पादक अण्णा इनामदार ह्मणून कोणी होते त्यांनीं सुमारें चाळीस वर्षांपूर्वी पाडला. तेव्हांपासून पुणेंकर नाटकमंडळींतील स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांच करीत असत. मंडळी बंद होईपर्यंत यांत स्त्रियांच कामें करीत असत.

१ तासगांवकर नाटकमंडळी ह्मणून एक पौराणिक नाटकमंडळी असे. ही १८८३ सालीं मोडली. तिच्यांत ताई नांवाची स्त्री नायिकेचें काम करीत असे. ही त्यावेळस बरीच प्रसिद्ध असे. पुढें नाटकाचा धंदा सोडून ही एका डॉक्टराच्या मदतीनें मिडवाईफचा धंदा शिकण्याकरितां कोल्हापुरास असे. तेथेंच ही सुमारें १८९७ च्या सुमारास वारली.

२ ह्माळसा ही "विबुधजन चित्तचातक" पुणेंकर मंडळींतील मुख्य नायिका असे. ही फार देखणी व तरुण असून तिच्यावेळीं ती प्रसिद्ध असे. किचकवधांतल्या सैरंध्रीची, बाणासुर आख्यानांतल्या उषेची वगैरे इच्या भूमिका फार चांगल्या होत असत.

३ बिटा कासारीण ही वरील मंडळींतील शेवटच्या पिढींतली नायिका होती रमा, तारा वगैरे नाकांतल्या इच्या नायिकेच्या भूमिका फारच चांगल्या होत असत. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांना जितक्या निर्भिडपणाने करावयास हव्यात तितक्या होत नाहींत, असा अनुभव आहे; परंतु इच्या भूमिका अभिनय व तिच्यांतील स्वारस्य समजून होत असत. वरील नाटकें इच्यामुळेंच लोकप्रिय झालीं ह्मटलें तरी चालेल. ही सुमारें इ० स० १८९८ मध्यें वारली आसावी.



# महाराष्ट्रीय नट.

[ वर्ष ५ अंक १२ वरून पु चा. ]

जुन्या पिढींतल्या महाराष्ट्रीय नटासंबंधानें आणखी जी माहिती आह्मांस आमच्या एका मित्राकडून मिळाली आहे. ती आह्मी पुढें देत आहों.

**रा. रा. रंगभूमिकर्ते यांसः**—सा. न. वि. वि.

आपल्या रंगभूमि मासिकाचें वर्ष ५ अंक ९ ह्यांत " महाराष्ट्रीय नट " ह्या सदरा खालीं परशुरामपंत साठे, रावजी पवार व म्हाळसा वगैरे संबंधानें कांहीं माहिती आली आहे. ह्या पात्रांचीं कामें प्रत्यक्ष पाहिलेली व याचें संबंधानें बरीच माहिती असलेलीं दहापांच माणसें अद्याप हयात आहेत. त्यांचेकडून कदाचित् कांहीं जास्त माहिती आपणास कळविली जाईल असें वाटत होतें, परंतु आज १० महिन्यांत तसें झालें नाहीं, ह्मणून मला ह्या तीन वयांच्याच जोडीच्या आणखी दोन तीन जुन्या पौराणिक नटाविषयीं जी माहिती आहे ती मी कळवीत आहे.

**म्हाळसा**—ही तरुण बांधेसूद व बरीच सुरेख बायको असून शृंगाररसाचे काम चांगलें पण मर्यादशील असें करीत असे. फक्त शृंगाररस प्रधान नाटकांत नायिकेचें काम इजकडे असे. करुणरसाचें काम व फार्सांतील चौचाल कामें हिला साधत नसत. इच्याच जोडीची निरा ह्मणून एक स्त्री होती ती करुणरस प्रधान नाटकांत नेहमीं नायिकेचें काम करी.

**निरा**—ही तरुण पण किडकिडीत व रुपानें अगदीच सामान्य अशी स्त्री होती पण द्रौपदी, सीता, सुलोचना व तारामती हीं कामें ती पुष्कळच चांगलीं करी. दोघीही गणिका तर खऱ्याच पण त्यांच्या रंगभूमिवरील अभिनयांत फाजीलपणा बिलकुल होत नसे. व खासगी रीतीनेंही कोणा सभ्य मनुष्यास त्यांच्याशीं बोलण्याचा प्रसंग आला तर त्याला वाईट वाटण्यासारखें

त्यांचें वर्तन नसे. निरा तर उपास तापास व नेमधर्म करणारी भाविक स्त्री होती. आपण दिलेला ह्याळसा ईचा फोटो बरोबर नाहीसें वाटतें.

**रावजी पवार**—पूर्वी नटांना धोंड्या सांगलीकर, विष्या कोल्हापुरकर असें ह्मणण्याचापाठ असे, पण तो आतां नाहींसा होऊन त्यांनाही धोंडोपंत विनायकराव, भाऊराव, असें बहुमानपूर्वक संबोधण्याचा प्रघात पडला आहे व आपणही तोच क्रम चालू ठेविला असून रावजी पवार याना आपण अगदीं एकेरी संबोधिलं आहे. ही नजरचूक असावीसें वाटतें. असो. रावजी पवार हे वयानें प्रौढ होते. आपण ज्या परशुरामपंत साठ्याविषयीं बरेंच गौरवयुक्त लिहिलें आहे. तेही ह्यांना फार मान देत असत रावजी पवार हे पुणेकर मडळींत एक प्रस्थच असत. हे गृहस्थ शरीरानें उंच, सडसडीत, चेहरा उभटा, व नाक तरतरीत असें असल्यामुळें, यांचें सोंग धिप्पाड व राक्षसाच्या भूमिकेला फारच अनुरूप असें दिसत असे. यांचें भाषण एक तास पर्यंत अस्खलित, शुद्ध, स्पष्ट व रसभरित असे होत असून तिसरा राक्षसाच्या भूमिकेचा त्यावेळचा मुख्य गुण ह्मणजे राक्षसपार्टीची तडफ हा होय. तडफ ह्मणजे काय हें लिहून दाखविणें कठीण आहे. ती प्रत्यक्षच ज्यांनीं पाहिली असेल त्यांनाच तिची कल्पना होईल. काळेतांबडे शेंदरी पट्टे चेहऱ्यावर ओढून झिंज्या, मिशा व तोंडाबाहेर दोन दांत लावून बेगडी किरीट कुंडलें, भुजा, तकट व भिंड माळा परिधान करून कंबरेभोंवती लुगड्याची झालर व कंबरपट्टा गुंडाळून पायांत चाळ बांधून व हातांत तलवार घेऊन सज्ज झालेलें अतिकाय भेसूर राक्षसाचें सोंग राळेच्या ज्वालाच्या आडून आक्राळ विक्राळ तोंड करीत व कर्कश आरोळ्या ठोकीत "ताकडधोंम थैथाच" इत्यादि तालावर नाचत रंगभूमीवर प्रवेश करणें, रणांगणावर शत्रुशीं बोलतांना, आपल्याच दरबारांत स्वतःच्या प्रधानाशीं बोलतांना फार तर काय रंगमहालांत भार्येशीं प्रेमाचें संभाषण चाललें असतांनाहीं मोठ्यानें ओरडून बोलणें, द्वेशाचें, आवेषाचें, आनंदाचें कसलेंही भाषण करतांना मधून मधून उसळ्या मारणें, युद्धप्रसंगीं अनेक विध

तालांवर मोठ्या आवेशानें व अतिशय चपलपणानें नाचून रंगभूमीवर थथयाट करून सोडणें, मरतां मरतां देखील स्वत:भोंवतीं शेंकडो गिरक्या घेणें घायाळ होऊन रणभूमीवर पडूनही शत्रूच्या अंगावर चालून जाण्याविषयी धडधड करीत आहेसें दाखविणें, ह्या सर्व गोष्टी राक्षस पार्टाच्या तडफेंत मोडत असत. रावबा पवार हे अतिशय चलाख असल्यामुळें यांची तडफ अप्रतिम होत असे. यांची भीष्माची व कीचकाची भूमिका पाहण्यास आनंदोद्भव नाटकगृह गच्च भरून जात असे. हे आपण लिहिलें आहेच त्याशिवाय भोमासूर, बाणासूर, जयद्रथ, व इंद्रजीत हीं कामेंही हे फार चांगलीं करीत असत. कधीं कधीं सुमेरशिंगाची भूमिकाही हे घेत असत, पण ती त्यांना चांगलीशीं साधत नसे. भाट व सुमेरसिंग हीं कामें कै० गोपाळराव दाते यांचीच हातखंडा असत. फार्सांत सातारचे महाराज व वेदरचे बादशहा हीं कामें रावजी पवार फार चांगलीं करीत असत. अलीकडील पौराणिक नट ह्मणून प्रसिद्ध असलेले रा० शंकरराव लोखंडे हे आपणास मोठ्या अभिमानपूर्वक गोपाळराव दाते व रावबा पवार यांचे शिष्य ह्मणवितात लोखंडे यांचे दामाजीच्या फार्सांतील बेदरच्या बादशहाचें काम चांगलें होतें.

पौराणिक नाटकांचे वेळीं स्त्रीपार्ट पाहवा सांगलीकरांचा व राक्षसपार्ट पाहावा. पुणेंकराचा अशी ह्मणच पडली होती. स्त्रियांच्या भूमिकेविषयीं कोल्हापुरकर मंडळींतील विनायकराव कवठेकर, इचलकरंजीकर मंडळींतील विष्णु वाटवे, कांहींअंशी शाहुनगरवासींतील बळवंतराव जोग हींच नांवें प्रसिद्ध आहेत. तरी सांगलीकर मंडळींतील रामभाऊ उकिडवे त्यांचे मागून त्यांचेच बंधू ( नांव माहित नाहीं. ) नंतर बापू काळे, भास्करराव दाते व शेवटीं शंकरराव मुजुमदार ही सर्व परंपराच चांगली कामें करून गेली ? ह्या सर्व गोष्टीचे श्रेय धोंडोपंत सांगलीकर ह्यांचे शिक्षणासच आहे. श्रीपादपंत सांगलीकर यांचे मंडळींतील नाना सोमण पुढें हरिदास होऊन प्रसिद्धीस आले होते. हे चार वर्षांपूर्वी वारले. यांचेही स्त्रियाच्या भूमिकेचे काम भार

दस्त व वाखाणण्यासारखे होत असे. विशेषतः दाक्षायणी, तारामती सुलो- चना कुंडला व द्रौपती हीं कामें अप्रतिम होत असत नाना सोमण हे नेहमीं स्त्रियांची मुख्य भूमिका करीत असून कर्णपर्वांत शल्याचे काम करणारा त्याचे इतका चांगला कोणीच झाला नाहीं. असो. स्त्रीपार्टाविषयीं जसा सांगलीकर मंडळीचा लौकिक होता तसाच नाचकामाविषयींही होता. व नाचकाम शिकविणारे उत्तम गुरुही धोंडोपंत सांगलीकर हेच होत. त्यावेळीं प्रत्येक खेळांत देव किंवा दानव यांचे कचेरींत आनंद प्रसंगाच्या निमित्तानें रंभेचा ह्मणून नाच होत असे, बहुतकरून नाचणारें पात्र एक, किंवा दोनच असत. त्यांनीं नायकिणीप्रमाणें पेज वाज घालून प्रथम थोडेंसे नुसतेंच नृत्य करावयाचें व नंतर एक किंवा दोन ठुंबऱ्या गाऊन नाचावयाचें हा प्रकार अर्धा किंवा पाऊण तासच होत असे त्यावेळीं गाणा- राच्या साथीला तबला किंवा पेटी तर मुळींच ठाऊक नव्हती. सूत्रधाराचा विणा व पखवाज व अलगुज वाजविणारा एक वाजंत्री एवढ्या सामुग्रीनें त्या वेळीं नाच इतका चित्ताकर्षक वाटत असें कीं कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरोपंत नाना छत्रे, व बाबा गोखले असली विद्वान माणसें नाच पाहण्यापुरती तरी खेळाला येत. इसवी सन १८६७ सालीं पुण्यांतील सांगलीकराचे वाड्यांतील मंडपांत [ त्यावेळीं कोणचेंच नाटकगृह झाले नव्हतें ] स्वतः धोंडोपंतांनीं बृहन्नडेची भूमिका घेऊन उत्तरेसह (उत्तरा गोपाळ तेरदाळकर) सुदेष्णेपुढें केलेला केरवा नाच अद्याप स्मरणांतून जात नाहीं. धोंडोपंतांनीं तयार केलेले उत्तम नर्तक तेरदाळकर, चंन्या कासार, विनायक नाशिककर, व शेवटीं परशुरामबोवा बरवे हे होत.

ऋषी पार्टाविषयीं गोविंदभट खोत व यज्ञेश्वर ह्यांच नांवें प्रसिद्ध आहेत. देवांची भूमिका करणारे बऱ्याच मंडळ्यांतून एक एक तरी चांगले इसम होते. त्यांत श्रीपादपंत लेले यांचा पाशुपतास्त्र प्राप्तींतील अर्जून व कर्णपर्वांतील कर्ण ह्या भूमिकाविषयीं विशेष लौकिक आहे व तो अगदीं योग्य आहे.

विनायकराव दाणी, नरसिंगभट हरिपूरकर, व बाबूराव कोल्हापूरकर ह्यांची राक्षसांची कामें चांगलीं होत, परंतु दिसण्यांत भाषणांत व तडफेंत सर्वपरी पुणेकर रावबा पोवार यांची बरोबरी करणारा कोणीही राक्षसपार्टी झाला नाहीं एवढें खास. नाटकी व इतरही कविता करणारे यजुर्वेदीय ज्ञातींतील ज्योतिष व याज्ञिक कर्मांत प्रसिद्ध असलेले बळवंतराव उर्फ बाबा शहरकर यांचा सहवास रावजी पोवार यांस असल्यामुळें यांचे अंगीं बहुश्रुत-पणा पुष्कळ आला होता. यांना बालबोध व मोडी चांगलें लिहितां वाचतां येत होते. अफूचें दुकान वगैरे धंदा संभाळून चित्तचक्षु चमत्कृति निधान, समयरंग रसोद्भव, विबुधजनचित्तचातक स्वातिवर्ष,इत्यादि अनेकविध नांवानी वरचेवर उदय अस्त पावणाऱ्या स्थाईक पुणेकर मंडळ्यांतून हे पगार घेऊन सोंग घेत असतां इ० सन १८९५ चे सुमारास दाढेला कांहीं विकार होऊन वयाचे ६५ व्या वर्षी पुण्यासच वारले.

## बळवंतराव डाके

रावजी पोवार यांचे नांव निघाल्यावर बळवंतराव डाके हें नांव त्याच्या जोडीला निघावयाचेंच हे गृहस्थही रावजी पोवार यांचे खालोखाल राक्षस-पार्ट चांगला करीत असत. रावण, भीम, कुंभकप्रधान ही कामें नेहमी यांचेकडे असत. ऋषीपार्टही हे चांगला करीत असत. राक्षसपार्टासंबंधीं यांचा विशेष गूण ह्मणजे यांचा आवाज फार मोठा व खणखणीत असे. हल्लीं नूतन मराठी विद्यालयाची प्लेग्राऊंड आहे त्याजागी नाटकगृह होतें त्याचे आलीकडील नांव पूर्णानंद नाटकगृह होतें. पण प्रथमारंभी फार दिवस तें अप्पाबळवंत यांचे नाटकगृह या नांवानेच प्रसिद्ध होते. त्या ठिकाणीं खेळ सुरु असतां रात्रीं १२ वाजतां नाटक पहावयास येणाऱ्या प्रेक्षकास मोरोबा दादा फडणीस यांचे वाड्यासमोर येताच यांचा अवाज ओळखू येई व डाके आला रे आला!असे उद्गार तेथेंच निघत.बळवंतराव डाके ह्मणजे रावबा पोवाराचा डावा हात असेच लोक ह्मणत असत! रावजी पोवार जसे अफूचे

दुकान वगैरे दिवसा धंदा करून फक्त रात्रींच नाटकाचा व्यवसाय बहुतकरून पगार घेऊनच करीत असत त्याचप्रमाणें डाके हे दिवसा रविवार पेठेंत एका स्वतंत्र दुकानीं बसून व्यापारी दुकानदार व इतर लोकांची पत्रें लिहून देऊन ती रवाना करीत असत. त्यावेळीं कार्डा व पाकिटें निघालीं नव्हती व पोस्ट ऑफिसही शहरांत नव्हते त्यामुळें ह्यांचा हा व्यवसाय उत्तम चालला होता. व त्यावरूनच त्यांचे नांव डाके हें पडले. ह्यांचे नांव बळवंत विष्णू शिरोळकर असें आहे हे यजुर्वेदी ब्राह्मण होत ह्यांचे मोडीअक्षर उत्तम असून जमाखर्चाची वगैरे माहिती ह्याना चांगली होती कार्ड व पाकिटे निघून शहरांत पोस्ट आफिस आल्यावर यांचा पत्रें लिहिण्याचा धंदा नीट चालेनासा झाला तरी ते मंडईतील दांडीवाले वगैरेची लिहिणीं लिहूनच निर्वाह करीत असत. शुक्रवार पेठेंत गाडीखान्यांत त्यांचे सत्तेचे घर आहे व त्याना एक दत्तक पुत्र आहे. बळवंतराव डाके हे पुण्यासच शके १८१८ साली वारले मरणसमयीं ह्यांचे वय ५५ वर्षांचे होतें

## गणपतराव देवधर

परशुरामपंत साठे यांचेविषयीं आपल्या लेखांत थोडासा मजकूर आला आहेच. रावजी पोवार यांचे जोडीला जसें बळवंतराव डाके नांव यायचेंच. तसें परशुरामपंत साठे यांचेपूर्वी गणपतराव देवधर हें नांव प्रथम येत असे. साठे हे अगदीं लहान वयापासूनच कांहीं विद्याभ्यास वगैरे न होताच नाटक धंद्यांत पडले होते सरस्वतीचें काम, बालपार्ट व स्त्री पार्ट करून नंतर ते देव पार्ट करूं लागले. त्यांचें सोंग चांगलें दिसत असें काम दुसऱ्या नंबरचेंच करीत असत मुख्य देवपार्ट नेहमीं गणपतराव देवधर यांचेकडेच असे, साठे व देवधर ह्यांनीं इतर व्यवसाय कोणचाच केला नाहीं. सर्व जन्म नाटक-धंद्यांतच घालविला. गणपतराव देवधर यांचें अक्षर चांगलें असून हे चांगले कारकून होते. मध्यें थोडेच दिवस ह्यांनीं म्युनिसिपालटींत नोकरी केली होती ह्यांचें मूळ घराणें भिक्षुकीचें होतें. कै० रा० ब० बाळाजी गंगाधर साठे

ह्यांचे हे उपाध्याय होत. सदाशिव पेठेंत नगरकर यांचे वाड्यासमोर हल्लीं मांडे यांचें घर ह्मणून आहे तें घर मूळ देवधरांचे होते. असो नट ह्या दृष्टीनें गणपतराव देवधर यांची गणना उत्तम नटांत करावी लागेल हे पौराणिक खेळांत देवपार्ट व ऐतिहासिक व इतर हास्यकारक फार्सांत नेहमीं मुख्य पुरुष पार्टाचें काम करीत असत.

राम, युधिष्ठिर, नलराज हरिश्चंद्र, श्रियाळ थोरले माधवरावसाहेब पेशवे व दामाजीपंत अशा धीरोदात्त पुरुषांच्या भूमिका चांगल्याप्रकारें करणारा इसम आनर्शाचा फार्स दिल्लीचा चोर, व पुण्याचा सोदा, गुलाबछकडी, व मार्तंड नाईक अशा हास्यकारक किंबहूनः पाचकळ फार्सांतलि छाकट्या, सोद्या किंवा पागल मनुष्याच्या भूमिकाही तशाच चांगल्या करीत असें हे आश्चर्यजनकच होय. समयसूचकता स्वयस्फूर्तीनें कामें करणें ह्या गुणास पौराणिक नाटकांचे वेळींच अवसर होता व हे दोन गूण गणपतराव देवधर यांचे अंगीं ओतप्रोत भरलेले होते. कित्येक वेळां जोडीला चांगले पात्र असल्यावर एखाद्या कथानकाची मुळींच तालीम न होता रंगभूमीवर तो भाग उत्तम वठल्याची उदाहरणें अनेक घडलीं आहेत. दुसऱ्या पात्राला संभाळून घेणें इतकेंच नव्हे तर कारणपरत्वें आपण थोडेसें आखडतें घेऊन दुसऱ्या पात्राच्या गुण विकासास अवसर देणें व दुसऱ्याचे अंगचा गूण तत्काळ ओळखून लागलचि त्याचे चीज करणें हे गूणच नव्हत तर सद्‌गूण एकट्या गणपतराव देवधराचे अंगीच दृष्टीस पडत. दुसऱ्या पात्राला संभाळून व त्याचे कामाला जुळून काम करणें ह्याला चांगली साथ करणें ह्मणत असत पुणेकर मंडळीत प्रसिद्ध असलेले गोपाळराव दाते रावबा पोवार बळवंतराव डाके परशरामपंत साठे ही मंडळी साथीला चांगली नव्हती रावबा पोवार कीचकाचें किंवा इंद्रजिताचें भाषण सारखे करीत सुटले ह्मणजे सैरंध्री किंवा सुलोचना ह्याना अयोग्यवेळीं स्तब्ध बसावे लागे व त्यामुळें बेरंग होई. गणपतरावाइतका साथीला योग्य मनुष्य सापडणे कठीण गणपतरावाचे अंगी एकच अवगूण होता तो त्यांचा अवाज

अगदीं बसका व वाईट झालेला होता दिसण्यांत हे गृहस्थ ठेंगणे पण सडसडीत गोरेपान तरतरीत सरळ नाकाचे व तेजस्वी असे असत कोणचेंही सोंग ह्याना चांगले शोभे. एक अवाज चांगला नसल्यामुळें शृंगार व वीररसाचे कामीं श्रीपादपंत लेले सांगलीकर व करुणरसाचें कामांत त्यांचेच मंडळींतलि यज्ञेश्वर हे गणपतराव देवधर यांचेपेक्षां पुष्कळ सरस काम करणारे असे ह्मणणें भाग आहे. गणपतराव देवधर हे दहा पांच वर्षांनीं उशीरा ह्मणजे शेक्सपीयरचीं नाटकें करण्याचा प्रचार पडल्यावर रंगभूमीवर आले असते तर व त्यांचा आवाज चांगला असतां तर समयसूचकता बहुश्रुतपणा व परगुणग्राहकता ह्याच गुणाचे जोरावर, हल्लीं महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेल्या गणपतराव जोशी यांचा उत्तम नट हा मान कदाचित गणपतराव देवधरच मिळवून बसते. असो गणपतराव देवधर यांस संतती नाहीं ते आपल्या वयाच्या (अदमासे) ५५ वें वर्षीं सुमारें २० वर्षांपूर्वीं पुण्यासच वारलें.

काशिनाथ वासुदेव परचुरे.



मृत्यु ता० ८ आक्टोबर १९१४

( किर्लोस्कर प्रेस, पुणें. )

# काशिनाथ वासुदेव परचुरे.

किर्लोस्कर संगीत मंडळीच्या इतिहासांत जीं महत्वाचीं पात्रें होऊन गेलीं व मंडळीचें नांव कायम राखण्यास जीं माणसें कारणीभूत झालीं त्यांत, काशिनाथपंत ज्यास मंडळीं नुसत्या " पंत " या नांवानें संबोधीत असत त्यांचें नांव प्रमुखपणानें येईल. त्यांनीं मंडळींची इज्जत व इभ्रत आणी-बाणीच्या वेळीं फार चांगल्या रीतीनें राखली आहे.

हे किर्लोस्कर संगीत मंडळींतील गद्य भूमिका करणारे प्रसिद्ध नट होऊन गेले. सुमारें ३२ वर्षे हे किर्लोस्कर संगीत मंडळींत होते. संगीत शाकुंतल, सौभद्र, मृच्छकटिक या नाटकांतील मैत्रेयाच्या भूमिका त्यांच्या इतका उत्तम करणारा नट आजपर्यंत झाला नाहीं. पूर्वी या भूमिका गोपाळराव दाते किर्लोस्कर मंडळींत असतांना करीत असत. त्यांची विनोदी नट ह्मणून प्रसिद्धी होती, त्या जागीं परचुरे काम करू लागल्यानें, त्या वेळीं त्यांच्या भूमिका इतक्या लोकप्रिय होतील ही लोकांची कल्पना नव्हती; परंतु ते लौकरच उत्त-मांतले नट ह्मणून प्रसिद्ध झाले. संस्कृत नाटकांतून राजाचा व नायकपात्राचा नेहेमीं मित्र असणारा हा " मैत्रेय " वृद्ध ब्राह्मण असावयाचा अशी वहिवाट आहे; व हें वृद्धपण तरुण मनुष्याच्या वांटणीस येत असतें. इतर भूमिका त्या त्या मनुष्यास अनुरूप पाहून देण्यांत येतात, ह्मणजे नायक होणारा तरुण असेल तरच त्याच्याकडे ती भूमिका देण्यांत येते.तशीच केवळ गोष्ट मैत्रेयाची भूमिका करणारासंबंधानें असूं शकत नाहीं. अगदीं तरुण मनुष्यासही ह्माता-ऱ्याच्या भूमिका कराव्या लागतात; परचुरे हे ज्या वेळीं मैत्रेयाच्या भूमिका करूं लागले त्या वेळीं त्यांचें वय सुमारें २७ वर्षांचें होतें. परंतु ते ज्यावेळीं शाकुंतल व सौभद्र नाटकांत मैत्रेय होऊन येत त्या वेळीं हे खरोखरीच साठी उलटून गेलेले दंतविहीन वृद्ध ब्राह्मण आहेत असें प्रेक्षकांस वाटत असे. संगीत नाटकांत गाणाऱ्या पात्रांनीं जितकी रंगभूमीवर बहादुरी मिळविली आहे तितकीच यांच्या मैत्रेयाच्या भूमिकांनीं मिळविली आहे. वर्तमान पत्रां-

तून संगीत नटांची ज्या वेळीं वाखाणणी होत असे त्यावेळीं परचुरे यांच्याही भूमिकेची झाल्या शिवाय रहात नव्हती. यांनीं केलेल्या भूमिका.

| | | |
|---|---|---|
| शाकुंतल | ... ... | मैत्रेय |
| सौभद्र | ... ... | मैत्रेय |
| रामराज्यवियोग | ... ... | सुमंत |
| विक्रमोर्वशीय | ... ... | मैत्रेय |
| मृच्छकटीक | ... ... | मैत्रेय |
| शारदा | ... ... | भद्रेश्वर दीक्षित |
| मूकनायक | ... ... | विकंठ |
| गुप्तमंजुष | ... ... | कैलासनाथ |
| चंद्रहास | ... ... | अविवेक |

या त्यांच्या भूमिका फार उठावदार होत असत. मानापमान, प्रेमशोधन, शापसंभ्रम इत्यादि नाटकांत त्यांच्याकडे ज्या भूमिका असत त्या जरी महत्वाच्या नसत तरी परचुरे त्या चांगल्या करीत होते. विशेषता त्यांच्या मैत्रेयाच्या भूमिकांबद्दल प्रेक्षकांचा आदर असे. वृद्धपणास साजेल असी त्यांच्या बोलण्याची ठेवण इतकी स्वाभाविक असे कीं, तें बोलणें ऐकतांना हें वृद्धपणाचें नाहीं असें कोणास ह्मणतां येत नसे. एखादें वेळीं युरोपियन पाहुणे नाटक पहाण्यास आलें असतां ते यांच्या भूमिका पाहून चाकित होत असत. शारदा नाटकांतील भद्रेश्वर दीक्षिताच्या भूमिकेचें अनुकरण इतर नाटकमंडळ्यांतील नट करीत आहेत. त्यांच्यांत नियमितपणा, साधेपणा, काटकसरीनें वागणें इत्यादि सद्गुणही नटवर्गानें अनुकरण करण्यासारखे होते. एकंदर ३२ वर्षांत त्यांच्या वागणुकीचा क्रम एकही दिवस चुकला नाहीं. जोडीच्या पात्रास संभाळून घेणें, किंवा त्याचें व्यंग असेल तेथें तें झांकून घेण्याचा प्रयत्न करणें ही हातोटी त्यांच्यांत विशेष होती.

नाट्यगुणाखेरीज अलीकडच्या नटामध्यें दुर्मिळ असा, एका संस्थेला

चिकटून राहणें हा एक गुण होता. हे घरचे सधन होते असें नाहीं. इतर प्रापंचिकाप्रमाणें यांची स्थिति होती; परंतु मंडळीवर ज्याज्या वेळीं अडचणी आल्या, त्यात्या वेळीं त्या सोसून हे रिकामे घरीं बसून राहिले होते. "किर्लोस्कर संगीत मंडळीची गादी आहे तोंपर्यंत तिची सेवा करावयाची, नाहीं तर घरीं बसावयाचें," हा त्यांचा संकल्प असे; व त्या संकल्पाप्रमाणें त्यांनीं आपला शेवट किर्लोस्कर मंडळींत केला. शनिवार तारीख ३ आक्टोबर १९१४ च्या खेळास रात्रीं, नेहमींप्रमाणें रंगभुमिवर त्यांनीं काम केलें होतें, रविवारीं रात्रीं १०॥ वाजेपर्यंत मंडळींत गप्पागोष्टी करीत होते. उपरांत त्यांची लघवी कोंडून ते अस्वस्थ झाले. मिरजेसारख्या ठिकाणीं असाध्य रोगाचे रोगी हजारों बरे होऊन जातात, परंतु भागिरथ उपाय करून त्यांचें देहावसान याच ठिकाणीं व्हावयाचा नियमानियम होता ! किर्लोस्कर मंडळींत या गृहस्थाची किंमत सर्वांत जुने नट ह्मणून, वृद्ध ह्मणून, मंडळीचे अभिमानी ह्मणून प्रत्येक मनुष्यास अधिक वाटत असे, तसेंच लोकासही वाटत असे. अलीकडच्या नाटक मंडळ्यांत एका ठिकाणीं राहिलेला असा दुसरा मनुष्य क्वचितच सांपडेल. जुन्या मनुष्याची किंमत ज्या नाटक मंडळ्यांत, अशी त्यांना चिकटून राहिलेली मंडळी असेल, त्यांना अधिक कळून येणारी आहे. मिसर देशांतले मनोरे हे जसे जुनेपणाच्या दृष्टीनें त्या देशाचें भूषण ह्मणून दाखविले जातात, तसेच जुन्या संस्थेंत असणारे जुने लोक त्या संस्थेचें भूषण समजले जातात. अलीकडच्या मनूंतले भृगवृत्ती किंवा, Birds of passage ( शाळूसोबती ) प्रमाणें प्रत्येक वाराला नवें थिएटर पाहणाऱ्या नटाला अशा एका संस्थेला वाहिलेल्या नटांचा कमीपणा वाटतों, परंतु किर्लोस्कर मंडळीला ओळखणाऱ्या व तिच्याविषयीं अभिमान व सहानुभूति बाळगणाऱ्या महाराष्ट्राला मंडळीबद्दल आदर असण्याला तिच्यांतील हा जुनेपणा पुष्कळ कारण आहे. मंडळींत घडून आलेल्या फुटीच्या वेळीं परचुरे

यांचेसारखी मंडळी किर्लोस्कर मंडळीला चिकटून राहिली ह्मणून कारस्थानी व फूट पाडणाऱ्या लोकांची फार निराशा झाली. लढतां लढतां पडणाऱ्या शिपायाप्रमाणें परचुरे यांनीं तनमन किर्लोस्कर मंडळीकरितां ३२ वर्षे खपवून आपली जीवितयात्रा लोकांचें बरें ह्मणून घेऊन संपविली आहे! त्यांचा स्वभाव फार विवेकी असे. मरणसमयीं त्यांचें वय सुमारें ५८ वर्षांचें होतें. यांना थोरले बंधु, कुटुंब व दोन मुलगे असून थोरले रेल्वे खात्यांत आहेत; व धाकटे किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापक वर्गांत आहेत. हे वाईचे राहणारे, कै. मोरोबा वाघुलीकर यांचेसंबंधानें १८८२ सालीं प्रथम मंडळींत आले त्यावेळीं पुण्यांत खानेसुमारीचें हंगामी काम चाललें होतें त्यांत हे कारकुनी करीत होते; त्यावेळीं किर्लोस्कर मंडळीही हंगामी होती. पुढें तिला १८८४ सालीं कायमचें स्वरूप मिळालें, त्यावेळीं हे तिचे घटक बनले ते शेवटपर्यंत राहिले.

नाटक मंडळ्या टिकाऊ होण्याला किर्लोस्कर मंडळींतल्या नटांचें उदाहरण उपयोगी पडण्यासारखें आहे. एकाच ठिकाणीं नट राहतील तर त्यांस आजन्म फटिंग राहण्याचा प्रसंग फारच क्वचित येईल. किर्लोस्कर मंडळींतच ज्यांचे संसार झाले व मुलेंबाळें होऊन तीही मंडळीच्या कार्याला झटण्याला उद्युक्त झाली हीं उदाहरणें एका संस्थेवर आयुष्याचा भार टाकल्यानें दृष्टीस पडत आहे.

परचुरे यांच्या मृत्यूनें किर्लोस्कर मंडळीचें अतिशय नुकसान झालें हें निराळें सांगावयास नकोच! परंतु ज्यांच्या बरोबर ते सुखदुःखाला भागीदार होते त्यांना त्यांचा वियोग बराच काळ असह्य झाल्याशिवाय राहणार नाहीं!!!

महाराष्ट्रीय नट.



काशिनाथ गोविंद करमरकर.

# महाराष्ट्रीय नट.

## काशिनाथ गोविंद करमरकर.

गेल्या वीस वर्षां पूर्वींच्या पिढींत वरील नट प्रसिद्ध होऊन गेला. नाट्य कलेंत प्रसिद्धीस आलेल्या नटांत याची प्रसिद्धी कांहीं निराळ्या प्रकारची आहे. कै. भाऊराव कोल्हटकर, मोरोबा, नाटेकर, जोगळेकर इत्यादि किर्लोस्करांतील नटवर्ग तसेच शाहुनगरवासीतील कै. बळवंतराव किंवा, रा. गणपतराव जोशी, यांनीं गेल्या पिढींतलें प्रसिद्धीचें जग व्यापून टाकल्यावर इतर नटास प्रसिद्धीस येण्यास फार मुष्कील पडत असे. शिवाय अवांतर सटरफटर नाटक मंडळ्यांतून नटवर्गास प्रसिद्धीस येण्यास फारच प्रयास करावे लागतात. काशिनाथ करमरकर हा अशा मंडळ्यांतून प्रसिद्ध झालेला नट होता. यानें आपल्या साध्याच पण विशेष नाट्यकौशल्यानें कांहींकाळ रसिक वर्गाचें चांगलें रंजन केलं होतें. यानें एकच प्रकारची भूमिका केली आहे. ती ब्राह्मण समाजांत अत्यंत दुर्दैवी ह्मणून मानला जाणारा जो वर्ग आहे त्यांतील विधवा स्त्रीची होय. नटला आपलें कौशल्य दाखविण्यास, हास्यरसांतल्या, शृंगारात्मक दुःखपर्यवसायी नाटकांतल्या भूमिका पाहिजे असतात. परंतु करमरकर ज्या प्रकारच्या भूमिका करीत असत, त्या भूमिकांनीं प्रेक्षकांचें मन आकर्षण करून घेण्याचें कठीण असतें. शिवाय विधवाच्या भूमिकेकडे नाटकांत कधीं प्रधानत्व येण्याचा संबध नसतो. अशीं फारच थोडीं नाटकें आहेत कीं ज्यांत विधवापात्राकडे प्रधानत्व आहे. तें नाटक कै हरि माधव पंडित यांनीं श्रीमन्नारायणराव पेशवे यांच्या मृत्यूच्या नाटकांत गोपिकाबाई पेशवे यांची घातलेली भूमिका होय. परतु तें नाटक क्वचितच रंगभूमीवर आलें आहे. जेव्हां एकाद्या नाटकांत विधवेची भूमिका असते ती बहुतकरून मुद्दामच योजलेली आढळून येत. अशी मुद्दाम भूमिका करूनच करमरकर हें प्रसिद्ध होते. अभिनयाच्या कलेंत मनुष्य स्वभावानुरूप भूमिका असली तर ती जशी पाहिजे तशा वठलें जाईल परंतु जो मनुष्याचा स्वभावधर्म नाहीं त्याची भूमिका करून दाखविणें

फार कठीण जाते. पुरूष पुरुषाची भुमिका स्वभावता करून दाखवितो. स्त्री स्त्रीची भुमिका करून दाखवील- परंतु स्त्रीनें पुरुषाची किंवा पुरुषानें स्त्रीची भूमिका करून दाखविण्यास विशेष कसब दाखविल्या शिवाय बरोबर वठली जाणें शक्य नाहीं. ज्या नटास नैसर्गिक स्वभावधर्माविरुद्ध ती भूमिका करूना दाखवावयाच्या असतात त्याच्या कसबाची किंमत स्वभावधर्माच्या भूमिका करून दाखविणाऱ्या नटापेक्षां अधिक समजली पाहिजे. पुरुषांनीं स्त्रियाच्या भुमिका कराव्या किंवा स्त्रियांनीं स्त्रियांच्या भुमिका कराव्या ह्या प्रश्नाचा खल केव्हांकेव्हां चालतो. त्यांचें उत्तर स्त्री पात्राच्या भुमिका करण्यांत जे नट प्रसिद्ध होऊन गेले आहेत. त्यांनी आपल्या कुशलतेनें दिलें आहे. करमरकर हे विधवा स्त्रीची भुमिका फार उत्तम करीत असत. दुर्दैवानें ज्या स्त्रीवर वैधव्य येतें तिच्या आयुष्यक्रमांत स्वभावांत जो फरक पडत असतो त्यांचें हुबेहुब चित्र वठविणें हें फार मार्मिकतेचें काम आहे. मार्मिकता अंगीं नसलेल्या नटाच्या हातून तें होणें नाहीं. त्यांची देवावर अढळ निष्ठा, अक्षय निराशेची मुद्रेवर पूर्ण छाया, यांचें सुचिर्भुत पणानें वागणें, तोंडानें देवाचें नामस्मरण करणें, वयाच्या मानापेक्षां अंगी अधिक पोक्तपणा दाखविणें यागोष्टी. आंगिक-क्रियेच्या आहेत. त्या करमरकर हे हुबेहूब दाखवीत. त्यांची विधवेची भूमिका रंगभूमीवर आली असता ही एकाद्या थोर घराण्यांतील पोक्त विधवा स्त्री आहे असें वाटत असे व यावरून त्यांस काशा × × × हें नांव पडलें होतें. दैवानें आपली अवकृपा ज्या स्त्रियावर दाखविली आहे व ज्यांना वैधव्याचे शिष्टाचार सोसण्याचे प्रसंग आले आहेत अशांना मराठी बोलणाऱ्यांनीं एक नांव दिलें आहे, त्याचा उच्चार सभ्य लोक करीत नाहींत; परंतु तें नांव करमरकर यांस भूषण झालें होतें. हे अमुकच एका नाटक मंडळींत होते हें सांगतां येणें नाहीं. कारण त्यांच्या बऱ्याच नाटक मंडळ्यांत फेऱ्या झाल्या होत्या. व त्या नाटक मंडळ्या वर्ष सहा महिनेही टिकणाऱ्या नव्हत्या त्यामुळें करमरकरा-संबंधानें अधिक माहिती देण्यासारखी नाहीं. ते सांगली कडचे राहणारे होते.



रा. गणेश गोविंद बोडस—किर्लोस्कर मंडळींतील प्रसिद्ध नटांपैकीं एक-आरंभीं हे मंडळींत आले त्यावेळीं १० रु. वर होते. यांनीं मंडळी सोडली तेव्हां यांस ११० रु. पगार होता. सुमारें १७ वर्षे हे मंडळींत होते. परंतु अलीकडे यांच्या महत्वाकांक्षिच्या मनोवृत्ती संसर्गानें असह्य झाल्यानें हे किर्लोस्कर मंडळी सोडून गंधर्व मंडळीचे एक घटक बनले आहेत.



बालगंधर्व— नारायण श्रीपाद राजहंस. १९०५ साली किर्लोस्कर संगीत मंडळींत आले. कीर्ति व पैसा पुष्कळ मिळविला परंतु यांच्या कांहीं 'अपरिहार्य कारणामुळें यांस ही मंडळी सोडावी लागली.' हल्लींचे गंधर्व मंडळीचें जीवित्व यांच्यावर अवलंबून आहे. हा ... तो चालल. यांस किं. सं. मंडळींत २०० रुपये पगार होता.

## महाराष्ट्रीय नट

# रा. बालगंधर्व यांचें बाल चरित्र.

सदर चरित्राचा लेखक कोणी " उद्योगी बाळ " आहे. " उद्योगी बाळ " हें विशेषण बहुतकरून एखाद्या उपद्व्यापी व खोडकर मुलाला लावलें जातें. कालेजमध्यें शिकणारें हें " उद्योगी बाळ " विन नांवानें कां प्रसिद्ध होत आहे याचें आह्मांस मोठें गूढ आहे. पुस्तकाच्या भाषेवरून व विचारसरणी वरून लेखकाला कालेजच्या शिक्षणाचा कांहीं गंध आहे कीं नाहीं याची आह्मास शंका आहे. कालेजच्या शिक्षणाच्या पायरीस चढलेल्या उद्योगी बाळांना लिहिण्यासारखे विषय अन्यत्र पुष्कळ आहेत. नाटक विषयावर किंवा नटांचीं चरित्रें लिहिण्याचें काम ' कच्च्या पोरांचें ' नसतें. बालगंधर्व हा गुणी मुलगा आहे, सुस्वभावी आहे, निर्व्यसनी आहे, भिडस्त आहे, लाजरा आहे, इत्यादि इत्यादि चांगलेपणाचे गुण त्याच्या अंगीं भरपूर आहेत; परंतु त्याचें चरित्र लिहिलें जाण्याच्या पात्रतेला अद्याप तो पोचावयाचा आहे. कारण अद्याप तो पोरच आहे. व पोरपणांत होणारे प्रमाद अद्याप कळत न कळत त्याच्या हातून होण्याचा संभव आहे. शिवाय या चरित्रानें बालगंधर्वाची किंम्मत अधिक वाढण्याची नाहीं व आहे ती कमी होणारी नाहीं. याच्या चरित्रापासून दुसऱ्यानें बोध घेण्यासारख्या गोष्टी अद्याप त्याचे हातून प्रौढ वयांत घडावयाच्या आहेत. ईश्वरदत्त बालगंधर्वाचा आवाज व सौंदर्य हीं नटाला अवश्य असणारीं साधनें अनुकरणानें प्राप्त होणारीं नाहींत. इतर बाळपणाचे जे सात्विक स्वभावधर्म आहेत ते थोड्याफार प्रमाणानें बालगंधर्वांच्या वयाच्या सर्व मुलांत असतात, व त्यांचें विशेष स्तोम माजविण्याचें अल्पवयांत कारण पडत नाहीं.

आमच्या ह्मणण्याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास महाराष्ट्र नाटक मंडळींतील नायिकेची भूमिका करणारा मुलगा पोतनीस याचें उदाहरण घ्यावें. गंधर्व आपल्या कलेंत जितका निष्णात आहे, तितका पोतनीस गद्य नाटकांत निष्णात आहे. दोघांचेही रूप, गुण, स्वभावधर्म यांत साम्य आहे. गंधर्वांच्या ठिकाणीं सौंदर्य आहे, पोतनीसही सुस्वरूप आहे. गंधर्व संगितांत श्रेष्ठ आहे, पोतनीस गद्य नाटकांत श्रेष्ठ आहे. गंधर्व किर्लोस्कर मंडळीच्या " सोन्याच्या पिंजऱ्यातून मोकळा झाला, " पोतनीस महाराष्ट्र नाटक मंडळीच्या रुप्याच्या पिंजऱ्यांतून ( महाराष्ट्र नाटक मंडळी प्रोज नाटकें करणारी आहे म्हणून रुप्याचा म्हटलें ) मोकळा झाला होता; परंतु आतां पुन्हां तो त्या मंडळींत गेला. गंधर्वानें किर्लोस्कर मंडळी सोडूं नये, अशी अखिल महाराष्ट्राची इच्छा होती; पोतनीसानेंही महाराष्ट्र नाटक मंडळी सोडू नये म्हणून त्या वेळीं पुष्कळांनीं प्रयत्न करून पाहिले. सारांश लहान मुलांतले स्वभावधर्म सारखेच असतात, हें पोतनीस आणि गंधर्व यांचें उदाहरणांवरून कळून येईल. संगीत आणि प्रोज हा फरक बाजूला ठेवला तर गंधर्वाचें चरित्र तें पोतनिसाचें व पोतनिसाचें तें गंधर्वाचें म्हटलें तरी चालेल.

तथापि गंधर्व यांचें चरित्र प्रसिद्ध झालें याबद्दल आम्हांस आनंद वाटत आहे. गंधर्वांच्या चरित्राचा हा पूर्व भाग आहे असें आम्ही समजतों. कारण पृष्ट ५२ मध्यें लेखकानें जी त्यांच्या भूमिकांची, प्रवासाची, त्यांच्या भूमिका पाहिलेल्या लोकांची गणती दिली आहे ती अद्याप दुप्पट तिप्पट व्हावयाची आहे. आतां गंधर्वांचा प्रवास रंगभूमीवरून रंगपटांत व पुन्हां परत असा जो सुमारें ६५००० फूट झाला आहे असें चरित्रलेखक म्हणत आहे, तो आणखी कांहीं वर्षांनीं १३०००० फूट व्हावयाचा आहे. त्याचें गाणें ऐकलेल्यांची संख्या जी हल्लीं ३, ३। कोटी आहे ती कांहीं वर्षांनीं ६, ६॥ कोटींहूनही अधिक

व्हावयाची आहे. बालगंधर्वाचे गाणें ऐकण्यास मोहक आहे, तितकें त्याचें चरित्र वाचण्यास चटकदार करण्याकरितां लेखकानें मोठ्या प्रमेयाचीं ठिगळं देऊन गंधर्वाच्या चरित्राची गोधडी बनविली आहे. कोणीकडे अमेरिकेंतील सिव्हिल वार? कोणीकडे नेपोलियनचें रणकंदन? व कोणीकडे नाटकी लोकांची फाटाफूट--! कशास कांहीं मेळ! एका तराजूंत सोनें व एका तराजूंत त्याच्या भारंभार दगड घातले म्हणून दगडाला सोन्याची किंमत येत नाहीं. आज एका नाटक मंडळींतून फुटून दुसरी, तिसरी काढणारे वीर नाटकी सृष्टींत पुष्कळ आहेत, त्या सर्वांना मग शिवाजी, शिकंदर म्हटलें पाहिजे दुस-ऱ्याच्या व पोरपणाच्या बुद्धीनें व स्वार्थी लोकांच्या कानमंत्रानें केलेल्या गोष्टींचें कोणाही समंजस व विचारी मनुष्याला समर्थन करतां आलें नाहीं, त्या गोष्टीचें हा चरित्र लेखक केवढ्या अबाढव्य भाषेंत मंडन करीत आहे! " स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं धडपडणारा हा राजहंस, " " सोन्याच्या पिंजऱ्यांतून बाहेर पडण्याविषयीं उत्सुक असणारा हा राजहंस, व त्याला मिळालेले स्वातंत्र्योत्सुक दोन " विहंग, " हे तीन वर्षाच्या आंतच पुन्हा कां बरें एकमेकांना चोंची मारू लागले! पुन्हा त्यापैकीं एकास मानससरोवरावर फिरण्याचा कां बरें प्रसंग आला! अलंकारिक भाषा नाटकांत शोभते-कारण नाटकांत सर्व कल्पनांचा बाजार असतो. परंतु खऱ्या गोष्टी आहेत त्या खऱ्या गोष्टींनच लिहिल्या तर शोभतील. गंधर्वाला चांगलें म्हटलें तर आम्हास अत्यंत प्रिय आहे. त्याचे गुण आणिक आहेत, हे आम्हाला जितके माहित आहेत, तितके त्याच्या उपरी चरित्र लेखकाला खाचित माहीत नाहींत.--त्याचें चरित्र लिहिण्याला एवढी अलंकारिक भाषा नको आहे. त्याच्या दोषाचें समर्थन तिनें होऊं शकणार नाहीं. बालगंधर्वाला स्वतंत्र नाटक मंडळी काढण्यास कोणी लावली, कां लावली, कशी लावली, या कारस्थानाच्या हकीकती द्यावयाच्या

म्हणजे त्या बालगंधर्वांच्या चरित्रांत येणाऱ्या गोष्टी नाहींत. मृच्छकटिक नाटकाची इतकी सुंदर रचना जशी मातीच्या गाड्याच्या साध्या गोष्टी-वरून झाली आहे, त्या प्रमाणें बालगंधर्वांच्या चरित्राची सुंदर इमारत अगदीं साध्या गोष्टींवरून बांधावयाची आहे. त्या गोष्टी, त्या–त्या विशिष्ट व्यक्तींच्या चरित्रांतल्या आहेत. किर्लोस्कर संगीत मंडळी सोडण्यापूर्वीं बरोबर एक महिना सकाळीं बिचारा मंडळीच्या सेक्रेटरीकडे आला व मी एक महिन्यानें किर्लोस्कर मंडळी सोडणार असें सेक्रेटरीला त्यानें सांगितलें. बालगंधर्वांच्या चरित्राची इमारत या गोष्टीवर रचावयाची आहे. अशा अचानक रीतीनें " सरप्राईस " करून सेक्रे-टरींना वंगविण्याची पाकनिष्पत्ति एका खानावळींत पूर्वीं महिनाभर शिजत होती. सवाईमाधवराव पांच वर्षांचे असतानां, खर्ड्याच्या लढाईची बातमी कळण्या-बद्दल काळजींत असलेल्या मुत्सद्यांचीं तोंडें सुकलेलीं पाहून " आणा माझी तरवार " म्हणून त्यानीं म्हणण्यास व लढाईची फत्ते झाल्याची वर्दी येण्यास एकच गांठ पडली. तसें बालगंधर्व, जर मी कंपनी सोडणार असें सेक्रेटरीस न सांगता, तर बाकीच्या दोन विहंगाला आपलें पंख आपल्या पोटाशींच धरून बसावें लागतें. परंतु बालगंधर्वानें त्या वेळीं त्याच्या पाठीच्याची अब्रू राखिला आहे खरी! व याबद्दल आह्मी त्याची तारीफही करतों; कारण त्या वेळेस त्यानें आपला मनोनिग्रह दाखविला आहे. बालगंधर्वांबद्दल या पेक्षां निष्ठुरतेनें व अप्रिय आम्हांस बोलतां येत नाहीं. ज्याला त्यांचा चरित्र लेखक सोन्याचा पिंजरा म्हणून म्हणत आहे, तो पिंजरा होता, ही कल्पना त्याची नाहीं. ही कल्पना कोणातरी कुटिल स्वभावाच्या मनुष्याची असली पाहिजे. ' नरोवा कुंजरोवा ' हें वाक्य धर्मराज अपखुषीनें बोलले नाहींत, तर त्यांना दुसऱ्यांनीं बोलावयास लावलें होतें. गंधर्वांच्या तोंडचीं गाणीं फोनोग्राफ मध्यें जातात, परंतु त्याच्या तोंडांत, मी किर्लोस्कर मंडळी सोडणार आहे, हीं वाक्यें दुसऱ्यांनीं घातलीं

असलीं पाहिजेत अशी आमची समजूत आहे. तथापि ही गोष्ट, आह्मी त्याचें वय, त्याचा स्वभाव, तो ज्या वातावरणांत सांपडला होता ती स्थिति, योग्यायोग्य गोष्टींचा विचार करण्यांची त्याची शक्ति इत्यादि अनेक गोष्टी ध्यानांत घेऊन क्षम्यच समजतों. बालगंधर्वाच्या या कृतीवरून मराठी माजी क्रमिक दुसऱ्या पुस्तकांतील " वेड्या कोकराच्या गोष्टी " ची आठवण होते. त्याचा धनी रात्रीं त्याला इतर मेंढरा बरोबर लांडग्यापासून निर्भय अशा ठिकाणीं ठेवीत असें; परंतु त्या कोकराला तो कोंडवाडा वाटला. व आपल्या आई जवळ तें कुरकुर करूं लागलें. आईचें समजून सांगणें त्याला न पटून तें वाडग्याबाहेर पडलें तें पुन्हां परत आलें नाहीं. बालगंधर्व हा त्या वेळीं एक वागडणारें कोकरूं होतें. त्याला त्यांच्या बुद्धीप्रमाणें किर्लोस्कर मंडळीत असणें ह्मणजे पिंजऱ्यांत असणें वाटलें असेल.परिपक्व बुद्धीचा मनुष्य सुद्धां जेथें सदसद्विवेक बुद्धीला पायाखालीं तुडवून एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होतो तेथे बालगंधर्वासारख्या त्यावेळीं अजाण असलेल्या मुलाच्या चुकीकडे कडक दृष्टीनें पाहणें योग्य होणार नाहीं. कारण किर्लोस्कर मंडळी फोडण्याच्या वेळीं, जीं जीं कारस्थानें करण्यांत आलीं त्याला गंधर्व हा निमित्त मात्र आहे हें आह्मीच त्याच्या तर्फे सांगतों.—गंधर्व मंडळी म्हणजेच किर्लोस्कर मंडळी हें दाखविण्याचे प्रयत्न फाटाफुटीच्या वेळीं लोकांत भ्रम उत्पन्न करण्यासारखे होते. किर्लोस्कर मंडळीचे पहिले सेक्रेटरी, रा. त्रिंबक नारायण साठे, यांचा सेक्रेटरीपणाचा देव्हारा आपल्या मंडळांत पुन्हां मांडणें, किर्लोस्कर मंडळीचे जुने मालक रा. किंजवडेकर यांची पूजा करणें, पुन्हां कै. देवलांची अनुकूलता लोकांत मिरवण, अण्णासाहेबांची तसबीर मांडणें, त्यांच्या नांवानें श्राद्ध करणें, सारांश किर्लोस्कर मंडळीची बरोबर " कॉपी टू कॉपी " करणें या सर्व गोष्टी वरून एखाद्याची अशी समजूत व्हावयाची कीं, किर्लोस्कर मंडळी ती हीच. परंतु या सर्व कल्पना

व लंगधर्वांच्या नसाव्यात. नाटकाच्या कामांतले सूत्रधार रंगभूमीवर येतात, परंतु किर्लोस्कर मंडळी फोडण्याच्या नाटकांतले सूत्रधार व पारिपार्श्वक सर्व पडद्यांतून काम करीत होते, व बालगंधर्वांसारख्या पात्रांना नाचवीत होते. हेंच बालगंधर्वांचें त्या वेळे पर्यंतचें चरित्र आहे

खुद्द बालगंधर्वांचा चरित्र लेखक ह्मणतो कीं, "व्यवहार ज्ञानांत ते अद्याप अज्ञान आहेत. तसेंच फाजील विनयानें व गरिबीच्या वागण्यानें फसवे व लुच्चे लोक त्यांना टोपी घातल्या खेरीज राहणार नाहींत. त्यांतून आतां तर ते एका मोठ्या संस्थेचे मालक-चालक असल्यामुळें त्यांना हुशारी, व्यवहार चातुर्य, मुत्सद्दीगिरी, धोरण इत्यादि व्यवहारिक गुणांची फार अवश्यकता आहे या गुणांच्या अभावीं, एखादा कार्यसाधु व्यवहारज्ञ त्यांना एखादे वेळीं सपशेल लुबाडल्याखेरीज रहाणार नाहीं."

चरित्रनायकांत जें गुण पाहिजेत त्यांची यादी ही बरोबर आहे. आम्ही अशी आशा करतों कीं, हे गुण बालगंधर्व आतां तरी संपादन करील व आपली कंपनी स्वकर्तृत्वानें व स्वबुद्धीनें दीर्घ काल चालवील.

तथापि महाराष्ट्रीय नटांच्या चरित्र मालिकेत बालगंधर्वाचें चरित्र अवश्य आहे. तें लिहून नाटक विषयक वाङ्मयांत लेखकानें दोन ओळीचो भर टाकली आहे म्हटलें तरी चालेल. आणखी कांहीं दिवसांनीं हें चरित्र लिहिलें जातें तर बालगंधर्वांच्या चरित्रावरचा कि. सं. मं. तून फुटल्याचा वण बुजून जाता व त्याच्या चरित्रांत त्याच्या कर्तबगारीच्या आणखी कांहीं गोष्टी लिहितां आल्या असत्या. किर्लोस्कर मंडळींत होऊन गेलेलीं पात्रें, कै० मोरोबा, भाऊराव, बाळकोबा, जोगळेकर हीं किर्लोस्कर मंडळी करितांच ईश्वरानें जन्मास घातलीं असें त्यांच्या विषयीं लोक म्हणत होते, तसा गंधर्व हा किर्लोस्कर मंडळीच्याच कोंदणांत असावयास

पाहिजे होता. परंतु तो आतां दुसऱ्या कोंदणांत आहे, तथापि तो आपलें तेज मलीन ठेवणार नाहीं अशी आह्मी फार फार आशा करितों. गंधर्वाचे गुण आणिक आहेत म्हणून आम्ही मागें सांगितलें आहे. ते खरोखरीच तसे आहेत. त्याचे बालपणचे विचार बालगंधर्व या नांवाला शोभण्यासारखेच होते. किर्लोस्कर मंडळींत आल्याबरोबर मंडळींतील सर्व माणसें मला नवीन आप्त मिळालीं असें ज्या गंधर्वाला वाटलें, मातोश्रीचा शब्द ह्मणजे पडत्या फळाची आज्ञा समजणारा असा जो बालगंधर्व, घरीं गेला असतां, मला लौकर परत घऊन जा, नाहीं तर म्हणाल कीं, हा थापा देऊन गेला असें ह्मणणारा जो बालगंधर्व, कोणाही वडील माणसाशीं विनयानें वागणारा असा जो बालगंधर्व, दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून, दुसऱ्याची भरभराटी पाहून, दुसऱ्याचा फायदा होत आहे असें पाहून, मत्सरानें स्वतःला तळमळ लावून न घेणारा असा जो बालगंधर्व, तो फाटाफुटीच्या वेळीं कोणाच्या कानमंत्राला बळी पडला हें सर्वांस मोठें गूढ आहे. परंतु ज्यांनीं मनुष्य स्वभावाचा विचार केला असेल, त्यांना यांत गूढ वाटणार नाहीं. भिडस्तपणा हा मनुष्य स्वभावांतील गूण आहे तसा दोषही आहे. बालगंधर्वाचा प्रकार तसाच झाला आहे. फाटाफुटीच्या वेळीं स्वतःच्या मनाशीं विचार करण्याला त्याला मोकळीक मिळती तर त्याच्या अंगचे वरील गूण त्याला त्याच्या स्वभावापासून ढळूं न देते. परंतु—

असो. बालगंधर्वाचें चरित्र लिहिल्याबद्दल लेखकास आह्मी शाबासकी देतों आपलें नांव चोरून ठेवण्यासारखें चरित्र लिहिण्यांत आम्हास तर कांहीं अपकृत्य दिसत नाहीं. कदाचित् भाऊराव कोल्हटकर यांचें चरित्र लिहिणारानें आपलें नांव घातलें नाहीं, म्हणून बालगंधर्वाच्या चरित्रकारानें आपलें नांव घातलें नसल्यास नकळे. परंतु भाऊरावांचें चरित्र हे त्यांच्या

मृत्यूनंतर लागलीच प्रसिद्ध झाल्यानें, त्या प्रसंगाला तसें करणें उचित होतें बालगंधर्वांचे हें बाल चरित्र आहे. चरित्र नायक बालगंधर्व, लिहिणारा उद्योगी ' बाळ ' च व चरित्रांतील बहुतेक कृती बालवयांतीलच, म्हणून आह्मी सदर चरित्राला बाल चरित्र हें नांव देतों. बालगंधर्व अद्याप विशींच्या आंत आहेत. वीस वर्षांच्या आंत त्यानीं जी विद्या संपादन केली तिच्यावर ते आज द्रव्य संपादन करीत आहेत व त्याचा संचय ते तीस वर्षांचे होई पर्यंत पांच पन्नास हजारापर्यंत तरी करोत अशी आह्मी इच्छा करतो. ह्मणजें विशीं विद्या तिशीं धन या ह्मणीची सार्थकता झाली. किर्लोस्कर मंडळी सोडण्याच्या अनेक कारणापैकीं, या वयांतच आह्मी द्रव्य मिळाविलें तर मिळेल, पुढें आवाज फुटला तर आह्मास कोण विचारणार ह्मणून आह्मी निराळी मंडळी काढतों असें एक त्याचें कारण होतें परमेश्वरकृपेनें, गंधर्वांवर गंधर्व मंडळीची भरभराट आहे. तीच प्रत्यक्ष गंधर्वांचीहि अखंड चालो अशी आह्मी परमेश्वरापाशीं प्रार्थना करितों.

## किर्लोस्कर मंडळींतील नट.



विनायक दत्तात्रय बेहेरे.

ब्रुमीत हे
आम्ह्या
ोंत आले,
त, नंतर
ऱ्या. तेव्हां
ायिकेच्या
सौंदर्य व
गा, निर्व्य-
ाचे अंगांत
ोंत एखादें
ंकवा बाहे-
च्या मोड-
या खाकेंत
त ते आले
लेलें पात्र
खोरपणाचें
प्रिय होते
ीं केलेल्या
शाकुंतल,
ीरपणाचीं

कामें जितकीं शोभत असत तितकीं, चंचल व अल्लडवृत्तीचीं शोभत

## विनायक दत्तात्रय बेहेरे.

किर्लोस्कर संगीत मंडळीच्या नटवर्गात आलीकडे ७।८ वर्षांत हे प्रमुख नटांपैकीं असलेले नट ता. १४ जून १९१९ रोजीं आपल्या राहत्या गांवीं परलोकवासी झाले. प्रथम हे १९१२ सालीं मंडळींत आले, त्यावेळीं दुय्यम प्रतीच्या नायिकेच्या भूमिका करीत असत, नंतर ओघानें मुख्य नायिकेच्या भूमिका त्यांच्याकडे लवकरच आल्या. तेव्हां पासून १९१८ च्या डिसेंबरपर्यंत ते मंडळीच्या सर्व नाटकांतील नायिकेच्या भूमिका करीत असत. या भूमिकेला अवश्य असणारे सौंदर्य व मधुर कंठ हे गुण त्यांच्यांत होतेच; पण त्या बरोबर सालसपणा, निर्व्यसनीपणा, विनय, सरळपणा, निरुपद्रवी स्वभाव इत्यादि गुण त्यांचे अंगांत पूर्ण वसलेले असत. आलीकडच्या नाटक मंडळ्यांच्या खळबळींत एखादें स्त्रीपात्र खाकेंत मारून, त्याच्या जोरावर नाटक मंडळ्यांतले किंवा बाहेरचे नाटकमोडे लोक कशा उड्या मारतात हें नाटक मंडळ्यांच्या मोडतोडीवरून सर्व लोकांस माहीत झालें आहेच. बेहेरे या लोकांच्या खाकेंत जाणारें पात्र नव्हतें. त्यांनीं आपले हितसंबध ज्या मंडळींत ते आले तिच्याशींच निगडीत केले होते. किर्लोस्कर मंडळींत हें नाणावलेलें पात्र होतें. तरुणवयाच्या स्त्री पात्राच्या अंगीं जे सामान्यहतः मिजासखोरपणाचे दोष जडतात; ते त्यांच्या ठिकाणीं नसल्यामुळें, हे जसे मंडळींत प्रिय होते तसेच बाहेरच्याही परिचित अपरिचित लोकांस प्रिय होते. यांनीं केलेल्या भूमिका—मानापमान—भामिनी, मूकनायक सरोजिनी, सौभद्र, शाकुंतल, सुभद्रा व शंकुतला या होत. यांच्या स्वभावाला सभ्य व गंभीरपणाचीं कामें जितकीं शोभत असत तितकीं, चंचल व अल्लडवृत्तीचीं शोभत

नसत. पुरुषपात्राच्याही भूमिका त्यांनीं, अर्जून, गुप्तमंजुषांत विलास, चंद्रहासांत चंद्रहास इत्यादि केल्या आहेत. मुख्य नायकाच्या भूमिका पुढें यांना कारितां याव्या या धोरणानें पूर्वी पासूनच दोन्ही प्रकारच्या भूमिकांचा सराव त्यांच्याकडून करून घेण्यांत येत होता. पुढें हे अधिक नांवालौकिकास येतील अशी यांच्याबद्दल मंडळीस फार आशा होती. " हार्ट डिझीज " चें घातुक व्यंग यांच्या ठिकाणीं आहे हें मरणापूर्वी सहा महिने अगोदरच कळलें. शेवटीं दोषी ताप येऊन यांचा अगदीं उमेदीच्या वयांत अंत झाला.

यांस तरुण पत्नी–वडील बंधु मातोश्री इत्यादि कुटुंबांतील परिवार आहे. यांचें घरदार बेळगांव जवळ शहापूर येथील आहे. यांची वागणूक नाटकी श्रीमंती थाटाची नसून कुटुंबवाईक पद्धती प्रमाणें असे. धंद्यावर मिळवलेली प्राप्ती त्यांनीं उधळेपणांत व चैनींत खर्च न करितां जतन करून ठेविली आहे.

एवढ्याशा अल्प वयांत यांनीं जगाचें काय अनुभव घ्यावयाचें ! किंवा जगांतलें काय पाहिलें असेल ? किंवा जगाला तरी एवढ्याशा वयांत यांचे कितीसे गुण नजरेस पडले असतील ? परंतु जे गुण दृष्टीस पडले त्यावरून एवढेंच ह्मणतां येतें कीं किर्लोस्कर मंडळींत आजपर्यंत मिळाल्या मुलांत हा एक होतकरू, गुणी व सात्विक वृत्तीचा मुलगा होऊन गेला.



कै० आप्पण्णा मजली.

Skantadurgaprakash Press Belgaum.

## अप्पांण्णा मजली.

हे गृहस्थ बेळगांवचे राहणारे. अण्णासाहेबांचे हे परमस्नेही असत. संगीत नाटक उदयास येण्यापूर्वी बेळगांवास नाट्यकलेच्या उद्धारार्थ अण्णासाहेबांनीं जे प्रयत्न केले, त्यांत त्यांस अप्पाण्णांचे सहाय्य असे. हे उत्तम गाणारे असून मोठे नकली असत. त्यामुळें अण्णासाहेब व अप्पाण्णा बेळगांवास असत, तेव्हां तेथें मोठी करमणुक असे. चिकोडीस हे मुकत्यार वकीलांत प्रसिद्ध असत. हे १९०५ च्या सुमारास वारले.

## अण्णासाहेबांच्या चरित्रांतील दोन पात्रें.

### [ १ ] दिनकर बळवंत नेने ऊर्फ गावठी साहेब.

ही पुणें शहरांत एक विनोदी प्रसिद्ध व्यक्ति असे. किर्लोस्कर यांच्या चरित्रांत या गृहस्थाची माहिती आली आहे. त्यावेळीं अण्णासाहेबांनीं ज्या निवडक माणसांचा मंडळींत संग्रह केला होता, त्यांतच गांवटी साहेब यांची गणना होती. यांच्या अनेक प्रकारच्या विनोदी नकलांनीं हे



कोठेंही गेले तरी मंडळीची करमणूक करीत असत. हे उत्तम प्रकारचे कॉपिस्ट असत. पुण्यास त्यावेळीं स्वदेशी कपडे वापरणारे जे कोणी असतील त्यांत हे एक गृहस्थ होते. शिकलेल्या लोकांत यांचें बसणें उठणें असे. १८९७ मध्यें हे प्लेगनें वारले.

पुणें शहरांत शनिवार पेठेंतील शेवडे उपनांवाच्या घरंदाज घराण्यांतील पुढील गृहस्थ होत. किर्लोस्कर मंडळीच्या ऐन अमदानींत नाटेकर व वाघोलीकर याप्रमाणेंच शेवडे यांचेंही मंडळीस साह्य झालें आहे.

## [ २. ] नारायण सदाशिव ऊर्फ नाना शेवडे.



१८८० सालीं पुणें व मुंबईत जे शाकुंतल नाटकाचे प्रयोग झाले त्यांत शेवडे हे अण्णासाहेबांच्या सूत्रधाराच्या भूमिकेबरोबर एका बाजूचे पारिपार्श्वक असत व दुसऱ्या बाजूनें नाटेकर असत. दोघांचेही गंधर्वतुल्य आवाज असल्यानें सूत्रधाराचा प्रवेश फारच बहारीचा होत होता. दुसऱ्या अंकांत यांच्याकडे सेनापतीच भूमिका असे; तीही यांनीं अप्रतिम वजावली होती.

सोलापूर—पंढरपूर—विजापूर येथें नाझरच्या हुद्यावर हे असत. हे फार मनमिळाऊ, रंगेल व गायन व तंतुवाद्य यांत प्रविण असत. १८९९ मध्यें हे प्लेगनें वारले.

पारसी नाटक मंडळ्यांतील प्रसिद्ध नट.



म. पेस्तमजी कावसजी खटाव.

# मरहुम मि. कावसजी पालनजी खटाऊ.

[ लेखक— श्रीधर शंकर मुजूमदार. मुंबई. ]

ता. ३ सप्टेंबर सन १८५८ जन्म ] [ मृत्यू ता. ११ आगष्ट सन १९१६

आज आपल्या महाराष्ट्रांत ज्या कांहीं गुजराथी, पार्शी, दक्षिणी नाटक कारन्या आहेत. त्यांतील एका नांवाजलेल्या कंपनीचे मालक मि. कावसजी पालनजी खटाऊ यांना लाहोर मुक्कामीं ता. ११ आगष्ट रोजीं देवाज्ञा झाली हे कळविण्यास आह्मांस वाईट वाटतें. यांनीं आपल्या वयाच्या ११ व्या वर्षा-पासूनच नाटकाच्या धंद्याकडे लक्ष घालण्याचें ठरविलें; व त्या वेळेपासून तों मरेपर्यंत हाच व्यवसाय त्यांनीं उत्तम तऱ्हेनें चालवून चार लोकांत मानमान्यता, द्रव्यसंचय व लौकिक संपादन केला. ज्या अर्थी इतक्या लहान वयांतच त्यांनीं आपल्या आयुष्यास निराळेंच वळण लावलें, त्या अर्थी त्यांना शिक्षण फार मिळालें नाहीं हें उघडच होतें; तथापि नाटकाच्या धंद्यांत शिर लेल्या कोणत्याहि इसमास व्यावहारिक शिक्षण व तदनुषंगिक हुनर सर्व प्रकारची माहिती फारच लवकर मिळते. व याच गोष्टीचा फायदा म. कावसजी खटाऊ यांनीं बरोबर घेतला. प्रथमतः हे एंप्रेस नाटक मंडळींत पगारदार होते. या वेळीं महमदअल्ली, बालीवाला हे अगदीं कसलेले नट असल्यामुळें यांच्याशीं सामना करणें अवघड काम होतें परंतु कावसजी यांनीं मेहनतीनें व कर्तबगारीनें त्यांतही निपुणता मिळविली. पुढें सन १८९३ सालीं यांनीं स्वतःची मंडळी स्थापन करून शेक्सपिअरच्या नाटकाचीं रूपांतरें करवून, सीनसीनरी, पोषाख वगैरेच्या साह्यानें निराळीच दिशा लावली. बहुतेक नाटकांत यांच्याकडे महत्वाच्याच भूमिका असत. हॅम्लेट नाटक

जें " खुने नाहक " या नांवानें प्रसिद्ध आहे, तें यांनीं ऊर्दू भाषेंत बसविलें होतें. त्यांत हॅम्लेटची भूमिका हे स्वतःच करीत यांत त्यांनीं इतका लौकिक संपादन केला कीं मोठमोठे युरोपियन लोक सुद्धां त्याबद्दल व्यक्तिशः संतोष व्यक्त करीत. हे पाहिजे ती भूमिका स स वठवीत; परंतु हास्य, करुण व भयानक रसाच्या भूमिका उत्तम वठविण्यांत यांचा हातखंडा असे.

आपल्याच शहरीं पैसा, अब्रू वगैरे मिळविल्यावर हिच कीर्ति बाहेर मिळवावी या महत्त्वाकांक्षेनें लवकरच त्यांनीं आपली मंडळी महाराष्ट्राच्या बाहेरच्या प्रांतीं ह्मणजे सीलोन, सिंगापूर, ब्रम्हा या ठिकाणीं नेली; तेथेंही त्यांच्या श्रमाचें चांगलेंच चीज झालें. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियानाच देण्याचा उपक्रम यांच्या कंपनींत असे व ७००|७००शें रुपये महिना पगार देऊनही या स्त्रिया ऐन वेळीं आज या कंपनींत तर उद्यां दुसऱ्या कंपनींत अशा बुद्धिबळाच्या डावातील प्याद्याप्रमाणें नाचलेल्या दृष्टीस पडत. सध्यां आपल्याकडे हाच वादाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. याचा निकाल " तया यातना कठीण " याचप्रमाणें होणारा आहे. असो. बाहेर लौकिक व द्रव्याचा अमूप संचय करून नंतर पुन्हा मुंबई मुक्कामीं सन १९०८ सालीं यांनीं कंपनीची जुबिली करविली. या समारंभाचें प्रमुखत्व मरहुम ना. सर फिरोजशहा मेथा यांचेकडे होतें या समारंभास धनिक, शेटसावकार राजे रजवाडे यांचे कडून उत्तेजनार्थ सोन्याचांदीचीं, हिऱ्याचीं अतोनात पारितोषकें मिळालीं. कावसजी यांनीं धार्मिक संस्थांना फार मदत केली आहे. पौराणिक नाटकें हिंदी भाषेंत रचण्यास यांनीं सुरवात करून महाभारतासारख्या लोकोत्तर ग्रंथाचें स्वारस्य नाटकरूपानें समाजाला दाखवून प्रक्षेकगण तल्लीन करून सोडला नाटकाच्या धंद्यांतल्या अडचणी यांना जाणवल्या नाहींत असें नाहीं. नाटकांतील नटांना इंद्राच्या सिंहासनावर जरी नेऊन बस-

विलें तरी त्यांची महत्त्वाकांक्षा अतृप्तच राहणार-याही पलीकडे मालकांनीं आपलें चोज पुरविलें पाहिजेत; चोरून विडी ओढणाऱ्या पोरानें ती आपल्यांस वेळेला मिळाली नाहीं म्हणून रुसवें किंवा पाणी वाढण्यास एक सेकंद उशीर झाला तर दुसऱ्या कंपनीचा रस्ता सुधारावा इतक्या क्षुल्लक गोष्टींना महत्त्व आणणारा नटवर्ग जेथें आहे तेथें नाटकाच्या धंद्याला ऊर्जितावस्था आणण्यास काय श्रम पडत असतील याची कल्पना इतर वर्गाला येणें संभवनीय नाहीं. नटवर्ग व नाटक कंपनीचे मालक यांचे अन्योन्यसंबंध जर समाधानकारक असले तर अशी कोणती गोष्ट आहे कीं ती साध्य होणार नाहीं? पण जे नाहीं तें आहे व पाहिजे तें नाहीं अशामुळेंच किती घरें, किती संस्था व किती राष्ट्रें धुळीला मिळालीं आहेत, मग नाटकासारख्या सर्वतोपरी परावलंबी असलेल्या धंद्याची काय स्थिती होत असावी. याच यातना म. कावसजी यांनाही भोगाव्या लागल्या असतील. पण आह्मी त्यांचें कौतुक करतों तें याच करितां कीं अशा या बिकट प्रसंगांतूनही त्यांनीं हा नाटकाचा परावलंबी गाडा प्रेक्षक समुदायाला खूप करून व कंपनींतील नटांच्या लहरी पुरवून उत्तम तऱ्हेनें चालविला व सुमारें चाळीस वर्षें धंद्याची इभ्रत वाढवून स्वतःचा शेवट गोड करून घेतला. नटांना फक्त रंगभूमीवरच आपली भूमिका वठवून दाखवावयाची असते, परंतु मालकांना चोवीस तास प्रत्येक क्षणीं आपली भूमिका आत्तां राव व घटकेनें रंक अशी त्या त्या प्रसंगाला अनुसरून वठविण्याची असते. नटांच्या मिजाशी व प्रेक्षकांची सहानुभूति यांच्या कात्रींतून हा धंदा यशस्वी करावयाचा असतो. असा हा धंदा म. कावसजी यांनीं यशस्वी करून पहिल्या प्रतीच्या सदरांत आपलें नांव कायम ठेवलें हाच यांच्या चरित्रांतला विशेष आहे.

म. कावसजी यांना आपल्या प्रमाणेंच नटांनींही हौशी व मेहनती असावें

असें फार वाटे टाकमाड्याचीं कामें करणारे नट स्वतः बरोबर दुसरे लोकांचीही नुकसानी करितात हो त्यांची प्रामाणिक समजूत असे. नटांनीं सर्व प्रकारची माहिती करून घ्यावी व समाजांत आपला दर्जा सर्व प्रकारें वाढवून घ्यावा असें त्यांचे सतत प्रयत्न असत. पण चाळीस वर्षांच्या अनुभवानें ते अगदीं निराशाजनक उद्‌गार काढीत. धंद्याला हौशी व गुणी नट मिळाले तरच दरिद्री स्थितींतून संपन्न स्थितींत संस्था आणतां येते. नुसत्या पैशाच्या जोरावर तात्पुरत्या अडचणी भागवितां येतील पण त्या योगानें धंद्याचा पाया बळकट कधींही होणार नाहीं. अगदीं अर्धवट शिकलेला किंबहूना मुळींच न शिकलेला असा नाटकाच्या धंद्यात शिरून आपला चरितार्थ चालविणारा इसम जर कर्तबगारीचा असेल तर स्वतःच्या पायावर उभें राहून जगांतील सर्व सुखांचा—सुखें ह्मणजे व्यसनें नव्हत—अनुभव एखाद्या राजाप्रमाणें घेतां येतो पण नट धंद्याच्या साधना ऐवजीं जर तो पत्ते, गंजिफा, बुद्धिबळें, सोंगट्या व इतर उपकरणें यांचा उपयोग करील तर नाटकधंद्याचा बदलौकिक झाल्याशिवाय खास राहणार नाहीं. म. कावसजी यांनीं धंद्याकरितां धंदा केला, लौकिकाकरितां धंदा केला, द्रव्यसंचयाकरितां धंदा केला व स्वार्था बरोबर परमार्थाकरितांही धंदा केला. नवे नवे खेळ, व नव्या नव्या कल्पनातींत पोषाखाची रचना, विषय वैचित्र्य यानीं म. कावसजी हे आपले स्टेज अगदीं हलवून सोडीत असत. हा पहिला मान कावसजी यांना मिळाला, व इतर नाटक कंपन्यांना अनुकरण करण्याइतकी महत्वाची क्रांति घडवून आणिली. यांचा अभिनय स्वतःचे विचाराबरोबरच पाश्चात्यांचें जे चांगले गुण तेवढेच घेऊन मिश्र पद्धतीचा असे पण त्यामुळें पाश्चात्त्य लोकांवरही यांची जबर छाप बसली अहोरात्रधंद्याच्या उर्जितावस्थेशिवाय त्यानीं कसलाही विचार केला नाहीं. स्वतःची भूमिका तयार झाल्यावर पानतंबाखू

खाऊन त्यांच्या फुकटांत इतर मंडळींबरोबर ते कधीही चकाट्या पिटीत बसत नसत. तर एकांतांत आपल्याकडे असलेल्या भूमिकेंत आणखी काय काय नवीन कल्पना काढतां येईल, कोणती सुधारणा करतां येईल, यांत चित्तवृत्ति गुतवून ठेवीत. त्यांचे विचार धंद्याच्या बाबतींत युरोपियन लोकांप्रमाणें बाणेदार असत. हा बाणेदारपणा, सदसद्विचार बुद्धि, आत्मविश्वास व नटांबद्दल स्वाभाविक आदर या सर्वांची सांगड घालूनच यांनीं नाट्यकलेचें नांव राखलें.

नटांच्या बद्दल त्यांचे काय विचार होते हें वर दर्शविलेच आहे. नट हे विचारांच्या स्वाधीन नसून विकारांच्याच स्वाधीन असतो व हे विकार वाढविण्याला बाहेरचीं साधनें आडमार्गानें वळसे घालीत येतात यामुळें नटांच्या गरजा भागण्यानें किंवा भागविण्याचें बाजूला राहून संस्थेचा पाया डळमळीत होऊं लागतो. नटाची व मालकाची एकवाक्यता होण्यास धंद्याचा जीवंतपणा राखण्याचे मार्ग उभयतांनींही शोधण्यास कायावाचा मनें झटावें असा त्यांचा हेतू असे पण तें तसें होत नाहीं, रासेलस राजपुत्राप्रमाणें त्याच्या सुखाची साधनें शोधण्यासाठीं जसा तो बाहेर पडला तसेच हे नट आठवड्याचे होऊन बसतात असें त्यांचे म्हणणें असे म. कावसजी यांच्या सारख्या विचाराचे व कर्तबगारीचे लोक आतां या धंद्यात सध्यांतरी त्यांच्या मागें कोणी नांव काढण्यासारखे दिसत नाहींत. म. बाळीवाला महमद अल्ली, वगैरे लोक होते पण ते होते येवढ्यावरच आपल्याला समाधान मानतां येत नाहीं. आपला महाराष्ट्र अभागी आहे. गुणी लोकांच्या जननाची नोंद घेण्यापेक्षां त्यांच्या मरणाची नोंद घ्यावी लागणें हें खरोखर दुर्दैव होय. पूर्वजांच्या नांवावर विकण्याचा काळ आतां राहिला नाहीं. तर प्रत्येक नटानें आपल्या धंद्याकरितां अहर्निश जागरूक असावें म्हणजे म. कावसजी यांनीं धंद्यांत जें नांव

मिळविले व नटाबद्दल जे निराशेचे परंतु कळकळीचे विचार प्रकट केले त्याचे चीज झालें असें आह्मी समजू.

हा धंद्याच्या बाजूचा विचार झाला. पण वाङ्मय या दृष्टीनें पाहिले तरी ही त्या बाजूनें म. कावसजी यांनीं चांगली सेवा बजावली आहे हें त्यांनीं आपल्या कारकीर्दीत जीं नवीं नाटकें उदयास आणलीं आहेत त्यावरून समजून येईल. कांहीं नाटकांची यादी खालील प्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| भोली गुल | अलीबाबा |
| गामरेनी गोरी | गोपीचंद |
| बजम फानी | शहीदेनाज |
| मुरीदे शक | मारे आस्टीन |
| असीरे हिर्स | लयला |
| अलादीन | कलजुग वगैरे |

यापैकीं "गामरेनी गोरी" "अलीबाबा" "अलादीन" "मारे आस्टीन यासारख्या नाटकांनीं पुणें शहरांत सुमारें २५।२६ वर्षांपूर्वी आर्यभूषण नाटकगृहांत आमच्या मराठी प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी लोटविल्या इतकें वेड लावलें होतें. पार्शी नाटकें किंवा गुजराथी नाटकें पहावयाची ह्मणजे फक्त पोषाख व सीनरी पहावयाची असें ह्मणण्याची वहिवाट आहे. परंतु म. कावसजी यांनीं आपल्या नाटक कंपनींत सर्व बाजूनीं, सर्व दृष्टीनीं, गायन, अभिनय, पोषाख सीनरी वगैरेंत एकजात सुधारणा घडवून आणिली. त्यांनीं पैसा खर्चकरण्यांत कधींही मागें पुढें पाहिलें नाहीं. सुदैवाने त्यांना प्रेक्षक समुदायाकडून उत्तेजनही तसेंच दांडगें मिळत गेलें. एकदां एक नाटक बाहेर येणार अशी प्रसिद्धी झाल्यापासूनच तिकीट विक्रीचे दरवाजे खुले ठेवावयाचे ते नाटकाच्या प्रारंभींच बंद करावे लागत. असा यांचा प्रेक्षक वर्ग तयार आहे. सहा सहा आठ आठ महिने एकच एक नाटक

पाहण्यांत प्रेक्षकांच्या सारख्या उड्या पडत असा अनुभव आहे. आमचा मराठी प्रेक्षक वर्ग व पार्शी, मुसलमान, गुजराथी, या लोकांचा प्रेक्षक वर्ग यातील फरक अद्यापही कायम आहे. ह्मणूनच कोणत्याही पार्शी, गुजराथी नाटक डळीला आपल्या प्रेक्षक वर्गाला खूप करतां येते. व ह्मणूनच म. कावसजी यांना ही " न भूतो न भविष्यति " अशी क्रांति नाट्यकलेच्या बाबतींत घडवून आणणें सोपें झालें.

आह्मी आमच्या रंगभूमित जें एक पार्शी नाटककार व नट याचें चरित्र देत आहोत तें जातवारीकडे न पाहतां नाटक धंद्यांतील यशस्वी नाटकार ह्मणून देत आहोत. कोणत्याही नटाचें चरित्र त्याच्या जीवमानकालीं देण्याचा प्रसंग सदोदित यावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. परंतु दुर्दैवानें अद्याप आमच्या नाटक मंडळ्यांत तसा काळ आलेला दिसत नाहीं याबद्दल खेद वाटतो. आपण आहों त्या स्थितींत न रहातां २०।२५ वर्षांनीं हा धंदा सोडल्यावर स्वस्थ घरीं बसून शांततेंत काळ घालविता येईल अशी कांहीं तरी पुढची तरतूद करून ठेवून वागणारे नट अद्याप दिसू लागले नाहींत. धंदा सोडल्यावर समाजानें आपल्यास दूर करूं नये, उलट मान्यतेच्या पदवीलाच बसविले पाहिजे अशी अनुकरण बुद्धि केव्हां उत्पन्न होईल तो सुदीन. आजतरी नाटकाच्या धंद्यांत घडामोडी, अस्वास्थ्य, अडचणी, नटांची शिथिलता व समाजाशीं तुटून वागणें हेंच गुणधर्म दिसत आहेत. म. कावसजी सारख्यानीं ४० वर्षांच्या अनुभवानें असलेच निराशेचे उद्गार काढलें आहेत. ते जसेच्यातसेच नमूद करून ठेवीत आहोत. म. कावसजी यांनीं आपलें चरित्र शेवटपर्यंत गोड करून ठेविलें आहे. आमच्या नटांनीं असल्या पुरुषाचे अवश्य अनुकरण करावें ह्मणजे त्याचें इतिहास त्यांच्या जीवमानकालीं प्रसिद्ध होऊन महाराष्ट्र वाङ्मयांत चांगलो भर पडेल.

# शोचनीय मृत्यु.

## गोपाळराव मराठे.

नाट्यकला प्रवर्तक नाटक मंडळींतील प्रमुख मालक व प्रसिद्ध नट रा. गोपाळराव मराठे यांस ता. ७ जुलै १९१६ रोजीं ग्वाल्हेर येथें संनिपाताच्या विकारानें देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हाला अत्यंत वाईट वाटतें. रा. गोपाळरावांच्या निधनानें नाट्यकलेचें फारच नुकसान झालें आहे. रा. गोपाळराव हें शेक्सपियरच्या कांहीं नाटकांतील नायिकांची भूमिका फारच चांगल्या करून दाखवीत असत. नाट्यकला प्रवर्तक मंडळीवर हा दुसरा घाला होय. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो. महाराष्ट्रीय नट या प्रकरणांत यांचें चरित्र प्रसिद्ध झालें आहे.

## दत्तात्रय वैकुंठ हल्याळकर.

वरील गृहस्थांस फेब्रुवारी सन १९१६ मध्यें आकोलें येथें देवाज्ञा झाली. संगीत नाटकाच्या बाजारांतले हे एक प्रसिद्ध पुरुषपैकीं असत. परमेश्वरानें यांस आवाज फार चांगला दिला होता. यांचे ठिकाणीं सौंदर्यही चांगलें होतें. स्वभावानें हे फार मनमिळावू होते. परंतु अंगीं व्यवहारचातुर्य फारसें नसल्यामुळें यांचे नाटकाच्या धंद्यांतले व्यवहार ढिल्लरपणाचे होते. पुष्कळ वेळा यांची मंडळी मोडावी–पुन्हा जमावी असा प्रकार यांचे हयातींत चाललेला होता. परंतु स्टेजवर हे कामकरण्याला वेळेला वादकांचें तर बायकांचें, पुरुषाचें तर पुरुषाचेकाम करण्याला खंबीर असत, त्यामुळें बाजारबुणगे किती आले व गेले तरी यांचा धंदा कधीं अडून राहिला नाहीं. भाऊराव कोल्हटकर यांच्यासारखा हल्याळकर यांच्या आवाजाचा धर्म होता. म्हणून यांचे कांहीं भक्त यांना सवाई भाऊराव म्हणत असत. सुमारें वीस वर्षें यांचें नाटकाच्या धंद्यांत आयुष्य गेलें असून यांनीं आपल्या धंद्याकरितां सुधारणेची कांहीं गोष्ट केली नाहीं. किंबहुना ती कल्पनाच त्यांना नव्हती म्हटलें तरी चालेल. तथापि चाळीसपन्नास मंडळीचा चरितार्थ यांचेवर चालला होता.

१९२७५

REFBK-0019246

दस्त व वाखाणण्यासारखे होत असे. विशेषतः दाक्षायणी, तारामती सुलोचना कुंडला व द्रौपती हीं कामें अप्रतिम होत असत नाना सोमण हे नेहमीं स्त्रियांची मुख्य भूमिका करीत असून कर्णपर्वांत शल्याचें काम करणारा त्याचे इतका चांगला कोणीच झाला नाहीं. असो. स्त्रीपार्टाविषयीं जसा सांगलीकर मंडळीचा लौकिक होता तसाच नाचकामाविषयींही होता. व नाचकाम शिकविणारे उत्तम गुरुही धोंडोपंत सांगलीकर हेच होत. त्यावेळीं प्रत्येक खेळांत देव किंवा दानव यांचे कचेरींत आनंद प्रसंगाच्या निमित्तानें रंभेचा ह्मणून नाच होत असे, बहुतकरून नाचणारें पात्र एक, किंवा दोनच असत. त्यांनीं नायकिणीप्रमाणें पेज वाज घालून प्रथम थोडेंसे नुसतेंच नृत्य करावयाचें व नंतर एक किंवा दोन ठुंबऱ्या गाऊन नाचावयाचें हा प्रकार अर्धा किंवा पाऊण तासच होत असे त्यावेळीं गाणाऱ्या साथीला तबला किंवा पेटी तर मुळींच ठाऊक नव्हती. सूत्रधाराचा विणा व पखवाज व अलगुज वाजविणारा एक वाजंत्री एवढ्या सामुग्रीनें त्या वेळीं नाच इतका चित्ताकर्षक वाटत असें कीं कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरोपंत नाना छत्रे, व बाबा गोखले असली विद्वान माणसें नाच पाहण्यापुरती तरी खेळाला येत. इसवी सन १८६७ सालीं पुण्यांतील सांगलीकराचे वाड्यांतील मंडपांत [ त्यावेळीं कोणचेंच नाटकगृह झाले नव्हतें ] स्वतः धोंडोपंतांनीं बृहन्नडेची भूमिका घेऊन उत्तरेसह ( उत्तरा गोपाळ तेरदाळकर ) सुदेष्णेपुढें केलेला केरवा नाच अद्याप स्मरणांतून जात नाहीं. धोंडोपंतांनीं तयार केलेले उत्तम नर्तक तेरदाळकर, चंन्या कासार, विनायक नाशिककर, व शेवटीं परशुरामबोवा बरवे हे होत.

ऋषी पार्टाविषयीं गोविंदभट खोत व यज्ञेश्वर हींच नांवें प्रसिद्ध आहेत. देवांची भूमिका करणारे बऱ्याच मंडळ्यांतून एक एक तरी चांगले इसम होते. त्यांत श्रीपादपंत लेले यांचा पाशुपतास्त्र प्राप्तींतील अर्जून व कर्णपर्वांतील कर्ण ह्या भूमिकाविषयीं विशेष लौकिक आहे व तो अगदीं योग्य आहे.

विनायकराव दाणी, नरसिंगभट हरिपूरकर, व बाबूराव कोल्हापूरकर ह्यांची राक्षसांचीं कामें चांगलीं होत, परंतु दिसण्यांत भाषणांत व तर्डफेत सर्वपरी पुणेकर रावबा पोवार यांची बरोबरी करणारा कोणीही राक्षसपार्टी झाला नाहीं एवढें खास. नाटकी व इतरही कविता करणारे यजुर्वेदीय ज्ञातींतील ज्योतिष व याज्ञिक कर्मात प्रसिद्ध असलेले बळवंतराव उर्फ बाबा शहरकर यांचा सहवास रावजी पोवार यांस असल्यामुळें यांचे अंगीं बहुश्रुत-पणा पुष्कळ आला होता. यांना बाळबोध व मोडी चांगलें लिहितां वाचतां येत होते. अफूचें दुकान वगैरे धंदा संभाळून चित्तचक्षु चमत्कृति निधान, समयरंग रसोद्भव, विबुधजनचिंत्तचातक स्वातिवर्ष,इत्यादि अनेकविध नांवानी वरचेवर उदय अस्त पावणाऱ्या स्थाईक पुणेकर मंडळ्यांतून हे पगार घेऊन सोंग घेत असतां इ० सन १८९५ चे सुमारास दाढेला कांहीं विकार होऊन वयाचे ६५ व्या वर्षी पुण्यासच वारले.

## बळवंतराव डाके

रावजी पोवार यांचे नांव निघाल्यावर बळवंतराव डाके हें नांव त्याच्या जोडीला निघावयाचेंच हे गृहस्थही रावजी पोवार यांचे खालोखाल राक्षस-पार्ट चांगला करीत असत. रावण, भीम, कुंभकप्रधान ही कामें नेहमी यांचेकडे असत. ऋषीपार्टही हे चांगला करीत असत. राक्षसपार्टासंबंधीं यांचा विशेष गूण ह्मणजे यांचा आवाज फार मोठा व खणखणीत असे. हल्लीं नूतन मराठी विद्यालयाची प्ले्ग्राऊंड आहे त्याजागी नाटकगृह होतें त्याचे आलीकडील नांव पूर्णानंद नाटकगृह होतें. पण प्रथमारंभी फार दिवस तें अप्पाबळवंत यांचे नाटकगृह या नांवानेच प्रसिद्ध होते. त्या ठिकाणीं खेळ सुरु असतां रात्रीं १२ वाजतां नाटक पहावयास येणाऱ्या प्रेक्षकास मोरोबा दादा फडणीस यांचे वाड्यासमोर येताच यांचा अवाज ओळखू येई व डाके आला रे आला!असे उद्गार तेथेंच निघत.बळवंतराव डाके ह्मणजे रावबा पोवाराचा डावा हात असेच लोक ह्मणत असत! रावजी पोवार जसे अफूचे